सोलापूर
तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, २७ डिसेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २७३ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

सर्व विभागांनी १०० दिवसांच्या आराखड्यातून ठोस कामगिरी करावी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि. २६ डिसेंबर : राज्याच्या सर्वांगिण प्रगतीसाठी पुढील १०० दिवसांचा आराखडा विभाग तयार करीत आहेत. त्यामध्ये लोक केंद्रीत योजना, तंत्रज्ञानाच्या उपयोगाने सहजतेने नागरिकांना लाभ मिळणाऱ्या योजना, राज्याचे पुढारलेपण कायम ठेवत प्रगतीच्या शिखरावर नेणाऱ्या कामगिरीचा समावेश असावा, असे निर्देश देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आराखड्यातून विभागांनी ठोस कामगिरी करण्याच्या सूचना दिल्या.

सह्याद्री अतिथीगृह येथे उच्च व तंत्र शिक्षण, वन व कृषि विभागाच्या पुढील १०० दिवस आराखड्याच्या अनुषंगाने आयोजित बैठकीत फडणवीस यांनी आढावा घेतला. वन्य प्राणी व मानवी संघर्ष कमी करण्यासाठी वन विभागाच्या कृत्रिम बुद्धिमत्ता व माहिती तंत्रज्ञानाच्या उपयोगातून उपाययोजना करण्याच्या सूचना करीत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, मानव व वन्य प्राणी संघर्षामध्ये जलद गतीने मदत मिळण्यासाठी जलद बचाव दलाची स्थापना करण्यात यावी. या दलातील मनुष्यबळाला उच्च दर्जाचे प्रशिक्षण देण्यात यावे. पुढील १०० दिवसांच्या आराखड्यात अशा उपाययोजनांचा समावेश वन विभागाने करावा. वृक्षलागवडीचा संस्कार रूजण्यासाठी ती कायम स्वरूपी अंमलात आणावी. या आराखड्याच्या माध्यमातून लोकांचे जीवन सुसह्य होण्यासाठी काम करण्यात यावे. ते म्हणाले, बिबट्यांची वाढती संख्या लक्षात घेता त्यांना अन्य राज्यातील अभयारण्यात गरजेप्रमाणे देण्याची व्यवस्था करावी. बिबटे निवारा केंद्रांची क्षमता वाढविण्यात यावी. विभागाने कार्बन क्रेडीट कंपनी स्थापन करण्याबाबत धोरण आणावे. शहरी भागातील वनीकरण वाढविण्यासाठी मियावॉकी वृक्षलागवड पद्धत शहरांमध्ये उपयोगात आणावी. कृषि विभागाने आपल्या आराखड्यातून शेतकरी केंद्रबिंदू ठेवत योजनांची अंमलबजावणी करावी.

दिल्लीत मोदींसोबत शिंदेंची भेट, एक तास चर्चा

नवी दिल्ली : राज्याच्या राजकारणातील महत्त्वाची बातमी समोर येत आहे. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिल्लीत जाऊन देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली आहे. त्यामुळे राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आलं आहे. राज्यात आता महायुतीचं सरकार स्थापन झालेलं आहे. मंत्रिमंडळाचा विस्तार आणि खातेवाटप देखील झालं आहे. आता सर्व जिल्ह्यांचे पालकमंत्रीपद वाटपाचा कार्यक्रम राहिला आहे. तो कार्यक्रमही पुढच्या दोन-चार दिवसांत पूर्ण होण्याची शक्यता आहे. तसेच नव्या मंत्रिमंडळातील सर्व मंत्री आपापल्या विभागाची कामे हाती घेत आहेत. असं असताना दिल्लीत एकनाथ शिंदे आणि नरेंद्र मोदी यांची भेट झाल्याने या भेटीमागे नेमकं कारण काय आहे? असा प्रश्न सर्वांनाच पडला आहे. या भेटीनंतर खुद्द एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. नरेंद्र मोदी यांची आपण सदिच्छा भेट घेतली. या भेटीत कोणतीही राजकीय चर्चा झाली नाही, असं एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. पण महाराष्ट्रातील बडा नेता आणि देशातील सर्वोच्च पदावर असलेला बडा नेता जेव्हा एकत्र येतात आणि तेव्हा राजकीय चर्चा न होणं हे शक्यच नसतं. त्यामुळे या भेटीला जास्त राजकीय महत्त्व प्राप्त झालं आहे.

ही भेट खरं म्हणजे कुठलीही राजकीय नव्हती. सदिच्छा भेट होती. सरकारने केलेल्या कामांची पोचपोवती महाराष्ट्राची जनता देईल. तशी पोचपावती महाराष्ट्राच्या जनतेने दिली म्हणून तशी सदिच्छा भेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची घेतली. मोदींनी सुद्धा सांगितलं की, महाराष्ट्राच्या विकासामध्ये कुठेही काही कमी पडणार नाही. केंद्र सरकार आणि आम्ही सर्वजण जसे आपल्या पाठिशी उभे होतो तसे यापुढे देखील पाठिशी आहोत, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

मंत्रिमंडळ विस्तार झाल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा आणि केंद्रीय मंत्री किरण रिज्जू यांची भेट घेतली. ही फक्त सदिच्छा भेट होत होती. अडीच वर्षात आम्ही लोकाभिमुख सरकार काय असतं ते दाखवलं आणि लोकांनी आम्हाला मान्यता दिली. केंद्र सरकारचं आमच्यामागे पाठबळ उभं होतं. आता आमची नवीन इनिंग सुरू झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात विकास कसा होईल? याचा विचार करु. महाराष्ट्रात क्षमता आहे. केंद्रातील अनेक मोठ्या नेत्यांची भेट घेणार आहोत. देवेंद्र फडणवीस, मी आणि उपमुख्यमंत्री अजित पवार पुन्हा एकदा सर्वांची भेट घेणार आहोत, अशी देखील माहिती एकनाथ शिंदे यांनी दिली.

वन नेशन वन इलेक्शन होणं गरजेचं

सतत होणाऱ्या निवडणूकांमुळे विकास थांबला जातो. देशाची प्रगती होण्यासाठी वन नेशन वन इलेक्शन होणं गरजेचं आहे. एनडीएची बैठक होती. त्यामुळे त्यांचे पूर्व नियोजीत कार्यक्रम होते. ते मीटिंगला आले नाही. एनडीए मजबूत आहे. आम्ही इंडिया अलायन्स प्रमाणे स्वार्थासाठी एकत्र आलेलो नाही, अशी प्रतिक्रिया एकनाथ शिंदे यांनी दिली.

बोगस सुरक्षारक्षक भरतीचा प्रयत्न : आरोपींवर गुन्हा

छत्रपती संभाजीनगर : कोणत्याही प्रकारची शासकीय परवानगी नसताना उमेदवारांची शारीरिक चाचणी घेत पैसे घेतल्याप्रकरणी आरोपींवर सिटी चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशाल मोहन देवळी (वय २७) रा. तावशी ता. पंढरपूर जि. सोलापूर, विकास बापू माने (वय २७) रा. चळे ता. पंढरपूर जि. सोलापूर व सनी लाला बागाव (वय २७) रा. हुपरी ता. पंढरपूर जि. सोलापूर अशी आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी निखिल निंबा बागुल रा. जय भवानीनगर सिल्लोड यांनी फिर्याद दिली. फिर्यादीनुसार आरोपींनी शासकीय परवानगी न घेता व नोंदणीकृत संस्था नसतानाही.

सुरक्षारक्षक भरतीसाठी तरुणांना मैदानावर चाचणीसाठी बोलावले. तसेच ११ महिन्यांचे एग्रीमेंट केले जाईल व प्रति महिना बारा हजार रुपये वेतन दिले जाईल असे आमिष दाखवले. चाचणीसाठी ३ हजार व नियुक्तीसाठी ३ हजार रुपये द्यावे लागतील असे सांगितले.

त्यानंतर तुमची निवड झाल्यास कंपनीकडून तुम्हाला १५ दिवसांचे प्रशिक्षण देण्यात येईल. तसेच येण्या जाण्याचा १ हजार रुपये खर्च तुम्हाला देण्यात येईल असे सांगून उमेदवारांच्या शैक्षणिक प्रमाणपत्राच्या सप्रती घेतल्या. त्यानंतर २५ डिसेंबर रोजी दुपारी एक वाजेच्या सुमारास फिर्यादींना ६ हजार रुपये घेऊन या असे सांगितले. त्यानुसार फिर्यादींनी त्यांचे लहान भाऊ आदित्य बागुल यांच्या मोबाईल क्रमांकावरून तसेच बार कोडवर आरोपींना ६ हजार रुपये पाठविले. फिर्यादी सोबत इतर ९२ मुलांनीही संस्थेस प्रत्येकी ६ हजार रुपये रोख तसेच ऑनलाईन पाठवले. सदर संस्थेने कोणत्याही प्रकारची शासकीय परवानगी घेतली नाही. तसेच सदर संस्था ही नोंदणीकृत आहे किंवा नाही व अशा प्रकारची भरती घेण्याचा अधिकार आहे किंवा नाही असेही शंका आहे. फिर्यादींनी थेट पोलीस ठाणे गाठत आर्मीच्या पोशाखात बेकायदेशीर तसेच विनापरवानगी भरती घेऊन आर्थिक लूट केल्याची फिर्याद सिटीचौक पोलिसात दिली. याप्रकरणी सिटीचौक पोलीस पुढील तपास करीत आहेत.

नरसीत भरवस्तीत जनावरांचा अवैध कत्तलखाना !

प्रचंड दुर्गंधी : आरोग्याच्या समस्यांनी नागरिक बेहाल, कारवाई कधी होणार : जनतेचा सवाल

तभा वृत्तसेवा
नरसी,दि. २४ डिसेंबर

गेल्या अनेक वर्षांपासून नरसीत अवैधरीत्या कत्तलखाने सुरू आहेत. उघड्यावरच जनावरे कापली जातात. त्यामुळे लगतच्या वस्तीतील नागरिकांना हा किळसवाणा प्रकार सहन करावा लागतो. कत्तल खान्यातील घाण व मासांचे तुकडे परिसरात टाकले जात असल्याने मोकाट कुत्री वाढले आहेत.

तसेच वर्षभर नागरिकांना दुर्गंधीचा सामना करावा लागतो. कत्तलखान्या जवळच नाल्याचे घाण पाणीही वाहत असल्याने नागरिकांच्या आरोग्याची समस्या उद्भवत आहे. महेबुब नगर मधील भर वस्तीतील कत्तलखाना त्वरीत बंद करावा या मागणीसाठी नागरिकांनी ग्राम पंचायत कार्यालयाकडे अनेकदा तक्रारी केल्या; परंतु ग्राम पंचायतच येथील नागरिकांना वाळीत टाकल्याचे दिसून येते. कत्तलखाना चालकांकडून तक्रार कर्त्यांना धमकी दिली जाते तसेच त्यांना राजकीय पाठबळ असल्याचे बोलल्या जात आहे.

नाल्यात हाडे, मांसाचा खच

घरासमोरुन घान पाणी वाहत असल्याने कत्तलखान्या जवळच सांडपाणी जमा होते. त्यातच अनेकदा जनावरांची हाडे, मांस टाकले जाते. त्यामुळे महेबुब नगर परिसरात मोठी दुर्गंधी पसरली आहे. शिवाय कुत्रे हे मांस बाहेर काढतात व हे मास घेऊन जात असताना मोकाट कुत्री मागे लागून हिसकावून घेतात तसेच अनेकांना हे कुत्रे चावा घेत आहेत.त्यामुळे अनेकदा कुजलेले मांस असलेली हाडे घरापर्यंतही येत असल्याने नेहमीच विविध आजार होत असून, नागरिकांचा जीव धोक्यात आहे. त्यातच कत्तलखान्याविरुद्ध कुणाजवळ शब्दही काढला तर जीवाला धोका असल्याचे बोलल्या जात आहे.

वीर बालदिनी राष्ट्रपतींच्या हस्ते १७ मुलांचा राष्ट्रीय बाल पुरस्काराने गौरव

नवी दिल्ली : वीर बालदिनाचे औचित्य साधून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते १७ मुलांचा राष्ट्रीय बाल पुरस्काराने गौरव करण्यात आला. सात वेगवेगळ्या प्रकारातील प्रेरणादायी कार्यासाठी मुलांना गौरविण्यात आले. यंदाच्या विजेत्यांमध्ये चौदा राज्यांतील दहा मुली आणि सात मुलगे यांचा समावेश आहे.

राष्ट्रपती भवनातील सांस्कृतिक केंद्रात पुरस्कार वितारणाचा कार्यक्रम झाला. कला आणि संस्कृती, शौर्य किंवा धाडस, संशोधन, विज्ञान - तंत्रज्ञान, क्रीडा, सामाजिक सेवा, पर्यावरण या क्षेत्रातील मुलांच्या प्रेरणादायी असाधारण कतृत्वाचे राष्ट्रपतींनी कौतुक केले.

पुरस्कार विजेत्यांच्या कतृत्वाचा देशाला अभिमान वाटत असल्याचे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणाल्या. मुलांनी त्यांच्या असामान्य कतृत्वाने नवे आदर्श निर्माण केल्याचेही राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणाल्या. पुरस्कार विजेत्या मुलांची कामगिरी आश्चर्यजनक आहे.

या कामगिरीतून त्यांच्या अमर्याद क्षमतेची झलक बघायला मिळते, या शब्दात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मुलांचे कौतुक केले.

मुलांच्या कलागुणांना वाव देणे हे मोठ्यांचे कर्तव्य आहे. यातून नवनिर्मिती होईल. भारताच्या स्वातंत्र्याची शताब्दी २०४७ मध्ये साजरी होणार आहे, त्यावेळी हे पुरस्कार विजेते देशाचे सुबुद्ध नागरिक असतील. ही मुले विकसित भारताचे निर्माते होतील, असा विश्वास राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी व्यक्त केला.

शेतकऱ्यांचे सोयाबीन विना अट तात्काळ खरेदी करा

किसान सभेचे खरेदीचा विक्री कार्यालया समोर बेमुदत धरणे आंदोलन

किल्ले धारूर (प्रतिनिधी) धारूर तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांचे सोयाबीन विना अट तात्काळ खरेदी करावे , या साठी आखिल भारतीय किसान सभेच्या वतीने खरेदी विक्री संघ कार्यालय समोर धारूर येथे बे मुद्दत धरणे आंदोलन करण्यात येत आहे .असे दिलेले प्रसिद्ध पत्रकात किसान सभेचे तालुका सचिव कॉ दादासाहेब सिरसट यांनी माहिती दिली.

या बाबत सविस्तर असे की , धारूर येथील खरेदी विक्री संघ मार्फत सोयाबीन खरेदी केंद्र शासन नियम व आदेशानुसार चालू करून उद्घाटन केले आहे . परंतु शेतकऱ्याचे सोयाबीन खरेदी करणे अनेक प्रकारच्या अटी व शर्ती लावल्या जात आहेत . शेतकरी खरेदी केंद्रावर चक्रा मारीत आहेत . परंतु संबंधितांकडून शेतकऱ्यांना केंद्रावर विक्रीसाठी सोयाबीन आणू नये असे सांगितले जाते . त्यामुळे धारूर तालुक्यातील शेतकऱ्यांना सोयाबीन खाजगी व्यापार व्यापाराकडे विक्री करण्याची वेळ येत असून , व्यापाऱ्याकडून सोयाबीनची कमी भावाने खरेदी केली जात आहे . त्यामुळे शेतकऱ्याचे आर्थिक नुकसान होत असून शासनाने शेतकऱ्याची सोयाबीन खरेदी करण्याचे आदेश असूनही शेतकऱ्यांना धारूर तालुक्यातील अधिकाऱ्याच्या मनमनी मुळे आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे . यासाठी खरेदी विक्री संघ कार्यालयासमोर अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने किसान सभेचे तालुका अध्यक्ष कॉ ड संजय चोले जिल्हा कार्याध्यक्ष कॉ काशीराम शिरसट तालुका सचिव कॉ दादासाहेब शिरसट कॉ मधुकर चव्हाण , बंडू शिरसट , गीताराम शिरसट , अंकुश घुगे , महादेव डापकर , गणेश शिरसट कॉ मेघराज तिडके सीटू संघटनेचे जिल्हा सचिव कॉ डॉ अशोक थोरात हे बेमुध्द धरणे आंदोलनासाठी बसले आहेत . तसेच दिनांक २७ डिसेंबर २०२४ रोजी खरेदी विक्री संघातील प्रशासक श्री कातथळे साहेबा बरोबर बैठकीचे आयोजन केले आहे .

परभणी व बीड हत्या प्रकरण दाबण्याचा मुख्यमंत्र्यांकडून प्रयत्न : पटोलेंचा आरोप

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि. २६ डिसेंबर : परभणी व बीडमधील घटनांवर सर्व स्तरातून कारवाईची मागणी केली जात असताना महायुती सरकार मात्र गंभीर नाही.सरकार कारवाईची भाषा करत असले तरी सरकार वस्तुस्थिती मान्य करायला तयार नाही, त्यामुळे चौकशीतून उत्तर काय मिळणार हे माहित आहे, असे सांगून बीड व परभणी हत्या प्रकरण दाबण्याचा मुख्यमंत्र्यांकडून प्रयत्न होत असल्याचे आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला.

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या दोन दिवसांच्या नव सत्याग्रह कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी पटोले बेळगावात पोहचले असताना प्रसार माध्यमांशी बोलत होते. ते म्हणाले की, परभणीत आंबेडकरी विचाराच्या सुशिक्षित तरुणाचा पोलीस मारहाणीत झालेला मृत्यू हा पोलीसांनी केलेली हत्याच आहे. बीडमध्ये सरपंच संतोष देशमुख यांची निघृण हत्या केली, या दोन्ही घटनांवर जनतेने व सत्ताधारी पक्षाच्या लोकांनी वस्तुस्थिती मांडली आहे पण भाजपा युती सरकार ते मान्य करत नाही, हे सरकार प्रायोजित असल्याने सीआयडी चौकशी केली तरी त्यातून काही निष्पन्न होणार नाही. देशात हुकूमशाही सुरु असून या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर बेळगावात होत असलेले अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे दोन दिवसांचे विशेष अधिवेशन हे काँग्रेस पक्षासाठी तसेच देशवासीयांसाठी अत्यंत महत्वाचे आहे, असेही त्यांनी सांगितले.

छत्रपती संभाजीनगरसह मराठवाड्यात आज, उद्या 'अवकाळी' चा अंदाज

हवामानतज्ज्ञांची माहिती

छत्रपती संभाजीनगर : छत्रपती संभाजीनगर सह मराठवाड्यात बहुतांश ठिकाणी शुक्रवार, शनिवारदरम्यान (२७, २८ डिसेंबर) मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज हवामानतज्ज्ञांसह हवामान विभागाने वर्तविला आहे. गुरुवारी, २६ रोजी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ढगाळ वातावरण होते. सकाळी काही काळ वेगाने वारेही वाहत होते.

शुक्रवारी दुपारपासून मेघगर्जनेसह पावसाची सुरुवात खान्देश आणि मराठवाड्यातील बहुतांश भागांमध्ये होईल. शुक्रवारी रात्रीपर्यंत वादळी पाऊस मराठवाड्यात हजेरी लावेल. यात छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली आणि बीड जिल्ह्यांचा समावेश आहे. काही भागांमध्ये काही प्रमाणात गारपिटीची शक्यता देखील वर्तविण्यात आली आहे. मराठवाड्याच्या उर्वरित जिल्ह्यांतील काही भागांमध्ये मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता देखील आहे.

पावसाची स्थिती कायम

मराठवाड्यातील काही भागांमध्ये पावसाची स्थिती या दिवशीदेखील कायम राहण्याची शक्यता आहे.मराठवाड्यात आभाळी हवामान अपेक्षित असल्यामुळे कमाल तापमानात थोडी घट होईल. शेतकऱ्यांनी हवामानाच्या या स्थितीनुसार नियोजन करावे, रविवारी, २९ डिसेंबर रोजी मराठवाड्यातील काही तुरळक ठिकाण वगळता राज्यातील बहुतांश भागांत स्थिर हवामान पहायला मिळेल आणि सोमवार, ३० डिसेंबर २०२४ पासून थंडीत वाढ होईल. चार ते पाच दिवस ही थंडी राहणार आहे.

– डॉ. रामचंद्र साबळे, ज्येष्ठ हवामानतज्ज्ञ

पिकाची काळजी घ्यावी

सध्या काही भागात तुरीची सोंगणी चालू आहे. प्राण्यांना आणि काढणी केलेल्या पिकांना पाऊस, गारपीट आणि वाऱ्यापासून सुरक्षित ठेवावे. वादळ आल्यास झाडांखाली, मोकळ्या जागेत, पत्र्याच्या शेडखाली, वीजप्रवाह असलेल्या तारांखाली किंवा विद्युत रोहित्रांनजीक आसरा घेऊ नये, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

सोलापुरात ७ लाखांच्या खंडणीसाठी अपहरण

सोलापूर : गांजाच्या केससाठी झालेल्या खर्चाचे सात लाख रुपये दिल्याशिवाय सोडणार नाही, असे म्हणत सात ते आठ जणांनी कोयत्याचा धाक दाखवून एकाचे अपहरण केले. ही घटना मोहोळ तालुक्यातील अनगरपाटी जवळ घडली. अक्षय गोडसे व संतोष चव्हाण या दोघांना अटक केली आहे. इतरांचा तपास सुरु आहे. या प्रकरणी मोहोळ पोलीस ठाण्यात अपहरण झालेल्या व्यक्तीच्या पत्नी विद्या राजकुमार घोलप यांनी फिर्याद दाखल केली आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

देगलूर महाविद्यालय करियर कट्टाद्वारे पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षणास प्रारंभ

तभा वृत्तसेवा
देगलूर,दि. २७ डिसेंबर

अडत व्यापारी शिक्षण संस्था संचालित, देगलूर महाविद्यालयातील करिअर कट्टाच्यावतीने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण देन्यास सुरवात करण्यात आली आहे. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून क्रीडा संचालक डॉ. नीरज उपलंचवार हे होते. या कार्यक्रमात महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, उपप्राचार्य डॉ. व्ही. जी. शेरीकर, करियर कट्टा समन्वयक प्रा. डॉ. माधव चोले, डॉ. सुरेश काशिदे डॉ.संजय पाटील ,डॉ. सर्जेराव रणखांब ,क्रीडा शिक्षक सिताराम हाके, क्रीडा शिक्षक मधुकर कांबळे आणि महाविद्यालयातील उत्कृष्ट खेळाडू अनिल हेमनर हेही उपस्थित होते .

सुरुवातीला करिअर कट्टा समन्वयक प्रा. डॉ. माधव चोले यांनी या वर्षातील करिअर कटाचा अहवाल सादर केला. यामध्ये त्यांनी करियर कट्टाच्या अधिकृत नोंदणी विद्यार्थी संख्या २०० पेक्षा जास्त असल्याची माहिती दिली.

या वर्षात आर्थिक साक्षरता कार्यशाळा घेण्यात आली, तसेच पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण यासाठी १२३ विद्यार्थ्यांची यादी महाराष्ट्र उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि माहिती प्रसारण केंद्र यांच्याकडे पाठवण्यात आल्याचीही माहिती दिली .

याप्रसंगी त्याने महाविद्यालयातील करियर कट्टाच्या विद्यार्थ्यांना येणाऱ्या तांत्रिक अडचणी कशा सोडवाव्यात, शिवाय करियर कट्टा मधील विविध उपक्रमाची माहिती दिली. त्याचा कसा फायदा घ्यावा यासंबंधीची माहिती दिली या शैक्षणिक वर्षातील सर्व अहवाल विद्यार्थ्यांसमोर सादर केला. या प्रशिक्षणामध्ये महाविद्यालयातील क्रीडा संचालक डॉ.नीरज कुमार उपलंचवार यांनी दि.२६.१२.२४ पासून सकाळी ६ ते ८ या वेळात सुरुवात होणारे पोलीस पूर्व भरतीचे मैदानी प्रशिक्षण कसे घेण्यात येणार आहे याची माहिती दिली.

आजच्या काळातील महाराष्ट्रातील पोलिस पदासाठी मुलीं व मुलांसाठी काय निकष आहेत. याची माहिती दिली .किती वेळात मुलीने धावायचे, मुलांनी किती वेळात धावने आवश्यक आहे,

गोळा फेक मुलींनी कसा करायचा ,मुलांनी कसा करायचा यातील तांत्रिक अडचणी याची पूर्ण माहिती विद्यार्थ्यांना त्यांनी करून दिली. यावेळी क्रीडा शिक्षक सिताराम हाके यांनीही विद्यार्थ्यांना याची मैदानी प्रशिक्षणाची माहिती दिली .

यानंतर विद्यार्थ्यांना करिअर कट्टा च्या वतीने १२३ विद्यार्थ्यांना टी-शर्ट चे वाटप करण्यात आले. आणि शेवटी अध्यक्षीय समारोपामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मोहन खताळ सर यांनी विद्यार्थ्यांना महाराष्ट्र स्तरावरील स्पर्धा ,राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा याविषयी प्रेरणा दिली आणि करिअर कट्टाचे कसे महत्त्व वाढत चालले आहे. विद्यार्थ्यांनी करियर कट्टामध्ये कसा सहभाग घ्यायचा आणि पुढे कसे जायचे विद्यार्थी खेडेगावातून येतात आणि विद्यार्थ्यांनी कसे या वेळेचा सदुपयोग करायचा याविषयी माहिती देऊन मार्गदर्शन केले आणि विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचा फायदा घ्यावा आणि आपलं आयुष्य उज्वल करावं यासाठी शुभेच्छा दिल्या .या कार्यक्रमाच्या प्रसंगी महाविद्यालयातील वरिष्ठ प्राध्यापक उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी ए ची विद्यार्थिनी स्वाती लोखंडे यांनी केले .तर कार्यक्रमाचे आभार बी ए तृतीय वर्षाचा विद्यार्थी विशाल कुडकेकर यांनी केले .हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग, माहिती प्रसारण विभाग आणि करिअर कट्टाचे महाराष्ट्राचे प्रमुख शितोळे सर, किरण पाटील अमृता यांनी आम्हाला सहकार्य केले. शिवाय महाविद्यालयातील स्तरावर हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी करिअर कट्टा, समन्वयक डॉ. माधव चोले, डॉ.सुरेश काशिदे यांनीही हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केला. त्यामुळे हा कार्यक्रम यशस्वी झाला.

विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांना कागदपत्र सादर करण्याचे आवाहन

अहिल्यानगर दि.२६-विशेष सहाय्य योजनेतील संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजनेतील लाभार्थींना फेब्रुवारी-२०२५ पासून डी. बी. टी द्वारे अर्थसहाय्याचे वितरण करण्यात येणार असून लाभार्थ्यांनी ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत संबंधित तलाठी यांचेकडे आवश्यक कागदपत्रे सादर करावीत, असे आवाहन पारनेर तहसीलदार गायत्री सौंदाणे यांनी केले आहे.

लाभार्थ्यांनी बँक खाते आधारकार्डशी संलग्न करून बँक खाते पुस्तकाची छायांकीत प्रत सादर करावी. सोबत आधारकार्डची छायांकीत प्रत, दिव्यांग प्रमाणपत्र लागू असल्यास त्याची छायांकीत प्रत सादर करावी. अद्ययावत मोबाईल क्रमांक बँक खात्याशी संलग्न असणे बंधनकारक आहे.

जावक क्रमांक ६४८/२०२४
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर सार्वजनिक
न्यास नोंदणी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर,
बाबा पेट्रोल पंपाजवळ,, अदालत रोड,
छत्रपती संभाजीनगर, छत्रपती संभाजीनगर,
औरंगाबाद, औरंगाबाद
दि. २०/१२/२०२४

चौकशीची जाहीर नोटीस

एस.आर.एन. क्रमांकः ARN/14767/18/24
फेरफार अहवाल/अर्ज क्रमांकः. 566/24

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक जबुद्रिप बुद्ध विहार चॅरिटेबल ट्रस्ट छत्रपती संभाजीनगर बाबत ।

न्यासाचा पत्ता : हाउस नं २५, सिद्धार्थ नगर एन-१२, छत्रपती संभाजीनगर, औरंगाबाद, औरंगाबाद

अर्जदार : अनिल भगवान इंगळे,

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेतः-

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?

(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

जंगम मिळकत (वर्णन)

अ.क्र.	तपशील	अंदाजे मूल्य
१	Cash In Hand in possession of president	7000.00

(अ) जंगम मिळकतः रोख रु. ७०००/- मात्र
(अक्षरी रुपये सात हजार मात्र फक्त)

स्थावर मिळकत (वर्ण)

अ.क्र.	शहर किंवा गांव	सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र.	क्षेत्र	मूल्याकन किंवा स्वरूप	मुदत / कालावधी	अंदाजे मूल्य

(ब) स्थावर मिळकत रोख रु. /- मात्र - (अक्षरी रुपये मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक १९-१२-२०२४ रोजी दिली.

अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
छत्रपती संभाजीनगर

आईएमटीईएक्स, टूलटेक आणि डिजिटल मैन्युफैक्चरिंग २०२५

पुणे- भारताच्या उत्पादन क्षेत्रात नवीन आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाच्या आगमनाने वेगाने बदल होत आहेत, जे देशी आणि जागतिक गरजा पूर्ण करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरते. तंत्रज्ञान प्रेमींच्या दृष्टीने, आईएमटीईएक्स हे एक अद्वितीय ठिकाण आहे, जेथे ते नवीन आणि क्रांतिकारी तंत्रज्ञान अनुभवू शकतात. आईएमटीईएक्स मध्ये प्रत्येक तंत्रज्ञान प्रेमीला पाहण्यासाठी, अनुभवण्यासाठी आणि घेऊन जाण्यासाठी काहीतरी असते. आईएमटीईएक्स मध्ये सहभागी होणे हे एक अविस्मरणीय अनुभव आहे, कारण हे प्रदर्शन त्याच्या पाहुण्यांसाठी स्वागतार्ह वातावरण तयार करते आणि मशीन टूल उद्योगाला भव्यतेने दाखवते. प्रत्येक व्यवसायिक पाहुण्याला आईएमटीईएक्स मध्ये सहभाग घेणे एक सन्मान मानले जाते आणि हे भारताच्या नवा आणि आत्मविश्वासपूर्ण दृष्टीकोणाला सादर करणारे एक शीर्ष प्रदर्शन आहे.

भारताच्या उत्पादन क्षेत्राची क्षमता प्रदर्शन

मुंबई - भारताच्या उत्पादन क्षेत्रात नवीन आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाच्या आगमनाने वेगाने बदल होत आहेत, जे देशी आणि जागतिक गरजा पूर्ण करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरते. तंत्रज्ञान प्रेमींच्या दृष्टीने, आईएमटीईएक्स हे एक अद्वितीय ठिकाण आहे, जेथे ते नवीन आणि क्रांतिकारी तंत्रज्ञान अनुभवू शकतात. आईएमटीईएक्स मध्ये प्रत्येक तंत्रज्ञान प्रेमीला पाहण्यासाठी, अनुभवण्यासाठी आणि घेऊन जाण्यासाठी काहीतरी असते. आईएमटीईएक्स मध्ये सहभागी होणे हे एक अविस्मरणीय अनुभव आहे, कारण हे प्रदर्शन त्याच्या पाहुण्यांसाठी स्वागतार्ह वातावरण तयार करते आणि मशीन टूल उद्योगाला भव्यतेने दाखवते. प्रत्येक व्यवसायिक पाहुण्याला आईएमटीईएक्स मध्ये सहभाग घेणे एक सन्मान मानले जाते आणि हे भारताच्या नवा आणि आत्मविश्वासपूर्ण दृष्टीकोणाला सादर करणारे एक शीर्ष प्रदर्शन आहे.

व्यापारी आघाडी तर्फे शालेय साहित्य वाटप

भारतीय जनता पार्टीचे शहर जिल्हाध्यक्ष माननीय श्री शिरीष बोराळकर साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता व्यापारी आघाडी व भारतीय जनता व्यापारी महिला आघाडी यांचे संयुक्त ने आज रोजी शालेय साहित्य वाटप करण्यात आला व गरजू विद्यार्थ्यांना शालेय वस्तु वाटप करण्यात आली या प्रसंगी कार्यक्रमामध्ये भाजपा व्यापारी आघाडीचे अध्यक्ष हितेश कांकरिया,

सर चिटणीस मधुर अग्रवाल, संतोष वाघळे, उपाध्यक्ष संजय भंसाली, रोहित छाजेड़,राहुल टेटवार, नारायण बियानी, कोषाध्यक्ष शिवदयाल राठी , मीडिया प्रमुख अनूप अग्रवाल व सौ.वंदना शाह महिला व्यापारी आघाडी अध्यक्षा, सरचीटणीस रीता कोठावाला ,श्रावनी शाह,अंतरा बैनर्जी, उपाध्यक्ष रुपाली मोरे , प्रूथा पटेल व इतर पदाधिकारी उपस्थित होते....

वाई बाजार येथे संगितमय श्री शिव महापुराण कथेचे आयोजन

तभा वृत्तसेवा
माहूर,दि. २६ डिसेंबर

: तालुक्यातील वाई बाजार येथे दि.२८ डिसेंबर २०२४ ते ४ जानेवारी २०२५ असा मावळते वर्ष ते नविन वर्षाच्या प्रारंभी या कालावधी दरम्यान श्री शिव महापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे.तेव्हा पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी श्री शिव महापुराण कथेसह सप्ताहातील नामांकित किर्तनकारांच्या धार्मिक, प्रबोधनात्मक किर्तनाचा व झाकीचा आवश्य लाभ घ्यावा,असे आवाहन आयोजकासह वाई बाजार वासियांनी केले आहे.

सात दिवसीय श्री शिव महापुराण कथेचे प्रवक्ते श्री.श्री. श्री १००८ श्री महंत ज्ञानेश्वर भारती महाराज (आचार्य श्री.ह.भ.प बाळु महाराज काकाणी कवठा बाजार) यांच्या सुमधूर वाणीतून होणार आहे. जीवनात सर्वत्र चैतन्य यावे, दु:खी कष्टी वाटणाऱ्या मनाचा कीर्तन व प्रवचन श्रवणाने अध्यात्मिक विकास होऊन मनातील दुर्बलता नष्ट व्हावी यासाठी मनुष्याने प्रभुनामाच्या संकिर्तनाद्वारे यथार्थ सत्याची प्राप्ती केली पाहिजे आणि ती प्राप्ती होण्यास कलीकाळात ईश्वरचिंतन,भजन,

किर्तन हिच उत्तम लोक (वैकुंठ लोक) प्राप्तीची कल्याणकारी साधने आहेत; हा भाव मनी धरुन दि.२८ डिसेंबर २०२४ पासून ते ३ जानेवारी २०२५ या सात दिवसीय शुभपर्वकाळात श्री शिव महापुराण कथेचे व किर्तनरुपी पर्वाचे आयोजन करण्यात आले आहे. यादरम्यान दररोज पहाटे ५ ते ६ या वेळेत काकड आरती, सकाळी ७ ते ९ ग्रामगिता पारायण, दुपारी १ ते ४ : ३० संगीतमय शिव महापुराण कथा, सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ व रात्री ८ ते १० हरी कीर्तन होणार आहे.

विषेश म्हणजे दि.२९ डिसेंबर रोज रविवारला श्री संत गुरुवर्य शहापुरी महाराज यांचे रात्री ८ ते १० संकिर्तनाचा कार्यक्रम झाल्यानंतर रात्री ११ वाजता पासून महापुजेला सुरुवात होणार आहे. तर,शेवटच्या दिवशी (४.जाने २०२५) ला सकाळी ८ ते १० ग्रंथाची मिरवणूक व सकाळी ११ ते १ कथेचे प्रवक्ते श्री.श्री.श्री १००८ श्री महंत ज्ञानेश्वर भारती महाराज यांचे काल्याचे किर्तन राहणार आहे. त्यानंतर लगेच महाप्रसादाला प्रारंभ होणार आहे. वाई बाजारसह पंचक्रोशीतील भाविकांनी या धार्मिक आयोजनाच्या सप्ताहाचा अवश्य लाभ घ्यावा, असे आव्हान आयोजकांकडून करण्यात आले आहे.

मुलांपुढे आदर्श निर्माण करण्यासाठी पालकांनी मोबाईलचा नाद सोडवावा : आयुक्त यशवंत डांगे

प्रगत विद्यालयाच्या स्नेहसंमेलनातील सांस्कृतिक कार्यक्रम रंगला

नगर - मोबाईलच्या अती वापरामुळे मोबाईल शाप की वरदान असा प्रश्न उभा राहिला आहे. पालक रोज तासंतास मोबाईल पाहतात, त्याचा चांगला तर नाहीच पण किती दुष्परिणाम होत असेल याचा कधी तुम्ही विचार केला आहे का ? त्यामुळे मुलांपुढे आदर्श निर्माण करण्यासाठी पालकांनी मोबाईलचा नाद सोडून कमीतकमी व कामापुरताच वापर करावा. विद्यार्थ्यांनी शालेय जीवनात यशस्वी होण्यासाठी हारजीतचा विचार न करता प्रत्येक स्पर्धेत भाग घ्यावा. प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्याची क्षमता तुमच्यात आल्यावर तुम्ही नक्कीच यशस्वी व्हाल, असे प्रतिपादन अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांनी केले.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी संचलित वि.ल.कुलकर्णी प्राथमिक शाळा तसेच प्रगत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या स्नेहसंमेलनाचे उद्घाटन अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते सरस्वती देवीच्या पूजनाने व दीपप्रज्वलनाने झाले. यावेळी प्रमुख पाहुणे ज्येष्ठ रंगकर्मी प्रा.स्नेहा रानाडे, शाळेचे माजी विद्यार्थी सीए. अमित पोखरण व सीए.सोनम मुनोत उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती विजया रेखी होत्या. यावेळी उपाध्यक्ष चंद्रशेखर कुलकर्णी, सेक्रेटरी किरण वैकर, खजिनदार उमेश रेखे, सदस्य महेश रेखे, दि.ना. जोशी, उदय भणगे, उमेश नगरकर, महाविद्यालयाचे प्राचार्य सुनील पंडित, मुख्याध्यापिका प्रतिभा धरम व पूर्व माध्यमिक विभाग प्रमुख अनुराधा जोशी आदींसह सर्व शिक्षक विद्यार्थी, पालक उपस्थित होते. यावेळी मुख्याध्यापिका प्रतिभा धरम यांचा सेवानिवृत्ती बद्दल सन्मान करणात आला

यावेळी शाळेतील बालवाडी ते इयत्ता १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. यात चिमुरड्यांनी सादर केलेले किलबिल किलबिल पक्षि बोलती..., विठूचा गजर, बाल शिवाजी महाराजांचा पाळणा, रामायण, देशभक्ती आदी विषयांवर विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट नृत्य करून पालकांची दाद मिळवली. तसच वृद्धाश्रम नाटिकेच्या सादरीकरणाने प्रेक्षकांचे डोळे पाणावले. विठूचा गजर करत विद्यार्थ्यांनी केलेल्या रिंगणात पांडुरंगही नाचला. स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी सादर केलेला सांस्कृतिक कार्यक्रम रंगला.

विजया रेखे यांनी संस्थेच्या स्वतःच्या नव्या इमारतीचे काम लवकरच सुरु होणार असल्यानेया कामास सर्व माजी विद्यार्थी व पालकांनी मदत करावी, असे आवाहन केले. प्रास्ताविकात प्राचार्य सुनील पंडित यांनी शाळांच्या प्रगतीचा आढावा घेत जेईई, आयआयटी, निट सारख्या महत्त्वाच्या परिक्षांमध्ये शाळेतील विद्यार्थी विशेष नैपुण्य मिळवत आहेत. अभ्यासा बरोबरच कला, क्रीडा, सांस्कृतिक क्षेत्रात विद्यार्थी चमकत आहेत.

जावक क्रमांक jtcc/६५८९/२०२४
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
बाबा पेट्रोल पंपाजवळ, अदालत रोड,
छत्रपती संभाजीनगर- ४३१००१.
दुरध्वनी : ०२४०-२३३११६१
दिनांक, २३/१२/२०२४.

जाहीर नोटीस

मा.श्री.रा.स.पावसकर, धर्मादाय सह आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग,
छत्रपती संभाजीनगर यांचे न्यायालयात,
श्री उदासी बुवा मठ, पैठण ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर. या न्यासास न्यासाचा कारभार पाहण्यासाठी विश्वस्त नेमणेबाबतचा प्रस्ताव
अर्ज.क्रं.१२/२०२४ कलम-४७ नों.क्रं.ए-१४६१ मध्ये जाहीर प्रगटन

अर्जदार : श्री. नानक नारायणदास वेदी व इतर ०१.

विरुद्ध

गैरअर्जदार : कुणीही नाही.

सदरील प्रस्ताव हा मा.धर्मादाय सह आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर कार्यालय येथे दाखल करण्यात आलेला असुन त्यात या न्यासाचा कारभार पाहण्यासाठी विश्वस्त होणेकामी नि.क्र.०१ नुसार खालील व्यक्तीचे नाव सुचवले आहे.

क्र.०१ डॉ. जीवन नारायणदास वेदी.
रा.उदासी मठ, पैठण ता. पैठण
जि. औरंगाबाद. ह.मु.रा. संजीवन,
प्लॉट नं. ३८, नागभुमी लेआऊट,
छत्रपती नगर, नागपुर. ४४००१५

सदर प्रस्तावात मा.धर्मादाय सह आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी दि. ०३.१२.२०२४ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार उपरोक्त विश्वस्त होण्यासाठी प्राप्त झालेल्या अर्जदारांच्या नावाबाबत कोणास आक्षेप किंवा काही सांगावयाचे असल्यास त्यांनी त्यांचा आक्षेप संबंधित कागदपत्रांसह लेखी स्वरुपात दि.१५.०१.२०२५ पुर्वी धर्मादाय सह आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे सादर करावा, तसेच मुदतीत आक्षेप सादर न केल्यास कोणास काही सांगायचे नाही असे समजून चौकशी पूर्ण केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश पारीत केले जातील.

आज दि.२३.१२.२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व मा.धर्मादाय सह आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग छत्रपती संभाजीनगर यांच्या शिक्क्यानिशी सदरचे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

आदेशावरुन

(गो.हि. पाटील)
शिरस्तेदार

(स.दे. अग्निहोत्री)
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर विभाग,
छत्रपती संभाजीनगर.

वकील वर्ग हा न्यायव्यवस्थेतील अविभाज्य भाग : प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू शेंडे

कौटुंबिक न्यायालयाच्या बारच्या नव्या वर्षाच्या दिनदर्शिकेचे उत्साहात प्रकाशन

नगर - कौटुंबिक न्यायालय हे अतिशय संवेदनशील न्यायालय आहे. नाती घट्ट करत संवेदना जिवंत ठेवणारे संवेदनशील न्यायाधीश, समुपदेशक व वकील येथे असल्याने एका कुटुंबाचेच द्योतक येथे आहेत. वकील वर्ग हा न्यायव्यवस्थेतील अविभाज्य भाग असल्याने त्यांच्या शिवाय न्यायालयीन काम होऊच शकत नाही. त्यामूळे वकिलांच्या ज्या समस्या व अडचणी आहेत त्या न्यायव्यवस्थेच्या अडचणी असल्याने त्या सोडवण्यास प्राधान्य देत गुण्यागोविंदाने काम करू. नगरचा बार गुण्यागोविंदाने कामकाजासाठी विख्यात आहे. कौटुंबिक न्यायालय बारचा दरवर्षी नव्या स्वरुपातील दिनदर्शिकेचा उपक्रम कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू शेंडे यांनी केले.

जुन्या न्यायालयातील कौटुंबिक न्यायालय बार असोसिएशनच्या सन २०२५ या नव्या वर्षाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू शेंडे यांच्या हस्ते व कौटुंबिक न्यायालयाच्या न्यायाधीश संगीता भालेराव यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात झाले. यावेळी कौटुंबिक न्यायालय बार असोसिएशनचे अध्यक्ष लक्ष्मण कचरे, उपाध्यक्ष सुरेश लगड, सचिव राजेश कावरे, अहमदनगर बार असोसिएशनचे नूतन अध्यक्ष राजेश कातोरे, उपाध्यक्ष वैभव आघाव, सचिव संदीप बुरके आदींसह पदाधिकारी व वकील उपस्थित होते.

यावेळी न्या.संगीता भालेराव म्हणल्या, कौटुंबिक न्यायालयात एखाद्या कुटुंबाप्रमाणे खेळीमेळीत कामकाज चालत असते. या न्यायालयात दरवर्षी दिनदर्शिका प्रसिद्ध करण्याचा शिरस्ता गेल्या ११ वर्षांपासून सुरु आहे. एक स्तुत्य हा उपक्रम आहे. ही केवळ दिनदर्शिका नसून गोड आठवणींचा साठा यामध्ये आहे. हा उपक्रम असाच अविरत चालू ठेवा. येणाऱ्या नव्या वर्षात सर्वांकडून चांगले काम घडो, या सदिच्छा.

प्रास्ताविकात लक्ष्मण कचरे म्हणाले, २०१३ सालापासून या न्यायालयात अखंडितपणे दरवर्षी दिनदर्शिका प्रकाशित केली जाते. वकील, न्यायाधीशांना व कर्मचाऱ्यांनाही ही दिनदर्शिका उपयुक्त असते. झालेल्या उपक्रमाची माहितीही यात आहे.

माजी अध्यक्ष शिवाजीराव कराळे यांनी कौटुंबिक नायालायाचे कार्यक्षेत्र वाढण्याल्याने वकील, न्यायाधीश व कर्मचाऱ्यांवर कामाचा खूप ताण वाढला आहे. त्यामुळे या कोर्टासाठी अतिरिक्त न्यायाधीशाची मागणी बारने केली आहे. या मागणीकडे न्या. शेंडे यांचे लक्ष वेधून न्यायाधीश अंजू शेंडे या जिल्हाच्या पहिल्या महिला प्रधान व सत्र न्यायाधीश असल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिव राजेश कावरे व सहसचिव रोहिणी उंडे यांनी केले. यावेळी अहमदनगर बार असोसिएशनच्या सर्व नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करून अभिनंदन करण्यात आले. बारचे कार्यध्यक्ष शिवाजी सांगळे यांनी आभार मानले. यावेळी राजाभाऊ शिर्के, सचिन दरेकर, ज्ञानेश्वर दाते, सुजाता बोडखे, जयेश आमले, अजिंक्य काळे, कल्याण पागर, लॉयर्स असोसिएशनचे अध्यक्ष भूषण बऱ्हाटे आदींसह व वकील उपस्थित होते.

जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर गंगापूर यांच्या न्यायालयात

दि.कि.अर्ज क. ६०६/२०२४

अर्जदार : १) सोमनाथ माणीकराव मोरे, वय ४६ वर्षे, धंदा. शेती, पुरी, ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर २) साहेबराव माणीकराव मोरे, वय ४२ वर्षे, धंदा. शेती, पुरी, ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर ३) ताराबाई बाळकृष्ण कापसे, वय ५५ वर्षे, धंदा. शेती, टाकळी, ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार : निंरक

प्रकरण : भारतीय वारसा कायदा कलम ३७२ प्रमाणे सक्सेशन प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी, वरील अर्जदारांनी या न्यायालयात सक्सेशन प्रमाणपत्र मिळण्यासाठी त्यांचे विधीज्ञ श्री. व्ही. एस. मनोरकर यांच्या मार्फत अर्ज दाखल केला असुन त्यांची थोडक्यात हकीकत अशी की, भीमाबाई भ्र. माणिकराव मोरे हया पुरी ता. गंगापूर येथील कायमच्या रहीवासी होत्या त्या दि. ०३/०३/२०१८ रोजी पुरी ता. गंगापुर येथे मयत झाल्या असून व अर्जदारांचे वडील नामे माणिकराव आसाराम मोरे हे दि. २७/०३/२००८ मयत झाले असुन त्यांना अर्जदार क. १ ते ३ हे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार क. १ ते २ हे मयताचे मुले असून अर्जदार क. ३ ही विवाहीत मुलगी आहे. मयत भीमाबाई भ्र. माणिकराव मोरे यांचे नावे बँक खाते क. २०२१९९४०४४८ बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा ढोरेगाव ता. गंगापुर येथे रक्कम ३१६७२९.३१ लाख असुन सदरची रक्कम व पुढील व्याज प्राप्त करण्यासाठी अर्जदारांनी सदर बँकेत संपर्क साधला असता बँकेने वारस प्रमाणपत्राचे मागणी केल्याने सदरचा अर्ज अर्जदारांना करणे भाग पडले आहे.

त्याआर्थी, तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या सदर अर्जास व अर्जातील मागणीस कोणाचा काही आपक्षेप उजर असल्यास सबंधीतांनी त्यांचा आक्षेप उजर या न्यायालयात हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत नोंदवावा, मुदतीनंतर आलेले आक्षेप उजर लक्षात घेतले जाणार नाहीत. व हे न्यायालयत अर्जदारांच्या हक्कात त्यांनी केलेले विनंतीप्रमाणे सक्सेशन प्रमाणपत्र जारी करील. करीता सदरचे प्रगटन या न्यायालयाच्या सही शिक्क्यानिशी दिले आहे. दि. २६/१२/२४

सहाय्यक अधिक्षक

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

जनतेच्या हिताचे उच्चांक गाठण्यासाठी भरिव कामगिरी करणार - ना.साकोरे

राज्याचे राज्यमंत्री ना.मेघना साकोरे यांचा जिंतूरात नागरी सत्कार संपन्न

जिंतूर,/प्रतिनिधी: सेलू मतदारसंघ ही माझी मायभूमी आहे तिच्या कल्याणासाठी सर्वोतोपरी प्रयत तर करणारच, त्यासोबत पक्षाने आमदारकीच्या दुसऱ्याच यशानंतर माझ्यावर विश्वास टाकून अतिशय महत्त्वपूर्ण खाते देऊन राज्य मंत्रीपदाची जबाबदारी सोपवली. मी ते पूर्ण निष्ठेने पार पाडून जनतेच्या हिताचे उच्चांक गाठण्यासाठी भरीव कामगिरी करणार असल्याची ग्वाही राज्यमंत्री ना. मेघनाताई बोर्डीकर यांनी जिंतूरकरांच्या नागरी सत्कार सोहळ्यात दिली.

ना. मेघनाताई बोर्डीकर यांना राज्यमंत्री पद मिळाल्यानंतर प्रथमच जिंतूर नगरीत आगमन झाले. बुधवार २५ डिसेंबर रोजी शहरातील बाजार समितीच्या मैदानात नागरी समितीच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सत्काराला उत्तर देताना राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर बोलत होत्या. यावेळी मंचावर माजी आ रामप्रसाद बोर्डीकर, सौ. मीनाताई बोर्डीकर, गंगाधर बोर्डीकर, भावनाताई बोर्डीकर, ॲड. हरिहरराव देशमुख, संदीप शर्मा महाराज, ॲड. सुंदरराव चव्हाण, सुरेश भुमरे, ब्रिजगोपाल तोष्णीवाल, प्रभाकर वाधीकर, विनोद दुधगावकर, महेश चेतन महाराज, अमृतेश्वर महाराज, प्रताप देशमुख, सचिन गोरे, दिपक महाराज, रमेश महाराज जोगवाडकर, बंडू महाराज, गरड महाराज, गोविंद थिटे, सपनाताई यादव बोर्डीकर, नैनाताई बोर्डीकर, मुकुंद सावजी कळमकर, शहाजी शेळके आदींची उपस्थिती होती. यावेळी नागरी सत्कार समितीच्या पदाधिकाऱ्यांनी ना. मेघनाताई बोर्डीकर यांच्यासह माजी आ. रामप्रसाद बोर्डीकर

आणि मीनाताई बोर्डीकर यांचा भगवान श्रीरामची मूर्ती देऊन भव्य सत्कार करण्यात आला. याप्रसंगी पुढे बोलतांना ना. मेघनाताई म्हणाल्या की, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विरोधकांनी जाती जातीत भेद निर्माण केला, षडयंत्र रचले होते. पण राजकारणात पदार्पण केल्यापासून मी कोणताही भेदभाव न करता सर्वांना समान घेऊन काम केले. सत्तेतील अडीच वर्षांत विकासाची गंगा तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयतांची पराकाष्ठा केली. जनतेने विरोधकांच्या भूलथापांना बळी न पडता माझ्या विकासकामांची पावती देत मला सलग दुसऱ्यांदा सेवेची संधी दिली. भाजपाने माझ्यावर राज्यमंत्र्यांची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपवली आहे. राज्यातील महिलांना सक्षम करणार, सोबतच शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी वेगवेगळ्या योजना आणून भरीव कामगिरी करणार आहे. यापुढे मी सत्तेत असो किंवा नसो मी माझे अखंड आयुष्य जनतेच्या सेवेसाठी अर्पण केले असल्याचे उदगारही त्यांनी काढले. या सत्कार सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी गोविंद थिटे, वसंतराव शिंदे, ब्रिजगोपाल तोष्णीवाल, आत्माराम पवार, सुनील भोंबे, प्रमोद चव्हाण, डॉ पंडित दराडे, गोविंद दायमा, अभिजित पारवे, ॲड गोपाळ रोकडे, ॲड सुनील बुधवंत, किरण वट्टमवार, प्रभाकर वाघिकर, एकनाथ देशमुख, सत्यानारायण शर्मा, संजय कोकडवार, संतोष देशमुख डॉ दुर्गादास कान्हडकर, मतीन तांबोळी, प्रदीप चौधरी, संदीप लकडे, विकास जाधव, गिरीष जोशी, डॉ देवराज कन्हाळे, भगवानराव वटाणे, शेख अथर, प्रकाश पवार, सुनील खिस्ते, सत्यानारायण दरगड, सुभाष काबरा, भगवान देशमुख, कैलास खंदारे, गजानन घुगे, शिवाजी काळे, प्रभाकर दराडे, रवी घुगे, पप्पू डोंबे, गजानन चव्हाण, सागर शिंदे, संतोष ढोणे, रवी रणबावळे, मंगेश घुगे, रमेश धवळे, संदीप भुतडा, रमण तोषणीवाल, संतोष माने, युवराज दुधगावकर, रामप्रसाद घुले, जगदीश घुगे आदींनी अथक परिश्रम घेतले. पन्नास वर्षाच्या कार्यकिर्दीत सर्वाधिक आनंद झाला माजी आ बोर्डीकर

जिंतूर सेलू मतदारसंघासह परभणी जिल्ह्याच्या सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी भाजपा पक्षश्रेष्ठिनी मेघना बोर्डीकरांच्या रुपात राज्य मंत्री पदाची संधी उपलब्ध करून दिली. आता बोर्डीकर परिवार इथेच थांबणार नाही. तर आणखीन अनेक इतिहास घडवणार, बोर्डीकर कुटुंब सत्तेत राहील किंवा राहणार नाही, पण जनतेच्या सेवेत कायमस्वरूपी राहील. मी मंत्रिपदासाठी तब्बल पंचवीस वर्षे स्वप्न बघितले, पण स्वप्न साकार झाले नाही. माझे स्वप्न लेकीच्या रुपात पूर्ण झाल्याने पन्नास वर्षाच्या कार्यकिर्दीत सर्वाधिक आनंद झाले आहे. माजी आ. रामप्रसाद बोर्डीकर.

संक्षिप्त वृत्त...

डॉ.चांडक डॉ.दौलतराव लहाने स्मृती पुरस्काराने सन्मानीत

परभणी,/प्रतिनिधी : अरुणोदय प्रतिष्ठाण, पुणे व डॉ. दौलतराव लहाने मित्र परिवार यांच्या वतीने या वर्षीचा 'डॉ. दौलतराव लहाने स्मृती पुरस्कार २०२४' परभणी येथील होमिओपॅथिक अकॅडमी ऑफ रिसर्च अँड चॅरिटीज या संस्थेचे अध्यक्ष डॉ. पवन सत्यानारायण चांडक यांना देऊन सन्मानित करण्यात आले.

या प्रसंगी कला, क्रिडा, साहित्या, संस्कृती, आरोग्य व सामाजिक कार्य या क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा देखील गौरव करण्यात आला. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अजय दंडे, डॉ. देवेंद्र पाटील, डॉ. जतीन शहा, डॉ. अनुपमा पाथ्रीकर, श्री. विकास महाजन, डॉ. राजीव नाईक, डॉ. आशिष भगत , डॉ. उज्वला दहिफळे आदी मान्यवर उपस्थित होते. या पुरस्कार सोहळ्यास डॉ. किरण गोरे, डॉ. अमित बोरगावकर, परभणीहुन प्रकाश डुबे, रमा मुंदडा, सत्यानारायण चांडक, सागर लखोटिया यांची आवर्जून उपस्थिती होती.

शनिवारी ॲड.सतिश देशपांडे यांचे व्याख्यानाचे आयोजन

परभणी,/प्रतिनिधी : लोकमान्य नगरातील सावित्रीबाई फुले मुलींचे हायस्कुलमध्ये शनिवारी (दि.२८) सायंकाळी ५ वाजता इतिहास संशोधक व अभ्यासक ॲड. सतिश देशपांडे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. ॲड. देशपांडे हे 'राजस्थानचा गौरवशाली इतिहास' या विषयावर विचार मांडणार आहेत. या कार्यक्रमास नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन 'शेषराव देशमुख प्रतिष्ठाण'चे अध्यक्ष ॲड. दिपक शेषराव देशमुख यांनी केले आहे.

न्याय मिळेपर्यंत सूर्यवंशी कुटूंबियांच्या पाठीशी- मनोज जरांगे पाटील

परभणी,/प्रतिनिधी : पोलिसांच्या अमानूष मारहाणीमुळे मृत्यू पावलेल्या स्व. सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटूंबियांना न्याय मिळेपर्यंत आपण त्यांच्या पाठीशी राहू, असे आश्वासन मराठायोध्दा मनोज जरांगे पाटील यांनी दिले.

जरांगे पाटील हे बुधवारी (दि.२५) जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. दुपारी त्यांनी येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळा परिसरातील आंदोलन मैदानात सुरू असलेल्या धरणे आंदोलनस्थळी भेट दिली. त्यानंतर न्यायालयीन कोठडीत मरण पावलेल्या सोमनाथ सुर्यवंशी यांच्या कुटूंबियांची भेट घेवून सांत्वन केले. तेच न्याय मिळेपर्यंत आपण कुटूंबियांच्या पाठीशी राहणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी जरांगे यांना परभणीत झालेल्या संपुर्ण घटनाक्रमाची माहिती देण्यात आली.

यावेळी जरांगे यांनी, सोमनाथला पोलिसांनी अमानुषपणे मारहाण केली असून मुख्यमंत्री व गृहमंत्र्यांनी त्यांना पाठीशी घालू नये आणि सुर्यवंशी कुटुंबाला न्याय मिळाला पाहिजे, असे नमूद करीत कुटुंबियांनी केलेल्या सर्व मागण्या मुख्यमंत्र्यांनी मान्य कराव्यात, त्या पुर्ण होईपर्यंत आपण त्यांच्यासोबत राहणार आहोत, सोमनाथला अमानुषपणे मारहाण करणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई झाली पाहिजे, असेही त्यांनी म्हटले.

क्रिकेटपटू विजय झोल यांच्या हस्ते क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन

सोनपेठ,/प्रतिनिधी : येथील गणेश जिनिंग मैदानावर आमदार चषक भव्य खुल्या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन बुधवारी (दि.२५) क्रिकेटपटू विजय झोल, रणजीपटू आशिष देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी मंचावर आमदार राजेश विटेकर, माजी नगराध्यक्ष चंद्रकांत राठोड, कृ.उ.बा. सभापती दशरथ सूर्यवंशी, लक्ष्मीकांत देशमुख, माजी उपनगराध्यक्ष सुहासराव काळे, ॲड. श्रीकांत विटेकर, मानवतचे माजी नगराध्यक्ष अंकुश लाड, कृउबास सभापती पंकज आंबेगावकर, संतोष लाडाने, मदनराव विटेकर, लक्ष्मण खरात, रंगनाथ रतपारखे, राजेभाऊ सावंत, श्रीराम भंडारे, रंगनाथराव रोडे यासह अनेकांची उपस्थिती होती.

सोनपेठ शहरातील श्री गणेश जिनिंगवर दरवर्षी भव्य खुल्या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा आयोजित केली जाते.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायविंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/

प्रिन्स इंग्लिश स्कुलमध्ये महाराष्ट्राची लोकधारा सांस्कृतिक कार्यक्रम साजरा

सेलू,/प्रतिनिधी: श्रीराम प्रतिष्ठान संचलित एल.के.आर. रोडगे प्रिन्स इंग्लिश स्कूल, अंतर्गत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पातील विद्यार्थ्यांनी 'महाराष्ट्राची लोकधारा' या संकल्पनेवर आधारित वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे केले.

कार्यक्रमाची सुरुवात दिपप्रज्वलन व नटराज मूर्ती पूजनाने झाली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय रोडगे, सचिव, डॉ. सविता रोडगे, प्रमुख पाहुणे डॉ. राजाराम झोडगे, संजय मुंडे, मोहम्मद इलियाज , बद्री ताठे, बद्री बरसाले, नागेश गायकवाड, आणि रामप्रसाद माघाडे, प्रशासकीय अधिकारी प्रा. महादेव साबळे, प्राचार्य कार्तिक रताला, प्रगती क्षीरसागर आदी मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक सादरीकरण करून प्रेक्षकांची मने जिंकली. यामध्ये शिवकण्या, नवरात्री गरबा, आर्मी साँग, आणि खंडेराया झाली माझी दैना अशा गाण्यांवर नृत्या सादर केले गेले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कल्पना भाबट आणि योगिता यांनी केले, तर प्रास्ताविक सुमेध जाधव यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी श्रीकृष्ण खरात यांनी आभार मानले. या कार्यक्रमाने विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळवून दिला.

वेदांत केसरी संत श्री.रंगनाथ महाराज परभणीकर गुरुजी यांच्या ५५ व्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त शोभायात्रा

जिंतूर,/प्रतिनिधी- वेदांत केसरी संत श्री रंगनाथ महाराज परभणीकर गुरुजी यांच्या ५५ व्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त जिंतूर शहरात भव्य शोभयात्रा काढण्यात आली, दरम्यान दि. २६ डिसेंबर पासून श्री नगरेश्वर मंदिरात अखंड हरिणाम सप्ताह आणि कीर्तन महोत्सव सुरु झाला आहे.

वारकरी संप्रदयात श्री रंगनाथ महाराजांना गुरू मानणारा हजारोच्या संख्येने वर्ग असून राज्यभरातील कीर्तनकारांना परभणीकर गुरुजी म्हणजे एक प्रकारचे अमृत वाणीचे रसायन आहे. त्यांच्या वेदांता च्या शिक्षणातून सोप्या भाषेत अनेक ग्रंथ प्रसिद्ध आहेत. गुरुजींची यांचे जन्म स्थळ सोनपेठ आहे तर परभणी शहरात समाधी स्थळ असून त्या ठिकाणी सुद्धा भव्य कार्यक्रम होतात गुरुजींच निर्वाण परभणीत मार्गशिष शु एकादशी १९७० रोजी झाले होते त्यावेळी मोक्षयात्रेत त्या काळीच्या फोटो मध्ये गुरुजींच्या

कंठात साक्षात विठ्ठल भगवन्ताचे छायाचित्र उमटले अश्या महान विभूतीच्या पुण्यतिथी निमित्त राज्यभरात आचार्य महेश महाराज जिंतूरकर यांच्या आवाहणातून सर्वत्र भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. आज जिंतूर शहरात प्रमुख मार्गांवरून हि शोभयात्रा काढण्यात आली यात सर्व महिला पुरुष भक्त मंडळी सहभागी होती तर नरसी नामदेव येथील वारकरी शिक्षण प्रसारक मंडळ च्या बाल भक्तांनी या शोभयात्रेत सहभाग घेऊन आपल्या विविध कला भजन अभंग सादर करू जिंतूरकरांचे लक्ष वेधून घेतले श्री नगरेश्वर मंदिरात रंगनाथ महाराजांच्या परम्परेतील ह भ प रमेश महाराज जोगवाडकर यांनी प्रवचन करून सर्वांनी गुलाल पुष्पाजली वाहिली आरती महप्रसादाने सांगता झाली. या निमित्त दररोज रात्री ते८ १० महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तन कारांचे कीर्तन महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. जिंतूर मध्ये श्री वेदांत केसरी श्री रंगनाथ महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त भव्य शोभा यात्रा काढण्यात आली . या मिरवणुकीमध्ये गोल रिंगण,महिलांच्या फुगडी, वारकरी मुलांनी आपल्या वेगवेगळ्या आकर्षक झ्याक्या करून नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. त्या वेळी आर्यवैश्य समाजाचे महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खराब रस्ते त्यावर अतिक्रमण परभणी शहरात लोकप्रतिनिधीचे अस्तित्वच नाही

परभणी,/प्रतिनिधी: गेल्या पंधरा दिवसांपासून या शहराचा धावत्या दौरा करणाऱ्या विविध पक्षांच्या वरिष्ठ नेतेमंडळींसह पदाधिकाऱ्यांनी महानगरांतर्गत रस्त्याच्या भयावह अवस्थेसह बेसुमार अतिक्रमणांबद्दल या जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींवर व प्रशासनावर गंभीर प्रकारचे ताशेरे ओढून परभणीकरांच्या संयमाबद्दल आश्चर्य व्यक्त केले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळा परिसरातील भारतीय संविधानाच्या प्रतिकृतीच्या विटंबनेच्या प्रकरणासह स्व. सोमनाथ सूर्यवंशी व आंबेडकरी चळवळीतील अग्रगण्य ज्येष्ठ नेते स्व. विजय वाकोडे यांच्या कुटूंबियांच्या सांत्वनाकरीता विविध पक्षातील राज्य व राष्ट्रीय पातळीवरील वरिष्ठ नेते मंडळींनी व पदाधिकाऱ्यांनी गेल्या चौदा दिवसात परभणीत धाव घेतली. दोन्ही कुटूंबियांच्या गाठीभेटी घेवून त्यांचे सांत्वन केले. निश्चितच न्याय मिळवून देवू, अशी ग्वाही दिली. विटंबनेसह दगडफेक व जाळपोळीच्या घटनांचा निषेध केला. प्रशासनाच्या उदासिनतेबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली.

गेल्या चौदा दिवसात या शहराचा काही तासांचा धावता दौरा केलेल्या वरिष्ठ नेतेमंडळींसह पदाधिकाऱ्यांनी या दौऱ्यातून शहरांतर्गत भयावह अवस्थेतील रस्ते, प्रचंड असे धूळीचे लोळ व चौकांसह रस्त्या रस्त्यावरील दुतर्फा बेसुमार अतिक्रमणे पाहून तीव्र संताप व्यक्त केला. परभणी हे जिल्हा स्थान आहे. महानगरपालिका अस्तित्वात आहे. एवढी मोठी लोकसंख्या आहे, असे असतांनासुध्दा या महानगरातील पूर्णतः उखडलेल्या खड्डेमय व भयावह अवस्थेतील या रस्त्यांच्या स्थितीबद्दल लोकप्रतिनिधींना व संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांना थोडीफारसुध्दा लाज वाटत नाही का? अशी संतप्त प्रतिक्रिया राज्य व राष्ट्रीय पातळीवरील या वरिष्ठ नेतेमंडळींनी सहजपणे व्यक्त केली. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी या दौऱ्या दरम्यान आपल्या सहकाऱ्यांना रस्त्यांच्या या दुरावस्थेबद्दल प्रश्नांची सरबत्ती केली तेव्हा सहकारी नेतेमंडळींनी फावल्या वेळेत स्थानिक नेतेमंडळींना त्या गोष्टीची जाणीव करुन दिली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनीही शहरांतर्गत नवामोंढा, गुलशनाबाग, सुपरमार्केट रोड तेथून नांदखेडा रोड वगैरे भागातील भयावह अवस्थेतील या रस्त्यांवरुन वाहनाद्वारे प्रवास करतांना वाहनातील आपल्या सहकाऱ्यांबरोबर रस्त्याच्या दुरावस्थेबद्दल तीव्र खंत व्यक्त केली. परभणीकर खरोखरच संयमी आहेत, त्यांचा अंत पाहु नका, अशी सहज प्रतिक्रिया व्यक्त केली. तर राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही आपल्या दौऱ्यातून नवा मोंढा, गुलशनाबाग वगैरे भागातील रस्त्यांची अवस्था पाहून खेड्या पाड्यातील पांदन रस्ते बरे, अशी प्रतिक्रिया दिली. पश्चिम महाराष्ट्रात असे रस्ते आढळले तर जनतेने आमचे गळे धरले असते, असे म्हटले.

मालेवाडी येथे डॉ.पंजाबराव देशमुख नैसर्गीक शेती मिशन प्रशिक्षण संपन्न

गंगाखेड,/प्रतिनिधी- तालुका कृषी अधिकारी गंगाखेड या अंतर्गत तालुका कृषी अधिकारी निरस साहेब बीटीएम साळुंखे साहेब, कृषी सहाय्यक व कृषी पर्यवेक्षक रमेश फड , बालाजी कोरडे यांनी उपस्थित शेतकरी बांधवांना नैसर्गिक शेती बाबत १० ड्रम जैविक निविष्ठा उत्पादन युनिट, दशपर्णी अर्क जीवामृत ,सीपीपी कल्चर चा वापर व खत निर्मिती इत्यादी बाबत उपस्थित शेतकरी बांधवांना मार्गदर्शन केले. तसेच गावातील शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सहाशे रुपये ब्रासची रेती सामान्यांना मिळणे कठीण

शासनाचे नवीन रेती धोरण ठरतेय कुचकामी; जुन्या पद्धतीने रेती घाट सोडावेत.

सोनपेठ,/प्रतिनिधी- नागरिकांना स्वस्त दरानं वाळू (रेती) मिळावी आणि अवैध वाळू उपशाला आळा बसावा, या उद्देशानं महाराष्ट्र सरकारनं नवीन वाळू धोरण जाहीर केलं आहे. एकेकाळी २००० रुपये ब्रास मिळणारी वाळू महाराष्ट्र राज्यात केवळ ६०० रुपयांना मिळणार असल्याचे सांगितले होते.परंतु शासनाच्या धारासूर व सावंगी (ता.गंगाखेड) येथील डेपो वरुन गेल्या वर्षी हीच रेती ३००० रुपये ब्रास प्रमाणे जाग्यावरुन भरुन दिली. त्यामुळे सामान्य बांधकाम धारकांच्या खिशाला मोठी झळ सोसावी लागली. आणि शासनाचे नवीन रेती धोरण हे कुचकामी ठरले. नवीन धोरणानुसार, सर्वसामान्य नागरिकांना ६०० रुपये प्रती ब्रास किंवा १३३ रुपये प्रती मेट्रिक टन इतक्या दरानं डेपोवर वाळू मिळणार असून डेपो पासून पुढील वाहतुकीचा खर्च मात्र नागरिकांना करावा लागणार असल्याचे शासनाकडून सांगितले गेले. परंतू गतवर्षी गंगाखेड तालुक्यातील मैराळ सावंगी आणि धारासूर येथील घाटावरुन ३ ते ४ हजार रुपये ब्रास प्रमाणे ठेकेदाराकडून रेतीची विक्री करण्यात आली. याबाबत सर्वच

प्रशासनातील अधिकारी मुक गिळून गप्प असल्याचे पहावयास मिळाले. राज्यातील गोरगरीब व सर्वसामान्य नागरिकांना स्वतःच्या स्वप्नातील घर बांधण्यासाठी लागणारी रेती स्वस्तात व सहज उपलब्ध व्हावी या उद्देशाने शासनाने करोडो रुपयांचा महसूल बुडवून नवीन धोरण आखले. त्याम ध्ये प्रति ब्रास सहाशे रुपये दराने डेपो वरून रेती मिळणार असल्याचे सांगितले गेले.एखाद्या व्यक्तीला बांधकामासाठी वाळू हवी असल्यास वाळूची मागणी ऑनलाईन नोंदवता येणार असल्याची माहिती महसूल मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिली होती.परंतू गतवर्षी गंगाखेड तालुक्यातील वरील रेती घाटावरून रेती खरेदीसाठी कोणालाही ऑनलाइन नोंदणी करता आली नाही. त्याचे कारण असे होते की, वाळूच्या खरेदीसाठी शासनाच्या वेबसाईटवर जाऊन ऑनलाईन नोंदणी करावी लागते परंतु त्यासाठी संबंधित रेती डेपोवर रेतीचा स्टॉक उपलब्ध असावा लागतो. आणि हीच खरी अधिकाऱ्यांच्या संमतीने टेंडर धारकांनी मारलेली मेक असते!. गतवर्षी रेती खरेदीसाठी संबंधित टेंडर धारक हे रेती डेपोवर वाळूची उपलब्धता दाखवत नव्हते त्यामुळे वाळूची नोंदणी करता येत नव्हती. परंतू रात्री बे रात्रीला शंभर दोनशे ब्रास वाळूची उपलब्धता दाखवून लागलीच कांही मिनिटातच टेंडर धारक स्वतः तात्काळ नोंदणी करून डेपो वरील वाळू संपवून टाकायचे..! यासाठी त्यांच्यातील काही टीम नातेवाईकांकडे फिरून आधार कार्ड गोळा करत होती तर त्यांचेच काही लोक गोळा केलेल्या आधार कार्डा वरुन एकिकडे रेती उपलब्ध दाखवून दुसरीकडे तात्काळ बुकिंग करून स्टॉक संपल्याचे दाखवत होते. या बाबतीत प्रशासनातील एकही अधिकारी बोलण्यास तयार नव्हता. संबंधित मैराळ सावंगी व धारासूर रेती घटावरून गुत्तेदारांनी उपसा करून ऑनलाइन बुकिंग केलेली रेती ही सर्वसामान्यांना न देता ती मोठ मोठ्या गुत्तेदार व धनदांडग्या लोकांना ६ ते ७ हजार रुपये प्रति ब्रास प्रमाणे विक्री केली. तसेच रेती डेपो वरून रेतीची खरेदी करून वाहतूक करू पाहणाऱ्या वाहनांना प्रति ब्रास ४ हजार रुपये प्रमाणे डेपो वरून विक्री केल्याचे पहावयास मिळाले.ते सुद्धा गौन खनिज पावती शिवाय! त्यामुळे सर्वसामान्यांना वाळू स्वस्तात कुठे मिळाली? असा सवाल नागरिकांतून उपस्थित केला जात आहे.परिणामी सोनपेठ तालुक्यातील शेकडो घरकुलधारक गेली दोन वर्षापासून रेतीच्या प्रतीक्षेत आहेत. तर मग याही वर्षी तशाच पद्धतीने टेंडर सोडले गेले तर संबंधित गुत्तेदाराचे चांगभले होणार आणि सर्वसामान्यांना रेतीही महागामध्ये खरेदी करावी लागणार आहे. शासनाचे वाळूचे नवीन धोरण हे सर्वसामान्या साठी कुचकामी ठरत असून पूर्वीचेच जुने रेती धोरण लागू करण्याची मागणी नागरिकांतून केली जात आहे.

अग्रलेख...

पूर्वसुरींच्या संघर्षाचे स्मरण

लोकमाता स्व. सुमतीताई सुकळीकर यांच्या जन्मशताब्दी वर्षाचा सांगता समारोह २४ डिसेंबर २०२४ रोजी नागपुरात पार पडला. या कार्यक्रमात भाजपाचे ज्येष्ठ नेते केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ताईंना आदरांजली अर्पण करताना वेगळ्या तारा छेडल्या. त्या तारा होत्या इतिहासाच्या. त्या तारा होत्या ताईंसारख्या भारतीय जनता पार्टीच्या पूर्वसुरींच्या योगदानाच्या, बलिदानाच्या, संघर्षाच्या! भाजपाला आज जे वैभव प्राप्त झाले आहे, ते ताईंसारख्या लोकांनी केलेल्या संघर्षाचे, कष्टाचे फलित होय आणि याची आठवण नव्या पिढीतील भाजपा कार्यकर्त्यांनी ठेवली पाहिजे, त्यांच्या त्यागाप्रति व योगदानाप्रति कृतज्ञ असले पाहिजे, असे या दोन्ही नेत्यांनी उपस्थितांना सांगितले. एका अर्थाने ते 'जरा याद करो कुर्बानी'च्या आशयाचे आवाहन होते. सुमतीताईंच्या निमित्ताने जुन्या अनेक गोष्टींना, घटनांना उजाळा मिळाला. नितीन गडकरी यांनी तर त्या काळाचे शब्दचित्र साऱ्यांपुढे उभे केले. ते म्हणाले, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत जनता पार्टीच्या चिन्हावर निवडणूक लढवली गेली तेव्हा नागपुरात अनाऊन्समेंट करायला मी फिरलो. रिक्षावर फिरायला अनेक लोक तयार नसायचे. कारण पार्टीचा रिक्षा दिसला की लोक दगड मारायचे आणि पोस्टर फाडून टाकायचे. पोस्टर्स फाडली जाऊ नयेत म्हणून विद्युत मंडळाच्या कर्मचाऱ्यांशी दोस्ती करून त्यांच्या मदतीने उंच ठिकाणी ती लावली जायची. प्रचंड कष्टाचे दिवस होते. जनसंघाबद्दल प्रचंड अपप्रचार झाला होता. पक्षाला आदर नव्हता, सन्मान नव्हता आणि लोकमान्यताही नव्हती. तरीही आमच्यासारख्या छोट्या कार्यकर्त्यांना सोबत घेऊन ताईंनी पक्षाचे काम पुढे नेले. सुमतीताई झोपडपट्टीत जाऊन लोकांची सेवा करायच्या. पक्ष आणि संघटना संकटात असतानाही ताईंनी राष्ट्रकार्य सोडले नाही. सुमतीताई व त्यांच्यासह हजारो कार्यकर्त्यांनी आयुष्यभर संघर्ष सोसला म्हणून आपल्या पक्षाला चांगले दिवस आले आहेत. आज आपल्या पक्षाला, विचारांना जागतिक मान्यता मिळाली आहे. त्याचे श्रेय ताईंसारख्या जुन्या कार्यकर्त्यांना आहे, याची जाणीव नवीन पिढीतील कार्यकर्त्यांनी ठेवणे आवश्यक आहे, असे गडकरी म्हणाले. मुख्यमंत्री फडणवीस यांनीही बालपणापासून आत्याच्या स्वरूपात वाट्याला आलेल्या ताईंच्या कार्याचा गौरव करून आपल्या भावना व्यक्त केल्या. एकुणात हा सोहळा जरी सुमतीताईंच्या जन्मशताब्दीच्या सांगतेचा असला तरी भाजपाच्या समस्त कार्यकर्त्यांसाठी नव्य प्रकारचे चिंतन आणि कृतज्ञतेचा सांगावा देणारा होता. ताई चार वेळा निवडणूक लढल्या आणि पराभूत झाल्या. त्यांना निवडणूक लढवण्याची हौस होती म्हणून त्या लढल्या नाहीत. त्यांना पक्ष आणि विचार पुढे न्यायचा होता, यासाठी त्या लढल्या. भाजपाच्या कार्यकर्त्यांनी या निष्ठेचे मर्म समजून घेतले पाहिजे. आता भाजपा हा जागतिक पातळीवर मान्यता पावलेला पक्ष झालेला आहे. दशकभराहून अधिक काळ भाजपाचे सरकार केंद्रात आहे. वीसहून अधिक राज्यांत सत्ता आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भाजपाचा बोलबाला आहे. २ खासदार ते ३०३ खासदार असा टप्पा या पक्षाने गाठला आणि नंतर सातत्याने सत्तेचे सोपान हा पक्ष चढत राहिला हे आपसूक घडलेले नाही. ते केवळ काँग्रेस आणि अन्य विचारांच्या पक्षांची पीछेहाट झाली म्हणूनही घडलेले नाही. हे घडून आले ते ताईंसारख्या कर्मठ कार्यकर्त्यांच्या संघर्षामुळे. थोडे मागे वळून पाहिले तर असे दिसते की, १९५१ मध्ये डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी भारतीय जनसंघाची स्थापना केली. सांस्कृतिक ऐक्य, आर्थिक स्वावलंबन आणि राष्ट्रवादी आदर्शांचे समर्थन करण्यासाठी जनसंघ राजकीय व्यासपीठ म्हणून उदयास आला. काँग्रेस पक्षाचे सार्वत्रिक वर्चस्व आणि प्राबल्य असलेल्या युगात जनसंघाचा आरंभ झाला तो काळ अत्यंत प्रतिकूलतेचा होता. डॉ. मुखर्जी यांनी पक्षाची सुरुवातीपासून उभारणी करण्यासाठी अथक परिश्रम घेतले. १९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत फक्त तीन जागा या पक्षाला जिंकता आल्या. १९५३ मध्ये जम्मू-काश्मीरमधील परमिट सिस्टम संपवण्याच्या प्रयत्नांदरम्यान, पोलिसांच्या ताब्यात असताना डॉ. मुखर्जी यांचे आकस्मिक निधन झाले. त्यांचा मृत्यू झाला की हत्या झाली, हे आजही गूढ आहे. राष्ट्रवादी आणि राष्ट्रप्रेमी विचारांसाठी स्वतंत्र भारताच्या इतिहासात पडलेली ही पहिली आहुती होती. जनसंघाची विचारधारा सांस्कृतिक राष्ट्रवादावर आधारलेली होती. पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्यासारख्या नेत्यांनी या विचारांचा विस्तार करून 'एकात्म मानववादा'ची संकल्पना मांडली. आध्यात्मिक आणि सांस्कृतिक मूल्यांसह आर्थिक प्रगतीची सांगड घालणारे हे तत्त्वज्ञान. आणि मार्क्सवादाला विरोध करणारा हा विचार. त्यानंतर आणिबाणीचे पर्व आले. जनसंघासह विरोधकांनी लोकशाहीच्या पुनर्स्थापनेसाठी लढा दिला. १९७७ मध्ये जनसंघाने इतर विरोधकांना सोबत घेऊन जनता पक्षाची स्थापना केली. १९७७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत जनता पक्षाच्या विजयात अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी आणि इतर नेत्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांच्या सोबत सुमतीताईंसारखे कार्यकर्ते होते. त्या साऱ्यांच्या प्रयत्नांतून स्वतंत्र भारताच्या इतिहासात प्रथमच काँग्रेसेतर पंतप्रधान म्हणून मोरारजी देसाई यांचे सरकार आले. तोही काळ मागे पडला आणि १९८० मध्ये भारतीय जनता पार्टीची स्थापना झाली. वाजपेयी आणि अडवाणी यांच्या नेतृत्वाखाली भाजपाने आपल्या राष्ट्रवादाप्रति असलेल्या बांधिलकीचा पुनरुच्चार केला. याही टप्प्यावर सुमतीताईंसारखे लोक पक्षात होते. 'एकात्म मानववाद' तत्त्वज्ञानाने भाजपाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टिकोनाला वैचारिक पाया प्रदान केला आणि परंपरेला प्रगतीशी जोडले. सुमतीताई सुकळीकर आणि इतर तळागाळातील असंख्य कार्यकर्त्यांनी पक्षाचा प्रभाव वाढवण्यासाठी अथक परिश्रम घेतले. सार्वजनिक सभा आयोजित केल्या, साहित्य वाटप केले, गरिबांची सेवा केली आणि वैयक्तिक पातळीवर मतदारांशी संवाद साधला. आजच्या भाजपाचे हे एका अर्थाने बीजारोपण होते. भाजपाची सुरुवातीच्या निवडणुकीतील कामगिरी देखील तशी माफकच होती. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, जनसंघ आणि जनता पार्टीच्या मुशीत तयार झालेले बिनीचे कार्यकर्ते व नेते असल्यामुळे त्यांच्या प्रयत्नांना यश मिळू लागले. वारंवार पराभव होऊन लढाई सुरू ठेवावी लागते, याचे धडे त्या काळच्या कार्यकर्त्यांनी आपल्या नेत्यांकडून घेतले. जनसंघ आणि जनता पार्टी यांच्याप्रमाणेच भाजपालाही आरंभी थट्टा आणि उपहासाचा सामना करावा लागला. संघर्ष संपत नव्हता आणि तो केवळ राजकीय नव्हता. घरावर तुळशीपत्र ठेवून पायाला भिंगरी लागल्यागत फिरायचे, मिळेल तेथे व मिळेल ते खायचे, कार्यकर्त्यांच्या घरीच मुक्काम करायचा, स्वस्तात स्वस्त प्रवास करायचा, मोजके कपडे, मोजक्या वस्तू. १९८० आणि १९९० चे दशक हा भाजपासाठी परिवर्तनाचा काळ होता. रामजन्मभूमी आंदोलनाने पक्षाला राष्ट्रीय राजकारणात मोठा हात दिला. वाजपेयी आणि अडवाणी यांच्या करिष्माई नेतृत्वाचा उदय झाला आणि पक्षाच्या वाटचालीचा पुढचा मार्ग सुकर झाला. अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली १३ दिवसांचे सरकार ते राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे मातब्बर सरकार असा टप्पा भाजपाने याच काळात पाहिला. आता भाजपात मोदी पर्व सुरू आहे. सलग तिसऱ्यांदा केंद्रात भाजपाचे सरकार आले आहे. भारताच्या प्रगतीची घोडदौड सुरू आहे. अशा स्थितीत कार्यकर्ते थोडेसे निवांत होणे, काहीसा उर्मटपणा येणे, स्वार्थ बोकाळणे हे सारे स्वाभाविक आहे. त्यावर मात केली पाहिजे. पूर्वसुरींच्या कष्टांमुळेच हे दिवस आपल्या वाट्याला आलेले आहेत, हे भाजपाच्या कार्यकर्त्यांनी लक्षात ठेवले पाहिजे. सत्ता माणसाला भ्रष्ट करते आणि निरंकुश सत्ता पूर्णपणे भ्रष्ट करते, असे एक सुभाषित आहे. त्या सुभाषिताचा मथितार्थ असा की, सत्तेच्या पदांवर बसलेल्यांनी पूर्वसुरींच्या संयमी आणि सहनशील अशा व्यक्तिमत्त्वांचे नेहमी स्मरण करीत राहिले पाहिजे आणि सत्तेला चिकटून येणाऱ्या दुर्गुणांपासून दूर राहिले पाहिजे. सुमतीताईंना आदरांजली अर्पण करीत असताना गडकरी आणि फडणवीस या दोन्ही नेत्यांनी केलेल्या आवाहनाचा अर्थ हाच आहे.

इतस्ततः

डॉ. विवेक राजे

राष्ट्रीय वनवासी क्रीडा स्पर्धा

सक्षम नेतृत्व मिळताच देश सर्वच क्षेत्रांत प्रगतिपथावर आहे असे आजचे चित्र आहे. अर्थ, संरक्षण, संसाधन विकास, आरोग्य अशा अनेक क्षेत्रांत होणारी प्रगती आज दृश्यमान आहे. याला अपवाद फक्त एकच क्षेत्र दिसते आहे आणि ते म्हणजे क्रीडाक्षेत्र होय. आजही ऑलिम्पिकच्या पदक तालिकेत भारताचा नंबर खालून सापडतो. खेळांचा प्रकार कोणताही असो, भारतीय संघाची कामगिरी यथातथाच असते. भारतीयांच्या क्रीडाक्षेत्रात सातत्याने पिछाडीवर असण्याला प्राकृतिक, सामाजिक आणि मानसिक अशी कारणे आहेत. पण पैशाचे पाठबळ, संधीची कमतरता आणि माहितीचा अभाव ही विशेष कारणे होत असेच म्हणावे लागते. जागतिक पातळीवर भारतीय लोकांची नसलेली नैसर्गिक शारीरिक क्षमता हे एक महत्त्वाचे प्राकृतिक कारण होय. अनेक खेळ जसे की फुटबॉल, ॲथ्लेटिक्स, व्हालिबॉल, बास्केटबॉल, बॉक्सिंग, कुस्ती या क्रीडा प्रकारात लागणारी मजबूत शारीरिक क्षमता नैसर्गिकरीत्या भारतीयांकडे नाही. हरयाणा आणि पंजाब या दोनच राज्यांतील स्त्री व पुरुषांकडे जागतिक स्तरावर वरील क्रीडा प्रकारात उत्तम कामगिरी करता येण्याजोगी शारीरिक क्षमता आढळते. इतर राज्यांमधील स्त्री-पुरुष हे निसर्गतः जागतिक प्रमाणाच्या तुलनेत कमी शारीरिक क्षमतेचे असल्याने वरील क्रीडा प्रकारात कौशल्य प्राप्त करूनही आंतरराष्ट्रीय स्तरावर पदके किंवा क्रमवारीता प्राप्त करण्यात कमी पडतात. ही नैसर्गिक मर्यादा लक्षात आल्यावर या देशातील क्रीडातज्ज्ञांनी यावर उपाययोजना शोधण्यास सुरुवात केली. तेव्हा लक्षात आले की, जागतिक स्तरावर इतर काही खेळांमध्ये उत्तम कामगिरी करणे भारतीयांना या नैसर्गिक मर्यादांसह शक्य आहे. हे खेळ म्हणजे आर्चरी, शूटिंग, ॲक्वेटिक्स, हॉकी, बॅडमिंटन यासारखे अनेक खेळ जे काही तरी 'साधनं' वापरून खेळले जातात. मग भारतीय खेळ प्राधिकरणाने भारतातील काही प्रदेश, ज्या प्रदेशात ठरावीक कौशल्यांची निसर्गतः जोपासना केली जाते, असे प्रदेश आणि ठरावीक उपजत गुणांची आवश्यकता असणारे खेळ यांची सांगड घालून 'एरिया गेम्स' ही ठरावीक क्रीडा प्रकारांच्या विकासाची योजना लागू केली. या योजनेसाठी संशोधन करताना आर्चरी आणि ॲथ्लेटिक्स या दोन खेळांत आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकण्यासाठी लागणारे गुण आणि क्षमता या देशातील वनवासी क्षेत्रातील जनजातींमध्ये विशेषत्वाने आढळून आले. तेथूनच वनवासी जनजाती राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांना सुरुवात झाली. याच सुमारास भारतातील वनवासी जनतेचे होणारे धर्म परिवर्तन लक्षात घेऊन, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने वनवासी कल्याण आश्रमाच्या माध्यमातून वनवासी जनजातींमध्ये कल्याण व विकास कार्य हाती घेतले. वनवासी कल्याण म्हणजे फक्त आर्थिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक विकास एवढाच याचा आयाम असणारच नव्हता. वनवासी जनजातींचे होणारे धर्मांतरण रोखण्याबरोबरच या समाजाचा सर्वांगीण विकास करणे हे प्रमुख उद्दिष्ट होते. अर्थात् त्यामुळे क्रीडा हा विषय देखील प्राधान्यक्रमात होता. वनवासी जनजातींमधील प्रतिभावान खेळाडूंना राष्ट्रीय पातळीवर चमकण्याची संधी मिळावी या हेतूने १९८८ मध्ये मुंबई येथे वनवासी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचे वनवासी कल्याण आश्रमाने आयोजन करण्यास सुरुवात केली. तेव्हापासून सातत्याने वनवासी कल्याण आश्रम फक्त वनवासी जनजातीच्या खेळाडूंकरिता दरवर्षी राष्ट्रीय स्तरावर या स्पर्धांचे आयोजन करीत आहे. यावर्षी रायपूर येथे होणाऱ्या या स्पर्धांचे हे २४ वे वर्ष आहे. हा उपक्रम हाती घेतल्यापासून वनवासी कल्याण आश्रम ही स्पर्धा आर्चरी (धनुर्विद्या) आणि इतर कोणता तरी एक खेळ अशा दोन खेळांसाठी आयोजित करीत असते. या वर्षीच्या आर्चरी आणि त्याबरोबर फुटबॉल या दोन क्रीडा प्रकारांत या स्पर्धा घेतल्या जात आहेत. या क्रीडा स्पर्धा छत्तीसगड राज्याची राजधानी असलेल्या रायपूर येथे २७ ते ३१ डिसेंबर २०२४ या काळात घेण्यात येत आहेत. या क्रीडा स्पर्धांच्या उद्घाटन समारंभासाठी केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडविय आणि छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णुदेव सहाय हे प्रमुख अतिथी असणार आहेत. या वर्षीच्या या आयोजनाची जबाबदारी छत्तीसगड वनवासी कल्याण आश्रमाने घेतली आहे. वनवासी क्षेत्राने आज भारताला अनेक उत्कृष्ट खेळाडू दिलेले आहेत. वानगीदाखल लिंबाराम, कविता राऊत, मनीष डामोर अशी अनेक नावे सहजपणे सांगता येतील. मात्र या सर्व खेळाडूंना कोणत्या कठीण परिस्थितीतून वाटचाल करावी लागते याची सामान्य माणसाला जाणीवही नसते. जिथे साधे 'प्राथमिक आरोग्य केंद्र' देखील दहा बारा किलोमीटर दूर असते, अशा दुर्गम आणि मागास क्षेत्रातील पालकांना फक्त खेळासाठी वेळ देणे, ही गोष्ट आजही मान्य होणारी नाही. जिथे आरोग्याला आवश्यक अशा सुविधांची वानवा आहे अशा प्रदेशात खेळांसाठी शारीरिक आणि मानसिक तयारीकरिता आवश्यक अशा सुविधा मिळणे ही अत्यंत कठीण गोष्ट ठरते. आज राष्ट्रीय वा आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंना शारीरिक व मानसिक अशा दोन्ही स्तरांवर तयारी करण्याची आवश्यकता असते. खेळाडूंना मैदानावर जशी मजबूत शारीरिक क्षमतांची निर्मिती आणि जोपासना करणे गरजेचे आहे तसेच मैदानाबाहेर त्याची मानसिक तयारी करून घेणे देखील तितकेच गरजेचे असते. त्याचवेळी खेळाडूंना स्पर्धेत जेथे परफॉर्मन्स द्यायचा असतो, त्या ठिकाणी असलेल्या वातावरणात आपले सर्वोत्तम देऊन पदके मिळवणे हे अत्यंत अवघड असे आव्हान असते. कारण अनेकदा खेळाडू सराव करीत असलेल्या ठिकाणचे वातावरण आणि ज्या ठिकाणी स्पर्धा असतात तेथील वातावरण अत्यंत विषम असू शकते. क्रीडा क्षेत्रात उपजत असलेल्या प्रतिभेला वाव देणे हा फक्त अर्धाच भाग होतो. त्या प्रतिभेची जोपासना करणे, त्याला पैलू पाडून राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर विजयी करणे हे नेहमीच अत्यंत कठीण असे आव्हान असते. कारण खेळाडूंची अंगभूत प्रतिभा लक्षात आल्यानंतर त्याची योग्य तयारी करून घेण्यासाठी काही वर्षांचा कालावधी लागत असतो. तरुण खेळाडूमधील प्रतिभा लक्षात घेणे, मग त्याची जोपासना आणि योग्य आकार देणे, खेळाडूची शारीरिक तयारी, मानसिक कणखरपणा, आणि योग्य असा काळ किंवा वेळ या सगळ्या गोष्टी एकत्र आल्या तरच क्रीडा क्षेत्रात विजेते होता येते. यातील एकही बाब हुकली तर वर्षोनुवर्षे घेतलेली मेहनत अक्षरशः वाया जात असते.

वनवासी जनजातींना या देशाच्या संस्कृतीपासून तोडण्याचे कारस्थान ख्रिश्चन चर्च आणि इस्लाम अनेक दशकांपासून करीत होते. वनवासी बांधव जरी निसर्गपूजक असले तरी ते हिंदू आहेत याविषयी शंका नाही. पण शहरांपासून दूर अरण्यात रहिवास असलेला हा समाज मधल्या काही काळात दुर्लक्षित होता. आधुनिक शिक्षणाचा या वनांमध्ये अभाव असल्याने, हिंदू धर्मातील एक मोठा वर्ग धर्मांतरित करण्यासाठी या आधीच्या काळात बरेच प्रयत्न झाले. वनवासी कल्याण आश्रमाच्या कार्यामुळे याला फार मोठ्या प्रमाणावर आळा बसलेला दिसून येतो. मात्र बुद्धिभेद करून, कपट कारस्थानाने या वनवासी बंधूंच्या मनात वेगळेपणाची भावना रुजवण्याचा प्रयत्न ख्रिश्चन चर्च सातत्याने करताना दिसते. ही तुटलेपणाची किंवा इतर हिंदू समाजापेक्षा आपण वेगळे आहोत ही भावना वनवासी बांधवांच्या मनात निर्माण होऊ नये यासाठी वनवासी कल्याण आश्रम कार्य करीत आहे. शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक विकास आणि समरसता असे चार आयाम क्रीडा क्षेत्राला असतात. राष्ट्रीय पातळीवर वनवासी क्षेत्रातील खेळाडूंना चमकण्याची संधी क्रीडा स्पर्धा देतात. त्यामुळेच शहरी समाजाने या स्पर्धांना प्रेक्षक या नात्याने हजेरी लावून या खेळाडूंचे कौतुक करणे जसे आवश्यक आहे, त्याचप्रमाणे विविध खेळांतील तज्ज्ञ मार्गदर्शकांनी देखील या वनवासी क्षेत्रातील खेळाडूंच्या प्रतिभेला जोखण्यासाठी, टॅलेंट हंटकरिता अशा स्पर्धांना हजेरी लावणे देशाच्या क्रीडा क्षेत्राला अधिक उंची गाठण्यासाठी सहायक ठरेल. ■

९८८१२४२२२४

वेध

नीलेश जोशी

बाणेदारपणे मृत्यू स्वीकारणारे साहिबजादे

अमरावती येथील कठोरा परिसरात असलेल्या अंबा अपार्टमेंटमधील रहिवासी अद्याप १५ मेची सायंकाळ आठवल्यानंतर शहारतात. या दिवशी अंबा अपार्टमेंटच्या बी विंगमधील दुसऱ्या माळ्यावर असलेल्या फ्लॅटमधून धूर निघत असल्याचे दिसले. हे पाहून अनेकांच्या काळजाचा ठोका चुकला. तर भयभयीत होऊन आता काय होईल, असा प्रश्न काहींच्या मनात उभा राहून ते थबकले. पण त्याच वेळी अवघ्या १७ वर्षांची करिना थापा धूर निघत असलेल्या फ्लॅटकडे धावली. फ्लॅटचे कुलूप तोडून तिने आत प्रवेश केला. आग आणि धुराचे लोट येत होते. मात्र, तिने पाण्याचा मारा करीत सिलेंडरलगत लागलेली आग आटोक्यात आणली. एवढेच नव्हे तर सिलेंडर बाहेर काढले. जर आगीतून सिलेंडर बाहेर काढले नसते तर सिलेंडरचा स्फोट होण्याची शक्यता होती. करिना थापाचे साहस, समयसूचकतेमुळे मोठी घटना टळली. अंबा अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या ७० कुटुंबांनी सुटकेचा निःश्वास सोडला. अनपेक्षित संकट ओढवल्यावर त्या संकटावर मात करण्यासाठी चालून जाण्याची वृत्ती उपजतच असावी लागते. शौर्य, धाडस, समयसूचकता या गुणांचे एकत्रीकरण झाले की, करिना थापासारखे शौर्य समोर येते. करिना थापाला आज अर्थात २६ डिसेंबर रोजी 'वीर बाल दिवस' कार्यक्रमात राष्ट्रपतींच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे. शौर्य आणि पराक्रमाचा वारसा, इतिहास आमच्या समाजाला असून याच शृंखलेतील साहिबजादा जोरावरसिंग आणि फतेहसिंग यांच्या स्मरणार्थ हा पुरस्कार केंद्र शासनाने २०२२ सालापासून सुरू केला.

आपल्या देशाचा इतिहास हा त्याग, बलिदान आणि शौर्याचा आहे. इतिहासातील अनेक प्रसंग चिरकाल प्रेरणादायी आहेत. शिखांचे दहावे गुरू श्रीगुरुगोविंदसिंगांचे साहिबजादा जोरावरसिंग, फतेहसिंग ही दोन मुले. त्यातील मोठ्याचे वय ९ वर्षे तर लहाना अवघ्या ७ वर्षांचा. या दोघांचेही धर्म रक्षणासाठीचे शौर्य, बलिदान चिरस्मरणीय असेच म्हणावे लागेल. तो काळ मोगलांच्या अन्याय, अत्याचाराचा होता. मोगल सैन्याचे आक्रमणही नित्याचेच. मोगल सैन्याने आनंदपूर किल्ल्याला वेढा घातला. या वेढ्यामुळे अन्न, धान्य आणि पाण्याचा तुटवडा किल्ल्यात जाणवू लागला. किल्ला सोडाल तर नागरिकांना सुरक्षित बाहेर जाऊ देऊ, असा निरोप मोगलाच्या सेनापतीने कुराणाची शपथ घेऊन पाठविला. त्यानंतर ८ महिन्यांनी गुरुगोविंदसिंग आई-पत्नी, चार मुले आणि साथीदारांसह किल्ला सोडून निघाले. पण कुराणाची शपथ न पाळता मोगल सैनिकांनी त्यांच्यावर हल्ला चढविला. या गदारोळात जोरावरसिंग, फतेहसिंग आणि त्यांची आजी यांची ताटातूट झाली. त्यातच ज्या ठिकाणी हे तिघेही थांबले होते त्यांनी दागिन्यांच्या मोहाने मोगलांना माहिती दिली. मोगलांनी या तिघांनाही अटक केली. मोगलांनी अटक केल्यानंतर किती छळ केला असेल याची कल्पना इतिहासातील अनेक दाखल्यांवरून करता येऊ शकते. या अवघ्या ९ आणि ७ वर्षांच्या दोन्ही मुलांना मोगलांचा सरदार वझीरखान याच्या समोर नेण्यात आले. त्यावेळी वझीरखानने 'इस्लाम स्वीकारा, तुम्ही मागाल ते मिळेल', असा प्रस्ताव ठेवला. त्यावेळी साहसाने ओतप्रोत असलेल्या या दोघांनीही 'आमचा धर्म आम्हाला प्राणाहूनही प्रिय आहे, आम्ही तो सोडणार नाही. आम्ही गुरुगोविंदसिंगांची मुले आहोत. आमच्यासमोर आमचे आजोबा श्रीगुरू तेगबहादूरसिंह यांचा आदर्श आहे. त्यांनी धर्मरक्षणासाठी प्राण दिले. आम्ही आमचा धर्म सोडणार नाही', असे बाणेदार उत्तर दिले. त्यानंतर या कोवळ्या मुलांना भिंतीत चिरडून मारण्याचा आदेश देण्यात आला. दोघांच्याहीभोवती भिंती उभारल्या जाऊ लागल्या. पण दोघांच्याही चेहऱ्यावर मृत्यूचे भय नव्हते. मात्र, काही वेळानंतर वयाने मोठा असलेल्या जोरावरसिंगाच्या डोळ्यात अश्रू आले. ते पाहून लहाना फतेहसिंग म्हणाला 'तुझ्या डोळ्यात अश्रू, मृत्यूची भीती वाटत आहे का?' यावर जोरावरसिंगाने उत्तर दिले की, 'अरे मी मोठा असूनही बलिदानाचा पहिला मान तुला मिळणार आहे याचे वाईट वाटते'. लहान्याची उंची कमी असल्याने पहिले बलिदान फतेहसिंगाचे होणार होते. त्यातून हा संवाद झाला. त्यानंतर २६ डिसेंबर १७०५ रोजी वझीरखान याने या दोघांनाही निर्घृणपणे ठार केले. त्यांनी हसत-हसत हौतात्म्य स्वीकारले. देश, धर्मासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या हुतात्म्यांचा इतिहास स्वातंत्र्यानंतरही अनेक वर्षे सांगितलाच गेला नाही. हे दुर्दैवच. पण या पराक्रम, शौर्य, साहसाचा वारसा असणाऱ्यांचे शासन केंद्रात येताच या सर्वांचे यथोचित स्मरण करण्याचा पायंडा सुरू केला आहे. ■

९४२२८६२४८४

दिल्ली वार्तापत्र

श्यामकांत जहागीरदार

बिहार निवडणूक आणि नितीशकुमार

२०२५ मध्ये म्हणजे नवीन वर्षात दिल्ली आणि बिहार विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. दिल्ली विधानसभेची निवडणूक फेब्रुवारी महिन्यात, तर बिहार विधानसभेची निवडणूक वर्षाच्या अखेरीस होणार आहे. बिहार विधानसभेच्या निवडणुकीला जवळपास वर्षभराचा कालावधी असला तरी त्याच्याही हालचाली सुरू झाल्या आहेत. बिहारमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून जदयू आणि भाजपा युतीचे सरकार आहे, या सरकारचे नेतृत्व जदयूचे नेते नितीशकुमार यांच्याकडे आहे, म्हणजे नितीशकुमार बिहारचे अनेक वर्षांपासून मुख्यमंत्री आहेत. नितीशकुमार यांनी देशात सर्वाधिक वेळा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेण्याचा विक्रमही केला आहे. महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेसचे अजितदादा पवार राज्यात कोणाचेही सरकार असले तरी जसे उपमुख्यमंत्रिपदावर कायम असतात, तसेच बिहारमध्ये सरकार रालोआचे असो की संपुआचे मुख्यमंत्री नितीशकुमारच असतात. अजितदादा पवार यांचा जन्म जसा उपमुख्यमंत्रिपदासाठी झाला तसाच नितीशकुमार यांचा जन्म मुख्यमंत्रिपदासाठी झाला आहे, असे म्हणायला हरकत नाही. यावेळीही राज्यातील विधानसभेची निवडणूक भाजपा आणि जदयू एकत्र लढवणार आहे, या आघाडीत चिराग पासवान यांचा लोकजनशक्ती पक्ष आणि जितनराम मांझी यांचा हिंदुस्थान अवाम मोर्चाही आहे. पासवान आणि मांझी हे दोघेही मोदी सरकारमध्ये मंत्री आहेत. बिहार विधानसभेच्या निवडणुकीत रालोआचा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा कोण राहील, असा प्रश्न केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना एका वाहिनीवरील मुलाखतीत विचारण्यात आला होता, त्यावर त्यांनी आम्ही एकत्र बसून याबाबतचा निर्णय घेऊ, असे उत्तर दिले. या उत्तरात काही गैर नव्हते. मात्र मुख्यमंत्री नितीशकुमार नाराज झाल्याची आणि ते पुन्हा राजदसोबत जाऊ शकतात, अशी चर्चा बिहारमध्ये सुरू झाली होती. खरं म्हणजे या चर्चेला काही आधार नव्हता. पण राजकारणात अशा कोणत्याही शेंडाबुडुक नसलेल्या चर्चा सुरू होतात.

बिहार प्रदेश भाजपा अध्यक्ष संजय जयस्वाल तसेच उपमुख्यमंत्री आणि भाजपा नेते सम्राट चौधरी यांना, राजधानी दिल्लीतील भाजपा मुख्यालयात पत्रपरिषद घेत बिहार विधानसभेची निवडणूक आम्ही पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्या नेतृत्वातच लढवणार असल्याचे सांगावे लागले. केंद्रातील नरेंद्र मोदी यांचे सरकार नितीशकुमार यांची जदयू आणि चंद्राबाबू नायडू यांचा तेलगू देसम अशा दोन मोठ्या पक्षांच्या पाठिंब्यावर आहे. जदयूचे राजीवरंजनसिंह ऊर्फ लल्लनसिंह तर मोदी यांच्या मंत्रिमंडळातही आहे. त्यामुळे बिहार विधानसभेच्या निवडणुकीत भाजपा जदयूला दुखावेल असे वाटत नाही. ज्याप्रमाणे भाजपा नितीशकुमार यांना सोडू शकत नाही, त्याचप्रमाणे आता नितीशकुमार यांनाही भाजपाची साथ सोडता येणार नाही. वारंवार भूमिका बदलल्यामुळे नितीशकुमार यांची प्रतिमा पहिलेसारखी विश्वसनीय राहिली नाही, त्याचप्रमाणे राज्यात पलटूराम म्हणून त्यांच्या नावाची चर्चा सुरू झाली आहे. ही आपली प्रतिमा नितीशकुमार यांना पुसून काढायची आहे. महत्त्वाचे म्हणजे आपला पक्ष एकसंध ठेवायचा असेल तर नितीशकुमार यांना भाजपासोबत राहावे लागणार आहे. बिहारच्या राजकारणात सध्यातरी नितीशकुमार यांना पर्याय नसला तरी नितीशकुमार यांच्यासमोर आता फारकाही पर्याय उरले नाहीत. भाजपासोबत राहण्यातच नितीशकुमार यांचा सर्वाधिक राजकीय फायदा आहे. राजदसोबत जाऊन नितीशकुमार यांना मुख्यमंत्रिपद मिळणे यावेळी शक्य नाही, कारण तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्री करण्याच्या दिशेने राजद आणि लालूप्रसाद यादव कामाला लागले आहेत. २०२२ मध्ये पर्याय नसल्यामुळे राजदने नितीशकुमार यांना मुख्यमंत्रिपद दिले होते. त्यावेळी नितीशकुमार यांना राष्ट्रीय राजकारणाची तसेच पंतप्रधानपदाची स्वप्ने पडू लागली होती. त्यामुळे आपण राष्ट्रीय राजकारणात गेल्यानंतर तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्री करण्याची आणि २०२५ ची विधानसभा निवडणूक त्यांच्या नेतृत्वात लढवण्याची घोषणाही नितीशकुमार यांनी केली होती, पण तो आता इतिहास झाला. या घोषणेनंतर नितीशकुमार राजदची साथ सोडत भाजपासोबत आले. त्यामुळे 'रात गयी सो बात गयी' सारखे त्यांच्या या घोषणेचे झाले आहे. भाजपाने बिहार विधानसभेची निवडणूक नितीशकुमार यांच्या नेतृत्वात लढवली आणि जिंकली तरी नितीशकुमार आता फारकाळ मुख्यमंत्रिपद सांभाळू शकतील, असे वाटत नाही. कारण विधानसभेच्या निवडणुकीपर्यंत वयाची ७५ वी त्यांनी गाठली असेल. शारीरिकदृष्ट्या ते आता पहिलेसारखे तंदुरुस्त राहिले नाहीत. चालताना त्यांना त्रास होता, कोणाचा तरी आधार घेतल्याशिवाय त्यांना चालता येत नाही. तसेच आता त्यांना विस्मरणही होत आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीनंतर जदयू आणि भाजपा आघाडीला बहुमत मिळाले तरी नितीशकुमार मुख्यमंत्री होण्याची शक्यता फार कमी आहे. सुरुवातीला काही काळासाठी भाजपा नितीशकुमार यांना मुख्यमंत्री करू शकेल, पण नंतर मात्र मुख्यमंत्रिपद भाजपाला आपल्याकडेच घ्यावे लागेल.

यावेळी बिहार विधानसभा निवडणुकीत भाजपाचे सर्वाधिक आमदार निवडून येऊ शकतात. आतापर्यंत बिहारमध्ये जदयूपेक्षा भाजपा आमदारांची संख्या जास्त असतानाही भाजपाने युती-धर्माचे पालन करत मुख्यमंत्रिपद नितीशकुमार यांच्याकडे दिले होते. यावेळी युती-धर्माचे पालन करण्याची वेळ नितीशकुमार आणि जदयूवर येऊ शकते

सोलापूर तरुण भारत
https://epaper.daniktarunbharat.com

चक्क पोलीस चौकी समोरच तरुणावर चाकू,कोयत्याने प्राणघातक हल्ला

अंबाजोगाईच्या स्वाराती रुग्णालय परिसरातील घटना, चौघांवर गुन्हा

तभा वृत्तसेवा
अंबाजोगाई दि.२६ डिसेंबर

बीड जिल्ह्यातील वाढलेल्या गुन्हेगारीचा प्रश्न आता वरचेवर चिंताजनक बनू लागला आहे. गुन्हेगारांना पोलिसांचा धाक अजिबात राहिला नसल्याचे दर्शविणारी आणखी एक घटना समोर आली आहे. अंबाजोगाईच्या स्वाराती रुग्णालयातील पोलीस चौकीच्या समोरच एका तरुणावर चौघांनी चाकू, कोयत्याने प्राणघातक हल्ला केला. हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या तरुणाची प्रकृती सध्या चिंताजनक आहे.

जमीर उर्फ मुन्ना मोहिद्दीन शेख (रा. सदर बाजार, अंबाजोगाई) असे त्या जखमी तरुणाचे नाव आहे. जमीरचा भाऊ शेख मतीनच्या फिर्यादीनुसार, बुधवारी (दि.२५) रात्री ९.३० वाजताच्या सुमारास श्रीहरी दौलत मुंडे (रा. क्रांती नगर, अंबाजोगाई) हा जमीरला दारू पिण्यासाठी आग्रह करत होता. यावेळी जमीरने त्यास नकार देऊन शिवीगाळ केली. त्यानंतर रात्री १२.३० वाजता जमीर स्वाराती रुग्णालयासमोरील चौकात बसला असताना श्रीहरी मुंडे याने त्यास पोलीस चौकीजवळील एटीएम समोर बोलावले. जमीर तिथे जाताच श्रीहरीने शिवीगाळ का केली होतीस असा जाब विचारत जमीरच्या मानेवर चाकूने वार केला तर आर्यन मांदळे व अनोळखी दोघांनी कोयता आणि चाकूने जमीरवर प्राणघातक हल्ला केला असे फिर्यादीत नमूद आहे. सदर फिर्यादीवरून श्रीहरी मुंडे, आर्यन मांदळे व अनोळखी दोघांवर अंबाजोगाई शहर ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला. दरम्यान, गंभीर जखमी झालेल्या जमीरवर स्वाराती रुग्णालयात उपचार सुरु असून त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते. ऐन पोलीस चौकीसमोर झालेल्या या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.

संतोष देशमुख यांना न्याय मिळेपर्यंत लढा देणार–रमेशराव आडसकर

तभा वृत्तसेवा
केज दि.२६ डिसेंबर

केज कृषी उत्पन्न बाजार समिती या ठिकाणी केज व धारूर तालुक्यातील सर्व पक्षीय कार्यकर्ते व सामाजिक क्षेत्रातील समाजसेवक पत्रकार व्यापारी यांची बैठक आयोजित करण्यात आली होती या बैठकीत ज्येष्ठ नेते रमेशराव आडसकर यांनी सर्व पक्षीय कार्यकर्त्यांना व सर्व समाजातील जनतेने लाखोंच्या संख्येने २८ डिसेंबर रोजी बीड या ठिकाणी संतोष देशमुख यांना न्याय मिळण्यासाठी मोर्चात लाखोच्या संख्येने सहभागी व्हावे असे आव्हान केले तसेच संतोष देशमुख खून प्रकरणाचा तपास जलद गतीने करून आरोपींना तात्काळ अटक करून फाशीची शिक्षा करण्यात यावी तरच मयत संतोष देशमुख यांना न्याय मिळेल व जनतेचा न्याय व्यवस्थेवरील विश्वास दृढ होईल संतोष देशमुख हत्या प्रकरणाला आजपर्यंत १७ दिवस झालेले आहेत तरी सुद्धा आरोपींना अटक झालेली नाही या प्रकरणाचा तपास खोलात जाऊन करण्यात यावा याची मागणी सर्वांच्यावतीने शासन दरबारी करणार आहे.

दि.२८ डिसेंबर रोजी आरोपींच्या अटकेसाठी आणि कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी मोर्चा काढण्यात येत आहे. या मोर्चात मी सहभागी होत असून जिल्ह्यातील नागरिकांनी ही आपली जबाबदारी आहे, या भावनेतून यावे, असे अवाहनही त्यांनी यावेळी केले.यावेळी कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती अंकुश इंगळे युवराज दादा काळे, सुनील गलांडे,भाई मोहन गुंड, मौला सौदागर, दिलीप गुळभिले, विजयकुमार बन्साळी,नसीर नेता इनामदार, केज व धारूर शहरातील व्यापारी नागरिक सामाजिक कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.

जीवाची परवा न करता धर्म न बदलणारे बाबा जोरावर सिंह बाबा फतेह सिंह–विनायक रत्नपारखी

तभा वृत्तसेवा
माजलगाव दि.२६ डिसेंबर

२६ डिसेंबर हा बालदिन साजरा व्हावा म्हणून मोदी सरकारने २०२२ रोजी जाहीर केले याचाच एक भाग म्हणून आज सक्सेस पब्लिक स्कूलमध्ये बाल दिवस संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून भाजपा तालुकाध्यक्ष अरुण राऊत तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगराध्यक्ष डॉ.अशोक तिडके होते.

या बाल दिवसाचे महत्त्व काय हे सांगताना नगरसेवक विनायक रत्नपारखी म्हणाले २०२२ पासून २६ डिसेंबर हा वीर बाल दिवस म्हणून साजरा करण्याचे मोदी सरकारने जाहीर केले ,व या २६ डिसेंबर रोजीच गुरु गोविंद सिंह यांचे दोन पुत्र फतेह सिंग आणि जोरावर सिंग यांचे सहा व आठ अशी वय होते , त्यावेळी नवाब वजीरखान त्यांना सांगतात आपण इस्लाम धर्म स्वीकारा नाहीतर मरणाला सामोरे जावे लागेल, मात्र याप्रसंगी जीवाची परवा न करता तेवढ्याच बाणेदारपणे विचारतात इस्लाम धर्म स्वीकारला तर मरण येणार नाही का आणि मरण येणारच असेल तर आपल्या धर्मात राहून धर्मासाठी बलिदान करत मरण पत्करू असे उत्तर दिले व त्यानंतर या दोघांनाही भिंतीत चिनून विटा बांधून मारण्यात आले , मानेपर्यंत विटा बांधल्या झाल्या त्यावेळी पिता जोरावर सिंह रडायला लागले कारण काय तर तू माझ्यापेक्षा लहान असताना

या जगात नंतर आलास आणि माझ्या आधीच चाललास , पण तुझे हे शौर्य धैर्य पाहून बलिदानाची तुझी उंची किती मोठी आहे हे या धर्मनिष्ठा , राष्ट्रनिष्ठावरून ही दिसून येते . आणि याचाच एक भाग म्हणून या दिवशी बाल दिवस म्हणून संपन्न व्हावा म्हणून देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी सरकारने २६ डिसेंबर हा बाल दिन म्हणून संपन्न व्हावा असे जाहीर केले. यातून विद्यार्थ्यांनी एक लक्षात घ्यावी की ही लहान मुले आलेल्या संकटाला न घाबरता जीवाची परवा न करता सामोरे जातात , तसे आपण देखील कुठल्याही कठीण प्रसंगाला घाबरून न जाता त्याला सामोरे जाण्याचे शिकले पाहिजे. शीख पंथ हा हिंदूंचा सुरक्षा कवच म्हणून मानला जातो , गुरुगोविंद सिंहजी यांनी धर्म रक्षणासाठी पूर्ण समाजाला एकत्र केले, समाजाचे लढाऊ पण धर्म रक्षणासाठी जागविणारे श्रेष्ठ गुरुगोविंद सिंह जी यांच्या सर्व परिवाराने २१ ते २७ डिसेंबर या कालावधीत अतुलनीय बलिदान दिले म्हणूनच हा सप्ताह शौर्य सप्ताह म्हणून पाळला जातो, म्हणूनच देश धर्म समाज यांच्यासाठी गुरूंच्या सर्व परिवाराने बलिदान दिले त्यांच्या या बलिदानामुळेच आजही आपला धर्म आणि देश आणि आपण अजूनही टिकून आहोत , आणि दुर्दैव हेच आहे की या जाज्वल्य पराक्रमी आणि स्मृतिदय इतिहास आम्हाला माहितीच नाही, आणि म्हणून अशा वीरांचा आदर्श हा सर्वासमोर ठेवणे गरजेचे आहे यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हा बाल दिवस २६ डिसेंबर रोजी साजरा करण्याचे ठरवले, आणि त्याचाच एक भाग म्हणून आज आपण या ठिकाणी सर्वांना इतिहास कळावा म्हणून हा बालदिन आपण या ठिकाणी साजरा करत आहोत. या कार्यक्रमा प्रसंगी भाजपा तालुकाध्यक्ष अरुण राऊत माजी नगराध्यक्ष अशोक तिडके सत्यनारायण उनवणे प्रल्हाद दळवी खुरपे सह यशवंत पब्लिक स्कूलचे अध्यक्ष निखिल वाघमारे ,मुख्याध्यापक निरंजन वाघमारे , शाळेचे संचालक तथा नगरसेवक विनायक रत्नपारखी , शेंडगे सर व सर्व शिक्षक कर्मचारी वृंद विद्यार्थी उपस्थित होते.

बीडमध्ये हातभट्टी दारू अड्ड्यावर धाड

तभा वृत्तसेवा
बीड दि.२६ डिसेंबर

पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांच्या आदेशावरून पो.नि. शितलकुमार बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली डी. बी. पथकाने पहाटे पात्रुड गल्ली भागातील गावठी हातभट्टी दारू अड्ड्यावर धाडी टाकल्या. या कारवाईत डीबी पथकातील कर्मचाऱ्यांनी शेकडो लिटर रसायन उध्वस्त केले. या प्रकरणी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. बीड शहर ठाण्यातील डीबी पथकातील सपोनि राठोड, सहाय्यक फौजदार सिरसाट, पोहे तांबारे, पोशि सय्यद, मनोज परजणे हे अवैध धंद्यांवरील कारवाईसाठी जात असतांना पात्रुड गल्ली भागातील पत्र्याच्या शेडमध्ये हातभट्टी दारूचा अड्डा असल्याची माहिती त्यांना मिळाली. त्यानुसार पोनि बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळी ८ बाजण्याच्या सुमारास पात्रुड गल्ली भागात दोन ठिकाणी छापे टाकून सहा निळ्या रंगाच्या प्लॅस्टिकच्या ड्रम मधील शंभर लिटरचे रसायन व दोन पत्र्याच्या डब्यामधील १८ लिटरचे रसायन उध्वस्त केले तर दुसऱ्या कारवाईत पाच लिटरचे दोन ड्रम व इतर साहित्य उध्दवस्त करण्यात आले. या दोन्ही कारवाईत हजारो रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन या प्रकरणी पो.ह. आजिनाथ सानप यांच्या फिर्यादीवरून राकेश प्रभाकर उर्फ गुडबा जाधव याच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

अधिक्षक शासकीय निरीक्षणगृह बीड वीर बाल दिन साजरा

तभा वृत्तसेवा
बीड दि.२६ डिसेंबर

जिल्हा अधिक्षक शासकीय निरीक्षणगृह बीड येथे वीर बाल दिन साजरा करण्यात आला. सुधीरकुमार ढाकणे बाल विकास प्रकल्प अधिकारी,मन्सुरी अन्सार निसार अहमद जि.अधिक्षक शासकीय निरीक्षणगृह बीड ,अशोक तांगडे अध्यक्ष बाल कल्याण समिती ,संतोष वारे बाल कल्याण समिती,तत्वशिल कांबळे बाल कल्याण समिती,बालिका सिंधीकुंमठे शिक्षिका,शेख कैफ,शेख रिजवान,टिनमेकर फिरदोस हे होते,कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गुरु गोविंद सिंगजी यांचे साहिबजादे बाबा फतेह सिंग आणि जोरावर सिंग या वीर बालकांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मन्सुरी यांनी

गुरु गोविंद सिंग जी यांचे साहिबजादे बाबा फतेह सिंग आणि जोरावर सिंग यांच्या हौतात्म्याचे स्मरण करण्यासाठी वीर बाल दिवस साजरा केला जातो हे भाषणातुन विद्यार्थ्यांना सांगितले. कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले.

माजलगाव भाजपाच्या वतीने सक्सेस पब्लिक स्कूलमध्ये बालदिन

तभा वृत्तसेवा
माजलगाव दि.२६ डिसेंबर

२६ डिसेंबर हा बालदिन साजरा व्हावा म्हणून मोदी सरकारने २०२२ रोजी जाहीर केले याचाच एक भाग म्हणून आज सक्सेस पब्लिक स्कूलमध्ये बाल दिवस संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून भाजपा तालुकाध्यक्ष अरुण राऊत तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगराध्यक्ष डॉक्टर अशोक तिडके होते. या बाल दिवसाचे महत्त्व काय हे सांगताना नगरसेवक विनायक रत्नपारखी म्हणाले २०२२ पासून २६ डिसेंबर हा वीर बाल दिवस म्हणून साजरा करण्याचे मोदी सरकारने जाहीर केले ,व या २६ डिसेंबर रोजीच गुरु गोविंद सिंह यांचे दोन पुत्र फतेह सिंग आणि जोरावर सिंग यांचे सहा व आठ अशी वय होते , त्यावेळी नवाब वजीरखान त्यांना सांगतात आपण इस्लाम धर्म स्वीकारा नाहीतर मरणाला सामोरे जावे लागेल, मात्र याप्रसंगी जीवाची परवा न करता तेवढ्याच बाणेदारपणे विचारतात इस्लाम धर्म स्वीकारला तर मरण येणार नाही का आणि मरण येणारच असेल तर आपल्या धर्मात राहून धर्मासाठी बलिदान

करत मरण पत्करू असे उत्तर दिले व त्यानंतर या दोघांनाही भिंतीत चिनून विटा बांधून मारण्यात आले , मानेपर्यंत विटा बांधल्या झाल्या त्यावेळी पिता जोरावर सिंह रडायला लागले कारण काय तर तू माझ्यापेक्षा लहान असताना या जगात नंतर आलास आणि माझ्या आधीच चाललास , पण तुझे हे शौर्य धैर्य पाहून बलिदानाची तुझी उंची किती मोठी आहे हे या धर्मनिष्ठा , राष्ट्रनिष्ठावरून ही दिसून येते . आणि याचाच एक भाग म्हणून या दिवशी बाल दिवस म्हणून संपन्न व्हावा म्हणून देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी सरकारने २६ डिसेंबर हा बाल दिन म्हणून संपन्न व्हावा असे जाहीर केले. यातून विद्यार्थ्यांनी एक लक्षात घ्यावी की ही लहान मुले आलेल्या संकटाला न घाबरता जीवाची परवा न करता सामोरे जातात , तसे आपण देखील कुठल्याही कठीण प्रसंगाला घाबरून न जाता त्याला सामोरे जाण्याचे शिकले पाहिजे. शीख पंथ हा हिंदूंचा सुरक्षा कवच म्हणून मानला जातो , गुरुगोविंद सिंहजी यांनी धर्म रक्षणासाठी पूर्ण समाजाला एकत्र केले, समाजाचे लढाऊ पण धर्म रक्षणासाठी जागविणारे श्रेष्ठ गुरुगोविंद सिंह जी यांच्या सर्व परिवाराने २१ ते २७ डिसेंबर या कालावधीत अतुलनीय बलिदान दिले म्हणूनच हा सप्ताह शौर्य सप्ताह म्हणून पाळला जातो, म्हणूनच देश धर्म समाज यांच्यासाठी गुरूंच्या सर्व परिवाराने बलिदान दिले त्यांच्या या बलिदानामुळेच आजही आपला धर्म आणि देश आणि आपण अजूनही टिकून आहोत , आणि दुर्दैव हेच आहे की या जाज्वल्य पराक्रमी आणि स्मृतिदय इतिहास आम्हाला माहितीच नाही, आणि म्हणून अशा वीरांचा आदर्श हा सर्वासमोर ठेवणे गरजेचे आहे यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हा बाल दिवस २६ डिसेंबर रोजी साजरा करण्याचे ठरवले, आणि त्याचाच एक भाग म्हणून आज आपण या ठिकाणी सर्वांना इतिहास कळावा म्हणून हा बालदिन आपण या ठिकाणी साजरा करत आहोत. या कार्यक्रमा प्रसंगी भाजपा तालुकाध्यक्ष अरुण राऊत माजी नगराध्यक्ष अशोक तिडके सत्यनारायण उनवणे प्रल्हाद दळवी खुरपे सह यशवंत पब्लिक स्कूलचे अध्यक्ष निखिल वाघमारे ,मुख्याध्यापक निरंजन वाघमारे , शाळेचे संचालक तथा नगरसेवक विनायक रत्नपारखी , शेंडगे सर व सर्व शिक्षक कर्मचारी वृंद विद्यार्थी उपस्थित होते.

बीड : असेम्ब्लीज ऑफ गॉड चर्च येथे खिसमस निमित्त प्रार्थना सभा घेण्यात आली. यावेळी फादर सोनवणे यांनी येशू ख्रिस्त यांच्या जन्मासंदर्भात अनेक गोष्टी सांगितल्या.

क्राईम वृत्त...

अप्पर जिल्हाधिकारी आरगुंडे यांचा सत्कार

चाकूर, दि.२६ डिसेंबर -

अप्पर जिल्हाधिकारी एच.व्ही. आरगुंडे यांची मुख्यमंत्री कार्यालय महाराष्ट्र राज्य मंत्रालय,मुंबई येथे मुख्यमंत्री यांचे उपसचिव म्हणून नुकतीच नियुक्ती झाली आहे.त्यांच्या या नियुक्तीबद्दल चापोली येथील युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष रमेश पाटील यांनी सत्कार करुन अभिनंदनपर शुभेच्छा दिल्या. यावेळी ज्ञानेश्वर तोरे, आकाश चेवले, ईश्वर स्वामी, आदी जण उपस्थित होते.

पानगाव शाळेत सुशासन दिन साजरा

रेणापूर, दि.२६ डिसेंबर -

नेहरू युवा केंद्र लातूर यांच्या वतीने सुशासन दिन साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम पानगाव येथील सरस्वती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय तालुका रेनापुर येथे साजरी करण्यात आला. या कार्यक्रमांमध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक मधील विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद होता. कार्यक्रमाचे मार्गदर्शक प्राध्यापक प्रल्हाद डोंगरे यांनी विद्यार्थ्यांना भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांच्या जीवनावरील विषयाचे मार्गदर्शन केले व गीते राघव, कांबळे संबोधी, साळवे दीक्षा, लोणकर संदीप, शिरसाट काशीराम, स्वामी अंजली, पार्थ अनगोटे, संजीवनी उपाडे, सौरभ सिरसाठ, इंगळे शुभांगी, श्रुती उजगिरे, शैक्षणिक साहित्य माय भारत नोटबुक व बॅच वाटून या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. या कार्यक्रमासाठी उपस्थित शाळेतील शिक्षक वृंद येडले, कलुरे, गोरे, पवार, शेंडगे, अमृता भंडारे, बरिदे अयोध्या आणि तालुका स्वयंसेवक अविनाश दुमपल्ले या कार्यक्रमासाठी जिल्हा नेहरू युवा अधिकारी साक्षी समैंय्या व लेखपाल संजय ममदापूर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला.

महात्मा बसवेश्वर दिनदर्शिकेचे प्रकाशन

चाकूर, दि.२६ डिसेंबर -

लिंगायत महासंघाच्या वतीने काढण्यात आलेल्या महात्मा बसवेश्वर दिनदर्शिकेचे प्रकाशन दि.२६ डिसेंबर रोजी शिरुर ताजबंद येथे महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी लिंगायत महासंघ अहमदपूर व चाकुर शाखेच्या वतीने ना. बाबासाहेब पाटील यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी लिंगायत महासंघाचे प्रदेशाध्यक्ष प्रा. सुदर्शन बिरादार, लिंगायत महासंघाचे चाकुर तालुकाध्यक्ष सुभाष शंकरे, तालुका कार्याध्यक्ष धीरज माकणे, शहराध्यक्ष संजय पाटील, जिल्हा उपाध्यक्ष तानाजी पाटील, जिल्हा सरचिटणीस चंद्रकांत तोळमारे, अहमदपूर तालुका सरचिटणीस चंद्रशेखर हामणे, दत्तुसिंग वंगवाड, नवनाथ डोंगरे आदीसह संघटनेचे चाकुर, अहमदपूर तालुक्यातील पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

'उदयगिरी'त गणित दिवस साजरा

उदगीर, दि.२६ डिसेंबर -

येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात गणित विभागाच्या वतीने राष्ट्रीय गणित दिवसाच्या निमित्ताने कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमासाठी गणित विभागाचे विभाग प्रमुख प्रा.डॉ.बी.डी. करंडे हे अध्यक्ष म्हणून होते तर प्रमुख पाहुणे म्हणून वनस्पतीशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख प्रा.डॉ.आर.बी. अलापुरे व प्रा.डॉ.व्ही.एस. नागपूर्णे होते. कार्यक्रमास पूजा कोळी व स्नेहा नामवाड या माजी विद्यार्थिनी उपस्थित होत्या. प्रा.डॉ.आर.बी. अलापुरे म्हणाले, गणित हा विषय माणसाला तर्कशुद्ध पद्धतीने विचार करण्यास प्रवृत्त करते. अध्यक्षीय समारोप करत असताना प्रा.डॉ. करंडे यांनी श्रीनिवास रामानुजन यांचा जीवन प्रवास सर्व विद्यार्थ्यास सांगितला. कार्यक्रमांमध्ये विद्यार्थी अरुण मनोहर यांनी त्याचे मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमासाठी गणित विषयाचे विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रशांत वाघमारे यांनी केले व आभार आशिष शिंदे यांनी मांडले.

खेळाडूंची विद्यापीठ थलेटिक्स संघात निवड

उदगीर, दि.२६ डिसेंबर -

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयातील स्नेहा बुरपल्ले, आरती जाधव या खेळाडूंची स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या थलेटिक्स संघात निवड झालेली आहे. अखिल भारतीय आंतर विद्यापीठ थलेटिक्स स्पर्धा दि.२६ ते ३० डिसेंबर या कालावधीमध्ये कलिंग इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स, भुवनेश्वर (ओडीसा) येथे होणार आहेत. या स्पर्धेत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी या विद्यार्थ्यांची विद्यापीठ संघात निवड झाली आहे. या दोन्ही खेळाडूंना क्रीडा संचालक प्रा. सतिश मुंढे, प्रा. रोहन एनाडले यांचे मार्गदर्शन लाभले आहे. त्याबद्दल महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन मानकरी, उपाध्यक्ष डॉ. रेखा रेड्डी, सचिव रामचंद्र तिरुके, सहसचिव ॲड.एस.टी. पाटील चिघळीकर आणि डॉ. रामप्रसाद लखोटिया, कोषाध्यक्ष भालचंद्र चाकूरकर तसेच सर्व संस्था सदस्य, प्राचार्य डॉ.आर.के. मस्के, उपप्राचार्य डॉ.एस.जी. पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

महाराष्ट्राचा कायापालट करण्याची ताकद देवेंद्र फडणवीसांमध्ये : आ. अभिमन्यू पवार

तभा वृत्तसेवा
औसा, दि.२६ डिसेंबर -

औशाला मंत्रीपद मिळाले नाही यापेक्षा महाराष्ट्राचा मुख्यमंत्री भाजपचा झाला. याचा अधिक आनंद औशाच्या जनतेने मानला पाहिजे. एका मंत्र्याप्रमाणेच तुमचा आमदार काम करेल यात कसलीही शंका तुमच्या मनात येऊ देऊ नका. औसेकरांना गेल्या अडीच वर्षांत विकास काय असतो ते मी दाखवून दिले आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या रूपाने महाराष्ट्राच्या जनतेला कल्याणकारी मुख्यमंत्री मिळाला असून महाराष्ट्राचा कायापालट करण्याची ताकद मुख्यमंत्री फडणवीस यांच्यामध्ये असल्याचा विश्वास आमदार अभिमन्यू पवार यांनी व्यक्त केला आहे.

औसा तालुक्यातील बुधोडा येथे आ. पवार यांचा सत्कारकरण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. प्रभाकर कोळपाक कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. सुर्यकांत सातपुते, भाजपचे तालुकाध्यक्ष सुभाष जाधव, माऊली मिटापल्ले, कैलास पाटील, दत्ता चेवले, सुभाष पाटील, रवी चिलमे, बालाजी चामे, गुलाब सय्यद, सिताजी कदम, शिवानंद धाराशिवे, शिवाजी बंडकर, विनायक पवार, ज्ञानेश्वर बुधोडे, हेमंत पाटील, विजय कदम, ज्ञानेश्वर इंजे, कमलेश निलंगेकर, हर्षवर्धन धाराशिवे आदीसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. आ. आभिमन्यू पवार म्हणाले, देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री म्हणून काम करताना शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी अनेक चांगले निर्णय घेतले. महाराष्ट्राचा कायापालट करण्याची ताकद देवेंद्र फडणवीस यांच्यामध्ये आहे. त्यांनी सुरू केलेल्या जल युक्त शिवार अभियानामुळे लातूर जिल्हा टॅकरमुक्त झाला आहे. पोखरा सारख्या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून त्यांनी काम केले आहे.असे सांगून ते म्हणाले की काम करणाऱ्या कार्यकर्त्यांला आमदार म्हणून काम करण्याची दुसऱ्यांदा संधी मतदारांनी दिली आहे. विकासाच्या मुद्द्यावर बोलायला जागा नसल्याने विरोधकाकडून अनेक अफवा पसरविण्यात आल्या माझ्याबद्दल फेक नरेटिव्ह पसरविण्याचा प्रयत्न करण्यात आला मात्र हा सर्व डाव औशाच्या जनतेने उधळून लावला. विकासाच्या मुद्यावर लोकांनी मत दिले असल्याचे आ. अभिमन्यू पवार यांनी सांगितले.

शेतकऱ्यांची एक इंचही जमिन जाणार नाही...

काही दिवसांपूर्वी बुधोडा येथील काही शेतकऱ्यांना वक्फ बोर्डाची नोटीस आली होती,बुधवारी बुधोडा येथे आमदार अभिमन्यू पवार यांनी संबंधित शेतकऱ्यांसोबत बैठक घेऊन त्यांना आश्वासित केले. या बैठकीसाठी वक्फ बोर्डाचे चेअरमन आणि अधिकारी यांना बोलावून घेतले होते, सदरील जमीन ही शेतकऱ्यांच्या मालकीचीच आहे आणि आम्ही कोर्टातही तशीच भूमिका मांडू असा शब्द त्यांनी संबंधित शेतकऱ्यांना दिला आहे.तसेच आमदार अभिमन्यू पवार यांनी संबंधित शेतकऱ्यांशी संवाद साधत हे सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून शेतकऱ्यांनी काळजी करण्याची गरज नाही. शेतकऱ्यांची एक इंचही जमिन जाणार नाही असा विश्वास यावेळी बोलताना त्यांनी व्यक्त केला.

१ जानेवारीपासून नवसपूर्ती पदयात्रा...

महाराष्ट्राच्या कल्याणासाठी ठाकरे सरकार जावे, आमचे सरकार यावे व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व्हावे. म्हणून तुळजापूरची आई तुळजाभवानीच्या चरणी नवस केला होता. तो नवस पुर्ण झाला असून १ जानेवारी रोजी नवसपूर्ती पदयात्रा काढण्यात येत आहे. या औसा ते तुळजापूर अशी पायी निघणार असून या पदयात्रेचा पहिला मुक्काम आशीव येथे होणार आहे. तर दुसरा तुळजापूर तालुक्यात आशीव येथे रात्री नववर्षाची सुरुवात आध्यात्मिक कार्यक्रमाने व्हावी यासाठी जागरण गोंधळ, पोवाडा होणार आहे. या पदयात्रेत सहभागी व्हावे. आसे आवाहन आ. अभिमन्यू पवार यांनी केले आहे.

मोहम्मद रफी यांना भारतरत्न मिळावा ही जनसामान्यांची भावना : माजी आमदार खंदाडे

तभा वृत्तसेवा
अहमदपूर, दि.२६ डिसेंबर -

विसाव्या शतकातील महान गायक स्वरसम्राट पद्मश्री मोहम्मद रफी साहेब यांच्या शंभराव्या जयंती निमित्त नामफलकाला पुष्पहार अर्पण करून सामूहिक अभिवादन करण्यात आले.

येथील साहित्य संगीत कला अकादमीच्या वतीने या अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

अध्यक्षस्थानी मतदार संघाचे माजी आमदार बब्रुवान खंदाडे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून आंबेडकरी चळवळीतील जेष्ठ नेते गोपीनाथराव जोंधळे,माजी नगराध्यक्षा सरस्वतीबाई कांबळे, माजी नगरसेवक शेषेराव ससाणे, इमरोजभाई पटवेगर, रिपाई नेते अरूणभाऊ वाघंबर, सामाजिक नेते अण्णाराव सूर्यवंशी, दयानंदराव वाघमारे, शेखूभाई शेख, सय्यद याखूबभाई, जकीभाई पिंजारी, गणीभाई पत्रे, शेख चांद सौदागर, शिला शिंदे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अकादमीचे अध्यक्ष युवक नेते डॉ. सिध्दार्थकुमार सूर्यवंशी यांनी करून गेल्या बावीस वर्षापासून सूरू असलेल्या सांस्कृतिक चळवळीतील आढावा साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सचिन बानाटे,आकाश पवार, डॉ.बालाजी थिट्टे, माधव तिगोटे, प्रभाष कसादे, शिवाजीराव भालेराव, बालाजी वाघमारे, शेख जाबेर,अनिल वाघमारे, बालाजी वाघमारे, शेख कलिमभाई, शेख जहांगीर, दिनेश तिगोटे, डॉ. संजय वाघंबर, किरणकुमार कांबळे, चंद्रकांत कांबळे, शेख मतीनभाई आदींनी पुढाकार घेतला.

उदगीर शहर भाजपच्या वतीने अटलबिहारी बाजपेयी यांना अभिवादन

तभा वृत्तसेवा
उदगीर, दि.२६ डिसेंबर -

भारतीय जनता पक्षाचे दिवंगत नेते माजी पंतप्रधान स्व. अटलबिहारी बाजपेयी यांच्या जन्मशताब्दी दिनानिमित्त आज शहर भाजपच्या कार्यालयात अभिवादन करण्यात आले.

यावेळी भाजपचे शहराध्यक्ष मनोज पुदाले, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष राहुल केंद्रे, माजी नगराध्यक्ष बस्वराज बागबंदे, सुधीर भोसले, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा उत्तरा कलबुर्गे, तालुकाध्यक्ष शिवशंकर धुपे, ॲड. सावन पस्तापुरे, रामेश्वर पवार, आनंद बुंदे साईनाथ चिमेगाव, यांच्यासह भाजप पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी अटलबिहारी बाजपेयी यांच्या जयंती निमित्ताने शहर भाजपच्या वतीने काढण्यात आलेल्या वाजपेयी यांच्या चरित्रात्मक पत्रकाचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी बोलताना माजी जि. प. अध्यक्ष राहुल केंद्रे यांनी अटलबिहारी बाजपेयी यांनी संघर्षातून भारतीय जनता पक्षाची उभारणी केली आहे. त्यांच्या पंतप्रधान पदाच्या काळात केलेल्या अणूचाचणी मुळे भारताने जगात आपला दबदबा निर्माण केला. त्यांनी देशाच्या विकासाला नवी दिशा देणाऱ्या अनेक महत्वपूर्ण योजना राबवून देशाला प्रगतीपथावर नेण्याचे काम केले आहे. आजच्या भाजप कार्यकर्त्यांसाठी एक प्रेरणादायी ऊर्जा देणारे व्यक्तिमत्त्व म्हणून अटलजींच्या नेतृत्वाकडे पाहिले जात असल्याचे मत राहुल केंद्रे यांनी व्यक्त केले.

यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन ॲड. दत्ता पाटील यांनी केले. यावेळी चंद्र चकोर कारखाने, दिलीप मजगे, रामेश्वर चांडेश्वरी,आनंद साबणे, सुजित जीवने, मारोती कोटलवार, सुनील गुडमवार, मनोज धावडे, धोंडीराम मोरे, मारुती शिरनिवार, दीपक नागठाणे, संतोष बडगे, वेंकट काकरे, संजय पाटील,चेतन सूर्यवंशी, विजय पवार, रमेश गड्डमवार, रवी कसले, साई वाघमोडे, सरोजा वारकरे, श्यामला कारामुंगे, उषा माने, शिवकर्णा अंधारे, जया काबरा, मंदाकिनी जीवने, बबिता पांढरे, शिवगंगा बिरादार यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

शिवाजी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनीची राज्यस्तरीय विकसित भारत पीपीटी चॅलेंज स्पर्धेसाठी निवड

तभा वृत्तसेवा
उदगीर, दि.२६ डिसेंबर -

शिवाजी महाविद्यालयाची राष्ट्रीय सेवा योजनेची विद्यार्थिनी वैष्णवी श्रीकांत पाटील हिने भारत सरकारच्या युवक व क्रीडा मंत्रालयाच्या वतीने राष्ट्रीय युवा महोत्सव विकसित भारत यंग लीडर्स डायलॉग २०२४ अंतर्गत घेण्यात येत असलेल्या स्पर्धेमध्ये पहिले दोन टप्पे अनुक्रमे प्रश्नमंजुषा व निबंध स्पर्धा यशस्वीपणे पार केली असून तिची २६ डिसेंबर २०२४ रोजी क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने बालेवाडी पुणे येथे होत असलेल्या राज्यस्तरीय विकसित भारत पीपीटी चॅलेंज स्पर्धेसाठी निवड झालेली आहे.

त्याबद्दल शिवाजी महाविद्यालयाच्या वतीने तिचा यथोचित सत्कार करण्यात आला व तिला राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

जेवढे कष्ट जास्त तेवढे मोठे यश : जाधव

तभा वृत्तसेवा
निलंगा, दि.२६ डिसेंबर -

तालुक्यातील जेवरी येथील महाराष्ट्र विद्यालयात भारतीय थोर गणिततज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या जयंतीनिमित्त २२ डिसेंबर हा दिवस राष्ट्रीय गणित दिवस म्हणुन साजरा करण्यात आला.

या निमित्ताने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी जाधव एम.एम. यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वरील उदगार काढले. शाळेत विद्यार्थ्यांनी गणित रांगोळी, गणितीय कोडी, गणितीय उखाणे, गणित प्रश्नमंजुषा व गणित कार्यशाळा या विविध स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उस्फुर्त असा प्रतिसाद नोंदविला. विशेष गणित कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हा परिषद जेवरि शाळेचे प्राथमिक पदवीधर तथा सामाजिक कार्यकर्ते जाधव एम.एम. यांच्या हस्ते करण्यात आले तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मुख्याध्यापक नागेश तूबाकले उपस्थित होते.

विचारपिठावर प्रमुख पाहुणे कलशेट्टी पी.एस. उपस्थित होते. जाधव पुढे म्हणाले की यशाला शॉर्ट कट नसतो.जे जे शास्त्रज्ञ, गणित तज्ञ यांना कष्ट सोसावे लागले आहेत. या शाळेत विविध उपक्रम राबविले जातात याबद्दल विशेष अभिनंदन केले.

या कार्यशाळेस प्रशालेतील गणित शिक्षक देवसाळे, मोहोळकर, सपकाळे यांनी विद्यार्थ्यांस मार्गदर्शन केले. प्रशालेतील सर्व विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धेत उस्फुर्त सहभाग नोंदविला. या कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी प्रशालेतील सर्व शिक्षक तसेच जि.प. शाळेतील विद्यार्थी व शिक्षक तसेच प्रशालेतील विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी भौमितिक रांगोळ्या व स्वतः गणितिय शैक्षणिक साहित्य निर्मिती केली. गणित अध्यापक मंडळामार्फत घेण्यात आलेल्या गणित संबोध परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र देऊन अभिनंदन करण्यात आले.

सहभागी सर्व विद्यार्थ्यांचे गणित शिक्षकांचे प्रशालेचे मुख्याध्यापक तसेच प्रमुख अतिथी यांनी मनापासून अभिनंदन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तसेच आभार शालेय विद्यार्थिनींनी मानले.

सायकलिंग ग्रुप सदस्यांनी १२ तासात पूर्ण केले मैलारचे अंतर

तभा वृत्तसेवा
अहमदपूर, दि.२६ डिसेंबर -

अहमदपूर रनर्स व सायकलिंग ग्रुपचे सदस्य भरत इगे आणि सूर्या साकोळे यांनी अहमदपूर सायकलिंग ग्रुप च्या या सदस्यांनी HDOR हा १०० दिवस रोज सायकल चालविण्याचा करण्याचा संकल्प केला होता.

या अंतर्गत पहाटे ४:३० वाजता अहमदपूर येथून सुरुवात केली. उदगीर कमालनगर मार्गे १०:३० वाजता मैलार येथे पोहचले तेथे खंडोबा दर्शन घेऊन परत अहमदपूर येथे सायंकाळी ६ वा येत सदर अंतर १२ तासात पूर्ण केले. त्यांच्यासोबत १४ अन्य सदस्यांनी या मध्ये सहभाग नोंदवला होता. १०० दिवस सायकल प्रवास काय असतो याची माहिती श्री सूर्या साकोळे यांनी सर्वांना दिली ५ km पासून सुरुवात करून १०० व्या दिवशी २२१ km सायकलींग करण्याची कामगिरी केली. या स्पर्धेत नामदेव बरुरे, कृष्णा काळे, नवनाथ हांडे, लुल्ला शेख, धनंजय तोकले, संतोष पाटील, कपिल बिरादार, अभिजीत कराड, राहुल हिप्परगेकर, अजबसिंग, वेदांत राठोड व वय ६७ वर्ष राहूनही तरुणासोबत त्याच जोशाने सायकलिंग करणारे तम्मेवार यांनी सहभाग घेतला.

वेगवेगळ्या ५ स्टेज मधील या स्पर्धेत नवनाथ हांडे व कृष्णा काळे यांनी डायमंड मेडल, भरत इगे यांनी प्लॅटिनम मेडल तर बरुरे, साकोळे, तम्मेवार व अजबसिंग यांनी गोल्ड मेडल आणि इतर सदस्यांनी सिल्वर मेडल मिळविले.

भाजपच्या कार्यकर्त्यांचा व पदाधिकाऱ्यांचा योग्य तो सन्मान करणार : माजी मंत्री आ. बनसोडे

भाजप कार्यालयात आ. बनसोडे यांचा सत्कार

तभा वृत्तसेवा
उदगीर, दि.२६ डिसेंबर -

नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणूकीत महायुतीचा उमेदवार म्हणून मला निवडून आणण्यासाठी भाजपच्या नेते व कार्यकर्त्यांनी जीवाचे रान केले आहे. त्यांचे उपकार मी कधीही विसरू शकणार नाही. आगामी काळात भाजपच्या सर्व नेते, पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा आपण योग्य तो सन्मान करू अशी निःसंदिग्ध ग्वाही माजी मंत्री आ. संजय बनसोडे यांनी दिली.

विधानसभा निवडणुकीत उदगीर मतदारसंघातुन महायुतीचे उमेदवार माजी मंत्री आ. संजय बनसोडे हे दुसऱ्यांदा ऐतिहासिक मतांनी निवडून आल्याबद्दल भारतीय जनता पक्षाच्या वतीने भाजपच्या शहर कार्यालयात माजी मंत्री आ. संजय बनसोडे यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी भाजपचे शहराध्यक्ष मनोज पुदाले, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष राहुल केंद्रे, उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके, माजी नगराध्यक्ष बस्वराज बागबंदे, सुधीर भोसले, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा उत्तरा कलबुर्गे, तालुकाध्यक्ष शिवशंकर धुपे, बापूराव यलमटे, विजय निटूरे, मनोहर भंडे, नंदकुमार नलंदवार, रामचंद्र मुक्कावार, ऍड. बस्वराज पाटील कोळखेडकर, ॲड. सावन पस्तापुरे, गणेश गायकवाड यांच्यासह भाजप पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी माजी मंत्री आ. संजय बनसोडे यांचा भाजपा महिला आघाडीच्या कार्यकर्त्यांनी आ. बनसोडे यांच्यावर पुष्पवृष्टी करून औक्षण करून उत्साहात स्वागत केले.

यावेळी बोलताना माजी मंत्री आ. बनसोडे म्हणाले की, मागच्या पाच वर्षात आपण मोठ्या प्रमाणात विकासकामे करून उदगीर मतदारसंघाचा कायापालट केला आहे.

आगामी काळातही आपणा सर्वांच्या सहकार्याने हा विकासाचा वेग आणखी वाढविण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे सांगून आ. बनसोडे यांनी उदगीर विधानसभा मतदारसंघात विकासाची कामे करीत असताना कसलाही दुजाभाव न करणार नसल्याचे ते म्हणाले. विधानसभा निवडणुकीत भाजपच्या बुथप्रमुख, शक्तीप्रमुख, यांच्यासह प्रत्येक कार्यकर्त्यांनी स्वतःला उमेदवार समजून मला निवडून आणण्यासाठी प्रयत्न केले आहेत याची मला जाणीव असून या सर्वांना सोबत घेऊन महायुती बळकट करण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे आ. बनसोडे यावेळी म्हणाले. यावेळी माजी नगराध्यक्ष बस्वराज बागबंदे यांनी भाजप कार्यकर्त्यांच्या आमदार महोदयाकडून असलेल्या अपेक्षा व्यक्त करून आगामी काळात महायुती आणखी भक्कम करण्यासाठी एकमेकांच्या हातात हात घालून काम करणार असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन ॲड. दत्ताजी पाटील यांनी केले. यावेळी नगरसेवक लखन कांबळे, रामेश्वर पवार, आनंद बुंदे, अमोल अंक्कले, उदय ठाकूर, सुजित जीवने, मारोती कोटलवार, भोसले, दीपक शिंदे, रवी कासले, अनिल मुदाळे, अमर सूर्यवंशी, अशोक वाकुडे, सुनील गुडमेवार, राहुल आपटे, चैतन सूर्यवंशी, केशव रंगवाड, अनिकेत गुडमेवार, विजय मामुलवार, शक्तिमान मद्देवार,सुशील आपटे, साई आपटे, विजय पवार, सरोजा वारकरे, श्यामला कारामुंगे, उषा माने, शिवकर्णा अंधारे, जया काबरा, मंदाकिनी जीवने, बबिता पांढरे, शिवगंगा बिरादार यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

पोलीसांनी केले सव्वाशे मोबाईल जप्त

तभा वृत्तसेवा
नांदेड,दि. २६ डिसेंबर

नांदेड पोलिसांच्या सायबर विभागाने एकूण १२५ मोबाईल पकडले आहेत. त्यांची किंमत जवळपास १८ लाख रुपये आहे. ते मालकांना परत देण्यात आले आहेत. तसेच दोन लाख ३९ हजार ६२० रुपये एवढी फसवणूक झालेली रक्कम तक्रारदारांना परत दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सायबर विभागाचे पोलीस अधीक्षक धीरज चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक एम.बी.चव्हाण, पोलीस अंमलदार राजेंद्र सिटीकर, दिपक ओढणे, दावीद पिडगे, महंमद आसिफ, विलास राठोड, काशिनाथ कारखेडे, मोहन स्वामी, दिपक शेवाळे, ज्ञानेश्वर यन्नावार, व्यंकट सांगळे, दिपक राठोड आणि कांचन कसबे यांनी गहाळ झालेले १२५ मोबाईल शोधून काढले. त्यांची किंमत जवळपास १८ लाख रुपये आहे. हे मोबाईल ज्या तक्रारदाराकडून गहाळ झाले आहेत. त्यांना देण्याची तयारी पोलिसांनी ठेवली आहे. त्यातील काही मोबाईल पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांच्या हस्ते मालकांना परत करण्यात आले. सायबर पोलिसांनी सापडलेल्या १२५ मोबाईलचा आयएमईआय क्रमांक नांदेड जिल्हा पोलीस दलाच्या संकेतस्थळावर, फेसबुक पेजवर आणि ट्विटरवर प्रसारीत केले आहेत. ज्या लोकांचे मोबाईल असतील त्यांनी नांदेड पोलीस अधीक्षक कार्यालयात असलेल्या सायबर पोलीस ठाण्यातून आपले मोबाईल परत घ्यावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहेत.

ऑनलाईन फसवणुकीमुळे नॅशनल सायबर क्राईमच्या (एनसीसीआरपी) आलेल्या तक्रारी तसेच क्रमांक १९३० वर आलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने विविध बँकांना पत्रव्यवहार व पाठपुरावा करुन फसवणूक झालेली रक्कम होल्ड करुन ठेवण्यास सांगण्यात आली. एकूण सहा तक्रारी एनसीसीआरपीवर आल्या होत्या त्यात एकूण पाच लाख ३२ हजार ८९० रुपयांची ऑनलाईन फसवणूक झाली होती. त्यातील २ लाख ३९ हजार ६२० रुपये तक्रारदारांना परत देण्यात आले आहेत.

चिखलीच्या शिवबाबा आश्रम शाळेत संभाग क्रिडा महोत्सवाचे आयोजन

तभा वृत्तसेवा
किनवट,दि. २६ डिसेंबर

एकल अभियानांतर्गत किनवट तालुक्यातील मौजे चिखली बु येथील शिवबाबा माध्यमिक आश्रम शाळेत २८ व २९ डिसेंबर रोजी संभागस्तरीय क्रीडा महोत्सवाचे आयोजन केले असून या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन केंद्रीय राज्यमंत्री रक्षाताई खडसे यांच्या हस्ते होणार आहे. या क्रीडा महोत्सवाला जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन एकल अभियानाचे अध्यक्ष अनिरुद्ध केंद्रे यांनी केले आहे.

एकल अभियान संभाग महाराष्ट्र अभ्युदय युथ क्लब यांच्या वतीने किनवट तालुक्यातील मौजे चिखली बु येथील शिवबाबा माध्यमिक आश्रम शाळेत दिनांक २८ व २९ असे दोन दिवस संभागस्तरीय क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन केंद्रीय राज्यमंत्री(क्रिडा व युवक कल्याण)रक्षाताई खडसे यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्लोबल हॉस्पिटल नांदेड येथील डॉ विद्याधर भेदे हे राहणार असून ह भ प श्री नारायण महाराज माधापुरकर, आदिलाबाद लोकसभेचे खा.नागेश घोडाम,किनवट विधानसभेचे आमदार भीमराव केराम,एकल अभियानाचे राष्ट्रीय संघटन प्रभारी माधवेन्द्रजी सिंह, विभाग संघचालक संतोष तिरमणवार, संरक्षक निखिलजी मुंडले,कोनाडे कोचिंग क्लासेसचे संचालक व्यंकटरावजी कोनाडे, प्रभाग अध्यक्ष अरुणाताई पुरोहित,उपाध्यक्ष दीपालीताई गाडगे व मनीदीदी गोयंका यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती लाभणार आहे. क्रीडा महोत्सवाच्या माध्यमातून दुर्गम भागात दडलेल्या कलागुणांना जिल्हा राज्य व राष्ट्रीय स्तरावर संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने एकल विद्यालय खेळाडूंची नर्सरी ही संकल्पना घेऊन अभ्युदय युथ क्लब संघटनेकडून भारतातील एक लाख गावांमध्ये क्रीडा महोत्सव आयोजित करण्याचा निर्णय घेतला असून त्याचाच एक भाग म्हणून किनवट तालुक्यातील चिखली येथील शिवबाबा माध्यमिक आश्रम शाळेत या क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. ग्रामस्तरीय क्रीडा महोत्सवात निवड झालेल्या विद्यार्थी खेळाडूंना या क्रीडा महोत्सवात सहभागी होता येईल. या क्रीडा महोत्सवाच्या कार्यक्रमाला जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन एकल अभियानाचे अध्यक्ष अनिरुद्ध केंद्रे यांनी केले आहे.

रस्त्यासाठी दिले खासदारांना रस्त्यावरच निवेदन

तभा वृत्तसेवा
देगलूर ,दि. २६ डिसेंबर

कै. वसंतरावजी चव्हाण यांनी मानूर येथील जाहीर सभेत निवडून आल्यानंतर प्रथम प्राधान्य या रस्ताचा कामासाठी असेल असे जाहीरपणे जनतेस विश्वास दिले होते परंतू दुर्दैवाने ते आपल्यात नसून खासदार रवींद्र चव्हाण यांना त्याच्या शब्दाची आठवण करून देतं, त्यांनी दिलेल्या विश्वासास तडा न जाऊ देता या रस्ताच्या कामात प्रत्यक्ष स्वत लक्ष देऊन जलद गतीने मंजुरी आणून नवीन करून या सिमाभागास न्याय द्यावे अशी मागणी निवेदन देऊन करण्यात आली.

तसेच बल्लूर ते मानूर हा रस्ता दुरुस्ती कामे प्रस्तावित व मंजूर कालवधीत होणे संबधित विभागाची जबाबदारी असताना तसेच कार्य झाले नाहीत यामुळे विषयी नमूद रस्ताची दुरवस्था पाहताक्षणी संबधित विभाग लोकप्रतिनिधी व कंत्राटदार यांची कितीची भागीदारी असेल असे प्रश्न सर्व सामान्य जनतेचा मनात रेंगाळत आहेत. हा रस्ता दुरुस्तीच्या नावे स्थानिक लोकप्रतिनिधी व कंत्राटदार यांनी संबधित विभागास हातासी धरून संयुक्तपणे मलेदा लाटण्या पलीकडे इथे कामे दिसून येत नसून, आपण हा सीमावृत्ती भाग व रस्तालगतच्या सर्व गांवकऱ्यांनी विश्वास घेऊन सदरील रस्ताचे सक्षम काम जलद गतीने करून सार्थ करावे असे मत उपस्थित नागरिकांनी मांडले.

यावेळी मा. नगराध्यक्ष मोगलाजी शिरशेटवार,बालाजी पाटील बेटमोगरेकर, निवृत्ती कांबळे,नितेश पाटील,बालाजी थडके यांच्या उपस्थितीत अँड.अंकुशरा जे जाधव, विशाल पवार, शिवकुमार बिरादार, सचिन पाटील, वैभव पाटील, श्रीराम पाटील, विष्णू रेड्डी, दीपक रेड्डी, राहुल फिरंगे, राजू वाघमारे, राजू वाघमारे आदी च्या स्वक्षारीने निवेदन खासदार रवींद्र चव्हाण यांना देऊन मागणी करण्यात आले.

बल्लूर फाटा ते मानूर हा भाग सीमावृत्ती असून गेल्या अनेक वर्षांपासून हा रस्ता खराब असल्याने या रस्त्यावर अनेकांना स्वतःचे जीव हि गमवावे लागलं आहे. एवढेच नसून या भागातून शाळा, महाविद्यालय आदी साठी विध्यार्थी, नागरिक ये जा करतात परंतु रस्त्यामुळे या भागात महामंडळ ची सुविधा वेळेवर नाही त्यामुळे विध्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होतं आहे.आम्ही सिमावृत्ती भागात राहतो म्हणून आमच्या कडे कोणी लक्ष देतं नाही का? असा सवाल विशाल पवार यांनी केले.

पेसा कायद्याची अंमलबजावणी करण्याचा विसर

तभा वृत्तसेवा
माहूर,दि. २६ डिसेंबर

पेसा कायद्याची जनजागृती करण्याचे कार्यक्रम जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद,सहाय्यक जिल्हाधिकारी तथा उप विभागीय दंडाधिकारी किनवट,गट विकास अधिकारी पं.स.माहूर यांच्या आदेशानुसार माहूर तालुक्यात घेण्यात येत आहेत.

ही बाब चांगली असली तरी पेसा क्षेत्र असलेल्या मौजे वझरा शेख फरीद ता.माहूर ग्रामपंचायतीने दि.१२ डिसेंबर २०२३ रोजी ग्रामसभेत पारित केलेल्या ठरवाची अंमलबजावणी होतांना दिसत नाही किंबहुना त्या ठरावाची अंमलबजावणी करावी म्हणून मागील दीड वर्षापासून जिल्हाधिकारी कार्यालया समोर सीटू कामगार संघटनेचे बेमुद्दत साखळी उपोषण अद्यापही सुरु आहे. कारवाई न होणे ही बाब खुपच दुर्दैवी असल्याचे सीटूचे जनरल सेक्रेटरी कॉ. गंगाधर गायकवाड यांनी म्हटले आहे. वझरा ह्या आदिवासी,डोंगराळ, नक्षलप्रवण क्षेत्रात असलेल्या गावात मागील पन्नास वर्षात नवीन प्लॉट्स पडलेले नाहीत. त्याचे कारण म्हणजे वझरा गावाशेजारी असलेली जमीन ही वन विभागाची व श्री दत्त शिखर संस्थानची आहे.

पर्यटनस्थळ म्हणून सुप्रसिद्ध असलेला शेख फरीद दर्गा व धबधबा पाहावयास वझरा येथे दररोज हजारो पर्यटक येत असतात. या ठिकाणी गेली पन्नास वर्षात प्लॉट्स पडले नसल्याने गावातील अनेक घरे इतर राज्यात व परगावी स्थलांतरित झाली आहेत. वझरा येथे नवीन प्लॉट्स पाडून गरजू आणि अर्जदार पीडितांना मोफत प्लॉट देण्यात यावेत व घरकुल बांधण्यासाठी ५ लाख रुपये अनुदान स्वरूपात मंजूर करावेत ही मागणी सातत्याने मागील पाच वर्षांपासून करण्यात येत आहे.पाच लाख मंजुरीचा प्रस्ताव जिल्हा परिषदे कडून शासनाकडे पाठविण्यात आला आहे. या प्रकरणी अनेकवेळा मोर्चे,धरणे,उपोषणे,निदर्शने झालीत परंतु शासन दखल घेण्यास तयार नाही.

वझरा येथील २०० पीडितांचे सामूहिक उपोषण किनवटचे आमदार भीमराव रामजी केराम यांनी मागे उठविले असून राहण्यासाठी जागा मिळवून देणार असे आश्वासन त्यांनी दिले आहे व श्री दत्त शिखर संस्थानच्या विश्ववस्ता सोबत देखील त्यांनी संवाद साधला आहे. पेसा ग्रामपंचायत असलेल्या ठरावाची तातडीने अंमलबजावणी करावी हा कायदा आहे परंतु येथे अंमलबजावणी न करता जनजागृती करण्याचे कार्य जिल्हा प्रशासन करीत आहे. जिल्हाधिकारी यांनी स्वतः लक्ष घालून एकदाचे वझरा या गावचा ५० वर्षापासून प्रलंबीत असलेला प्रश्न सोडवावा आणि सोक्षमोक्ष करावे तसेच अवैध प्लॉट्स विक्री करणाऱ्यावर कठोर कारवाई करावी अशी विनंती सीटूचे जनरल सेक्रेटरी कॉ.गंगाधर गायकवाड यांनी केली आहे.

काय आहे पेसा कायदा

PES कायदा, अनुसूचित जमाती आणि इतर पारंपारिक वनवासी (वन हक्कांची मान्यता) कायदा, २००६ (FR) चा दूरचा पूर्वज असलेला, अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभेच्या संस्थेला अधिकार देणारा पहिला कायदा होता. PES कायदा हा देशातील आदिवासी समर्थक कायद्यातील एक अग्रणी आहे, विशेषतः संरक्षण केंद्रित सरकारी धोरणाच्या टप्प्यानंतर.

तालुका कृषी कार्यालय तात्काळ स्थलांतर करावे अन्यथा उपोषण

धर्माबाद-धर्माबाद येथील तालुका कृषी कार्यालय येत्या १ जानेवारीपासून स्थलांतर न झाल्यास २५ जानेवारी पासून आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा धर्माबाद तालुका पत्रकार संरक्षण समितिचे तालुका अध्यक्ष म.मुबाशिर, धर्माबाद बहुभाषिक पत्रकार संघटनाचें तालुका अध्यक्ष पोत्तन्ना लखमावाड, धर्माबाद तालुका पत्रकार संघटनेचे अध्यक्ष बाबुराव पाटील आलूरकर, इंद्रधनुष्य टाइम्स चे संपादक डॉ. सुधीर येलमे व सामाजिक कार्यकर्ते पत्रकार नागनाथ माळगे यांनी लेखी निवेदनाद्वारे उपविभागीय अधिकारी धर्माबाद यांना निवेदनाद्वारे विनंती केली आहे.तालुका निर्मितीपासूनच येथील तालुका कृषी कार्यालय हे भाडेतत्त्वावर आहे.भाड्याने घेतलेल्या सदरील इमारतीमध्ये तळमजला व पहिला मजल्यावर कार्यालय असून अतिवृष्टी झाली तर तळमजल्यात कमरे इतके पाणी साचते. त्यामुळे बी-बियाणे, खते, शेतीविषयक अवजारे व कार्यालयीन दप्तरे याचे नुकसान होत आहे. त्या पार्श्वभूमीवर सदरील कृषी कार्यालय हे नगरपालिकेच्या कॉम्प्लेक्समध्ये स्थलांतरित करा, असा शासनाचा आदेश प्राप्त झाला तरी सदरील कार्यालय स्थलांतरित व्हावे म्हणून तालुका कृषी अधिकारी धर्माबाद जिल्हा नांदेड या पत्रानुसार खासगी इमारतीतून निमशासकीय इमारतीत एक जानेवारी २०२५ रोजी स्थलांतर झाले नसल्यास २५ जानेवारीपासून कार्यालय स्थलांतर होईपर्यंत सदरील कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा धर्माबाद तालुका पत्रकार संरक्षण समितिचे तालुका अध्यक्ष म.मुबाशिर, धर्माबाद बहुभाषिक पत्रकार संघटनाचें तालुका अध्यक्ष पोत्तन्ना लखमावाड, धर्माबाद तालुका पत्रकार संघटनेचे अध्यक्ष बाबुराव पाटील आलूरकर, इंद्रधनुष्य टाइम्सचे संपादक डॉ. सुधीर येलमे व सामाजिक कार्यकर्ते पत्रकार नागनाथ माळगे यांनी उपविभागीय अधिकारी यांना देत जिल्हाधिकारी, जिल्हा कृषी अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी देगलूर, तालुका कृषी अधिकारी, यांना निवेदनाद्वारे विनंती करण्यात आली असून संबंधित कार्यालयाचे आदेश येऊन सुद्धा तालुका कृषी अधिकारी कार्यालय १/१/२०२५ रोजी स्थलांतर न झाल्यास अन्यथा २५/१/२०२५ रोजी आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आले.

महात्मा फुले हायस्कूलच्या संचिताने पटकावला प्रथम क्रमांक

तभा वृत्तसेवा
नांदेड,दि. २६ डिसेंबर

अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला हेलस तर्फे दरवर्षी साने गुरुजी जयंतीनिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या कथाकथन स्पर्धेत यंदा नांदेडच्या महात्मा फुले हायस्कूलच्या संचिताने विभागीय स्तरावर बाजी मारली आहे.

जिल्हास्तरीय स्पर्धा प्रियदर्शिनी विद्या संकुल, नांदेड येथे शिक्षणाधिकारी व्यंकटेश चौधरी, शिक्षण विस्तार अधिकारी पद्माकर कुलकर्णी, गट शिक्षणाधिकारी व्यंकट गंदपवाड, बालासाहेब माधसवाड व विलास कोळनुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडल्या. स्पर्धेचे परीक्षण प्रवीण राऊत, कविता जोशी व रूपाली गोजवडकर यांनी केले. जिल्हास्तरीय स्पर्धेत संचिता सुभाष अष्टेकरने प्रथम क्रमांक मिळवला. द्वितीय क्रमांक पद्मावती जाधव तर तृतीय क्रमांक अलिशा शेख यांनी पटकावला. विभागीय स्तरासाठी बाबानगरच्या महात्मा फुले हायस्कूलची निवड करण्यात आली होती. परभणी येथे पार पडलेल्या विभागीय स्पर्धेत संचिताने उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक मिळवला. शाळेच्या मुख्याध्यापिका सुरेखा कदम, उपमुख्याध्यापिका ललिता कोलेवाड, पर्यवेक्षक अरुण कल्याणकर, पर्यवेक्षिका ज्योती महाराज व वैशाली देशमुख यांनी संचिताला प्रोत्साहन दिले.

शारदा भवन शिक्षण संस्थेचे सचिव डी. पी. सावंत, सहसचिव रावसाहेब शेंदारकर, खजिनदार ॲड. उदयराज निंबाळकर, संचालक नरेंद्र चव्हाण यांनी संचिताचे कौतुक व अभिनंदन केले आहे. महात्मा फुले हायस्कूलमधील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी संचिताच्या यशाचे अभिनंदन केले आहे.

आदमपूर येथे खंडोबा पालखीचा यात्रा महोत्सव

तभा वृत्तसेवा
आदमपूर,दि. २६ डिसेंबर

मौजे आदमपूर,(ता.बिलोली) येथे दरवर्षीप्रमाणे श्रीक्षेत्र माळेगांव यात्रेपूर्वी याही वर्षी श्रीदैवत खंडोबा देवाचा अर्थात श्री.मल्हारी मार्तंडांचा अठरावा वार्षिक पालखी यात्रा महोत्सव व खंडोबा देव मंदिर मूर्तिरूपी प्राणप्रतिष्ठापणा सोहळा दि.२६ डिसेंबर रोजी गुरूवारी वाजतगाजत संपन्न झाला आहे.

येथील श्री.खंडोबा मंदिरावरील पुजारी शिवानंद महाराज डोईफोडे आदमपूरकर व खंडोबा अनुयायी व गावकरी यांच्या सहकार्याने ही यात्रा आयोजित केली जाते.देव मल्हारी मार्तंड पालखीची सुरूवात पुजारी शिवानंद डोईफोडे महाराज यांच्या घरातून परंपरागत वाजत गाजत दुपारी एक वाजता भक्तगणांनी केली. गावातील विविध मंदिरांचे दर्शन करीत पालखीचे गाव मुख्य रस्त्यावरून मार्गक्रमण सुरू असते.चाबूक, डफ,तुणतुण्याच्या लयीत वारूंनी पालखी प्रस्थानावेळी रंगत आणली. पिवळ्या धमक भंडाऱ्यात आसमंत न्हाऊन निघाले.पिवळे निशाण डौलाने फडफडत होते.फुले, खोबरे,रेवडी आणि बत्ताशांची मुक्त उधळण झाली.आदमपूरसह गाव परिसरातील अनुयायी यावेळी दर्शनासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दर्जेदार पद्धतीने उभारला जातोय किनवटचा उच्चपातळी बंधारा

आ. भीमराव केराम यांचे यांचे कामाकडे विशेष लक्ष

तभा वृत्तसेवा
किनवट,दि. २६ डिसेंबर

शहराला लागूनच पैनगंगा नदीवर उच्च पातळीचा बंधारा विकासप्रेमी आमदार भीमराव केराम यांच्या प्रयत्नाने आला असून या बंधाऱ्यामुळे परिसरातील शेती सुजलाम सुफलाम व शहर व ग्रामीण भागात पाण्याची पातळी वर राहणार असून बंधाऱ्याचे काम प्रगतीपथावर चालू असल्यामुळे सर्व विकास प्रेमी नागरिकांमध्ये बंधाऱ्याबाबत समाधान व्यक्त केल्या जात आहे .

सविस्तर वृत्त असे की मागील काही वर्षांपूर्वी किनवट शहराला लागूनच पैनगंगा नदी पात्रात आलेला हाच बंधारा अभयारण्याच्या काही तांत्रिक अडचणीमुळे तो बंधारा होऊ शकला नाही त्यामुळे शहर व परिसरामध्ये पाण्याचा तुटवडा जाणवत होता व शेतीला पाणी मुबलक मिळत नसल्यामुळे कोरडवाहू शेती राहू लागली .

किनवट माहूर तालुक्याचे विकास प्रेमी आमदार भीमराव केराम यांनी किनवट तालुका सुजलाम सुफलाम होण्यासाठी सदरील बंधारा

आणण्यासाठी सतत पाठपुरावा करून आनला असुन किनवट शहराला लागूनच तो बंधारा बनवण्याचे काम शारदा कॉन्ट्रक्शन कंपनीला दिले असून बंधारा भूमिपूजन शुभारंभ प्रसंगी शारदा कॉन्ट्रक्शन चे अभियंते यांनी विश्वास संपादन करत सांगितले की केवळ दोन वर्षांमध्ये आम्ही बंधारा पूर्ण करण्याचे प्रयत्न करणार असून यामध्ये आमदार केराम साहेब यांच्या पाठपुराव्यामुळे हा बंधारा नियोजित जागी बनवण्याचा शुभारंभ झाला आहे . सुप्रभातला विकास प्रेमी नागरिक मॉर्निंग वॉक व इव्हिनिंग वॉक करिता फिरत असताना त्यांना सदरील उच्च पातळीचा बंधाऱ्याचे काम प्रगतीपथावर असल्यामुळे शहरामध्ये समाधान व्यक्त केल्या जात आहे .

महिला बचत गट बनला स्वच्छता दूत

तभा वृत्तसेवा
मुदखेड,दि. २६ डिसेंबर

मुदखेड शहरातील घनकचरा व्यवस्थापनाच्या कामात गौतमी महिला बचत गटांनी सहभाग घेतलेला आहे.

शहरामध्ये विविध घंटागाड्यांद्वारे कचऱ्याचे संकलन केले जाते परंतु अनेक नागरिक या गाड्यांमध्ये कचरा न टाकता उघड्यावर कचरा फेकत आहेत तसेच ओला व सुका कचरा वेगवेगळा न करता एकत्रित स्वरूपात कचरा देत आहेत असे मुख्याधिकारी शैलेश फडसे यांच्या निदर्शनास आल्यानंतर गौतमी महिला बचत गटामार्फत जनजागृती करण्याचा विचार नगर परिषदेचे मुख्याधिकारी शैलेश फडसे यांनी केला आणि शहरांमधील बचत गटांशी संपर्क साधला महिला बचत गटांनी सुद्धा या कामासाठी आपली सहमती दर्शवली आणि पाणीपुरवठा अभियंता सुशील खिल्लारे, व मराठी मुकदम सुनील माळी, यांच्या मार्गदर्शनाखाली बचत गटातील सहा महिला सौ. अर्चना कसबे, सौ. संगीताबाई बादलवाड, सौ. चौत्राबाई कमळे, सौ. पिंगळाबाई चुंचे, सौ.अंजनाबाई तेलंगे, सौ. वनिता कदम, यांनी दररोज सकाळी पाच वाजेपासून विविध प्रभागांमध्ये फिरून वर्गीकृत कचरा घंटागाडी मध्ये टाकण्याबाबत प्रात्यक्षिक द्वारे जनजागृती करत आहेत याचा सकारात्मक परिणाम पहायला मिळत आहे असे मुख्याधिकारी शैलेश फडसे यांनी सांगितले.

जाहीर प्रगटन
तहसिलदार उमरी तथा तालुका दंडाधिकारी उमरी यांचे न्यायालयात
इ. कि. फौ. अर्ज.क्र. १७६/२०२४
ग्यानु कडकनाथ कांबळे
विरुध्द
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय सोमठाणा ता.उमरी

प्रकरण- जन्म नोंद घेणे बाबत.

ज्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार नामे ग्यानु कडकनाथ कांबळे रा. सोमठाणा ता. उमरी जि. नांदेड यांनी कार्यालयात हजर राहुन जन्म/मृत्यू नोंदणी कायदा २०२३ अन्वये दिनांक ०३/१०/२०२४ रोजी नोद घेण्यासाठी इ. कि. फौ. अर्ज १७७/२०२४ दाखल केला आहे.

अर्जदार यांची मुलगी नामे अनुसया ग्यानु कांबळे यांचा जन्म दिनांक ०४/०५/२००८ रोजी झाल्याची नोंद मौ.सोमठाणा ता. उमरी जि. नांदेड येथे उपलब्ध नाही.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस व संबंधीतास कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांच्या जन्माची नोंद घेण्यासाठी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी लेखी आक्षेप या कार्यालयास सदर जाहीर प्रगटनापासून १५ दिवसाच्या आत सादर करावा, नंतर प्राप्त होणा-या आक्षेपाचा विचार केल्या जाणार नाही १५ दिवसात आक्षेप प्राप्त न झाल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारीत करण्यात येईल.

दिनांक १६/१२/२०२४ **आदेशावरुन**
स्थळ - उमरी **तहसिलदार उमरी**

सुचना

हिमायतनगर शहरातील सर्व नागरिकांना सूचित करण्यात येते की, शहरात सार्वजनिक/खासगी जागेवर किंवा खासगी इमारतीवर कसलीही जाहिरात, शुभेच्छा, शोक संदेश संबंधी **बॅनर/होर्डिंग/फलक/फ्लेक्स** उभारायचे असल्यास महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत आकाश चिन्हे व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण मार्गदर्शक तत्वे २०२३, नगर विकास विभाग, दि २२/०६/२०२३ यांचे अवलोकन करून रीतसर या कार्यालयाची परवानगी घेणे बंधनकारक आहे.

शहरात या कार्यालयाची परवानगी न घेता सार्वजनिक खासगी जागेवर किंवा खासगी इमारतीवर कसलीही जाहिरात, शुभेच्छा, शोक संदेश इत्यादी बाबत बॅनर/होर्डिंग/फलक/फ्लेक्स उभारल्यास, महाराष्ट्र मालमत्तेच्या विरुपनास प्रतिबंध करण्याकरिता अधिनियम १९९५ अन्वये कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

मुख्याधिकारी
नगरपंचायत हिमायतनगर

सोलापूर तरुण भारत Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर

छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, दि. २७ डिसेंबर २०२४

वाढदिवसाच्या बॅनरवर फोटो का टाकला नाही म्हणून मारहाण करून केला पाय फ्रॅक्चर

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २६ डिसेंबर : पैठण तालुक्यातील बिडकीन येथील कल्याणनगर येथे एकाच गल्लीतील राहणारे मित्र यांनी दुसऱ्या मित्राच्या वाढदिवसाच्या बॅनरवर माझा फोटो का टाकला नाही म्हणुन एका जनाला जबर मारहाण केली.फिर्यादि विकास संजय शिंदे (वय २२) व्यवसाय मजुरी रा. कल्याणनगर बिडकीन याला सचिन संजय जाधव व विजय जगधने या दोघांनी सकाळी सात वाजेच्या सुमारास घरून सचिन याच्या दुचाकीवर बसून नेले व आपल्याला सुभाषभाऊ जाधव यांचे वाढदिवसाचे बॅनर लावायचे आहे असे म्हणून डीएमआयसी मधील शिवनाई रोडवर घेऊन जाऊन तिथे चिंचेच्या झाडाजवळ रोडच्या खाली नेऊन तू माझा फोटो सुभाषभाऊच्या बॅनर वर का टाकला नाही. असे म्हणून विकासच्या दोन्ही पायांवर लाकडी दांड्याने बेदम मारहाण करून गंभीर दुखापत करून उजवा पाय फ्रॅक्चर केला . व चापट बुक्यांनी मारहाण केली म्हणून बिडकीन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास पोहेका संदीप धनेधर करीत आहे.

एस.टी.बस चालकाला चारचाकी वाहनचालकाने केली मारहाण ! हतनुर टोल प्लाझा येथील घटना

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.२६ डिसेंबर - हतनुर टोल प्लाझा येथे एस.टी बस चालकाला चारचाकी चालकाने मारहाण केल्याची घटना घडली आहे, तुळजापूर धुळे एस.टी. महामंडळाची बस क्र.एम. एच.१३ सी.यु.७३८० छत्रपती संभाजीनगर वरून प्रवाशांना घेऊन धुळेच्या दिशेने जात होती तर पाठीमागून येणारी चारचाकी क्र. एम.एच.१५ एफ.टी.०४३० च्या चालकाने हतनुर टोल प्लाझा येथे बस येताच अचानकपणे चालक जगन्नाथ गुळवे वय ४० वर्षे व वाहक राजेश चाटे वय ३८ वर्षे यांना मारहाण केली अचानक घडलेल्या या घटनेमुळे काही काळ प्रवाशांसह चालक वाहक गोंधळात पडले, ऐनवेळी प्रवाशांनी सोडवासोड केल्याने वाद टळला,वाद होण्याचं नेमकं कारण काय आहे हे मात्र कळू शकले नाही.

वीरबाल दिवस जि. प. शाळेत उत्साहात साजरा

तभा वूतसेवा

खुलताबाद प्रतिनिधी शहरातील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करुन वीरबाल दिवस साजरा करण्यात आला यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विद्यार्थ्या चांगला अभ्यास करावा प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे गुण असतात कोणी कलेमध्ये प्राविण्य मिळू शकतो कोणी खेळामध्ये प्राविण्य मिळू शकतो कोणी चांगल्या स्पर्धे परीक्षा देऊन चांगल्या पदावर ऑफिसर होऊ शकतो यावेळी विद्यार्थ्यांना चांगला अभ्यास करण्यासाठी वही व पेन भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने वाटप करण्यात आले. यावेळी, भारतीय जनता पार्टी खुलताबाद तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर नलावडे,भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे, विर बाल दिवस जिल्हा सहसयोजक सतिश दांडेकर, शहराध्यक्ष परसराम बारगळ, ,, माजी नगरसेवक योगेश बारगळ. सोनु भावसार, विजय चंडवाडे, अनिल करपे, बबन वर्दे, शंकर अंभोरे, गणेश सावजी, गणेश झुरावत , निलेश गायकवाड, काकासाहेब गायकवाड,मुख्याध्यापक शेख, गायकवाड मॅडम, तसेच पदाधिकारी, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

बिडकीन भगवती विद्यालय मध्ये बाल वीर दिवस मोठ्या उत्साहात साजरा



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २६ डिसेंबर : पैठण तालुक्यातील भगवती विद्यालय, येथे मोठया उत्साहात बालवीर दिवस साजरा करण्यात आला. मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासंकल्पनेतून किशोरवईन मुळामध्ये मनोसांवर्धन करणे, श्रजनशीलता वाढवणे या हेतूने भारताच्या भवितवयाचा पाया असलेल्या बालकाला सन्मानित करण्यासाठी राष्ट्रीय वीर बालदीन साजरा करण्यात आला. प्रशालेचे मुख्याध्यापक एकनाथ राशींनकर यांनी बालवीर जोरावर सिह व फतेहसिह यांच्या प्रतिमेस पुस्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरवात केली. या प्रसंगी प्रशालेत निबंध, चित्रकला, कथाकथन व प्रन्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आल्या. मु अ नीं या वीर योध्याच्या जीवनावर सर्वांना मार्गदर्शन केले. कार्क्रमाचे सूत्रसंचालन रामनाथ धनवे सर यांनी केले तर आभार श्रीधर जऱ्हाड यांनी मानले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी खुशाल चव्हाणं, रायभान रकते, सुनील पवार, आप्पा किसवे, श्रीम विश्रांती सलगरे, बंडू दुबे, सुभाष राठोड, आशुतोष झारगड यांनी सहकार्य केले.

जिजाऊ जयंतीच्या अध्यक्षपदी राजू पाटील बोंबले

तभा वृत्तसेवा

पैठण दि २६:राजमाता जिजाऊ जयंती उत्सव समिती पैठणच्या अध्यक्षपदी राजू बोंबले यांची निवड करण्यात आली.१२ जानेवारी रोजी राजमाता जिजाऊ यांची जयंती साजरी करण्यात येणार आहे. या अनुषंगाने मंगळवारी छत्रपती शिवाजी महाराज स्मारक परिसर या ठिकाणी सकल मराठा समाजाची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत ही एकमताने निवड बोंबले यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली. बैठकीला सकल मराठा समाजाचे पवन शिसोदे,अनिल राऊत,किशोर सदावर्ते,साईनाथ कर्डिले, गणेश पवार, महेश पवार, हरीभाऊ शेळके,सुभाष नवथर,अंकुश काळे,सचिन देशमुख,नितीन देशमुख,अमित चोरमारे,कपिल चव्हाण, मनोज ढवळे, विशाल अंधारे, शरद घोडके आदी पदाधिकारी उपस्थित होते.

अ. भा. किसान सभेच्या शेतकरी महिला परिषदेत महिलांच्या हक्कासह १७ मागण्यांची सनद पारित

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने नाशिक येथे गुरुवारी, २६ रोजी महाराष्ट्र राज्य शेतकरी महिला परिषद घेण्यात आली.

कॉ. गोदावरी परुळेकर सभागृहात पार पडलेल्या या परिषदेत महिलांच्या हक्क आणि मागण्यांची सनद सर्वानुमते पारित करण्यात आली.

१. शेतकरी महिला व शेतकरी कुटुंबाला त्यांच्या कष्टाचे रास्त दाम मिळावे, यासाठी भयावह देशव्यापी कृषी अरिष्टाला पायबंद घाला. याकरीता हे कृषी अरिष्ट निर्माण करणारी धोरणे राबविणे तातडीने बंद करा. कृषी अरिष्ट दूर करण्यासाठी कॉर्पोरेट लुटीला लगाम लावा. विविध उपाय करून शेतीमालाचा उत्पादन खर्च कमी करा. शेतीमालाला उत्पादन खर्च अधिक पन्नास टक्के भावाची कायदेशीर हमी द्या. नैसर्गिक आपत्तींमध्ये शेतीमालाला रास्त भरपाई द्या. २. शेतजमीन, मालमत्ता व घरांच्या मालकी हक्कात महिलांना समान वाटा द्या. मालकी जमीन, राहते घर, घरांच्या तळ जमिनी व नावे नसणाऱ्या, पण ताब्यात असलेल्या जमिनींच्या मालकी उताऱ्यावर पुरुषांसह महिलांच्याही हक्कांची समान प्राधान्याने नोंद करा. त्यासाठी आवश्यक ते कायदेशीर बदल करा. ३. शेतीत श्रम करणाऱ्या महिलांना उत्पन्नात व मजुरीत पुरुषांइतकाच समान वाटा व हक्क द्या. रोजगार हमीसह सर्व प्रकारच्या मजुरींमध्ये समान कामाला समान वेतन द्या. दुय्यम वेतन दर्जा व मोफत श्रमसक्तीद्वारे होणारी महिलांच्या श्रमाची लूट थांबवा. ४. महिलांना आरोग्य अधिकार, योग्य पोषण, शिक्षण, रोजगार, घरपोहोच पाणी, स्वस्त इंधन व घरोघरी स्वच्छता गृह असण्याचा हक्क द्या. ५. महिलांचे शेती व शेती संलग्न व्यवसायातील श्रम कमी व सुसह्य व्हावेत यासाठी औजारे व तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी विशेष धोरण, संशोधन, प्रशिक्षण व प्रयत्नांना चालना द्या. ६. मायक्रो फायनान्स, बचत गट इत्यादी कर्जांच्या जाळ्यातून महिलांची शासकीय उपायांद्वारे सुटका करा. ७. आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील महिलांना उत्पन्नाची हमी देणारे सहाय्य, विविध कल्याणकारी योजनांचे लाभ व तत्काळ किमान ५ लाख रुपये अर्थसहाय्य द्या. ८. महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी करण्यात आलेल्या कायद्यांची परिणामकारक अंमलबजावणी करा. महिलांसाठी सर्वत्र सुरक्षित वातावरण निर्माण करण्यासाठी ठोस उपाय अमलात आणा. ९. एकल महिलांचे हक्क, सहाय्यता व सबलीकरणासाठी राज्यात स्वतंत्र विभागाची स्थापना करा. १०. दारू व व्यसन मुक्तीचे मूलगामी धोरण तयार करून त्याची अंमलबजावणी करा. ११. हुंडा, भृणहत्या, अंधश्रद्धा, बालविवाह, धर्मांधता व जातीयवाद यासारख्या समस्या व कुप्रथा दूर करण्यासाठी ठोस उपाय करा. समाजात स्त्री-पुरुष समानता, वैज्ञानिक दृष्टिकोन व विवेकी विचार रुजविण्यासाठी विशेष धोरण घ्या. १२. अन्नसुरक्षेला प्राधान्य देणारी पर्यावरणकेंद्री पीक रचना, कृषी धोरण व व्यापार धोरणाचा अवलंब करून सर्व प्रकारचे कुपोषण संपुष्टात आणण्यासाठी उपाय करा. १३. महिला शेतकरी व महिला शेतमजुरांना प्रतिमाह किमान ५०००/- रुपये वृद्धापकाळ पेंशन द्या. १४. विधवा, परित्यक्त्या, वृद्ध, अपंग, निराधारांना सामाजिक अर्थसहाय्य विशेष योजने अंतर्गत दिल्या जाणाऱ्या अर्थसहाय्यात वाढ करून ते किमान प्रतिमाह ५०००/- रुपये करा. सामाजिक अर्थसहाय्य विशेष (निराधार) योजनेच्या लाभार्थींना लाडकी बहीण योजनेतून वगळण्याची अट रद्द करा. १५. ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी वर्गाला आरोग्य, पोषण व शिक्षणविषयक मूलभूत सेवा देणाऱ्या योजना कायम करा व त्यामध्ये काम करणाऱ्या अंगणवाडी सेविका व मदतनीस, आशा व गटप्रवर्तक, शालेय पोषण आहार कामगार आदींना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा, वेतनश्रेणी व सामाजिक सुरक्षा लागू करा. १६. महिलांचे शेतीसंबंधी पारंपारिक ज्ञान, कौशल्य व नैसर्गिक संसाधानांवरील मालकीचे कॉर्पोरेट लुटमारी पासून रक्षण करा. १७. महिलांच्या संविधानिक अधिकारांचे रक्षण करा.

अल्पवयीन मुलीला आणले कर्नाटकातुन कन्नड शहर पोलिसांनी घेतले ताब्यात

तभा वृत्तसेवा

कन्नड दि.२६ डिसेंबर - शहरातील चौदा वर्षीय अल्पवयीन पीडितेचे अपहरण करणाऱ्या आरोपी व पीडितेला कर्नाटक राज्यातून कन्नड शहर पोलिसांनी परत आणले आहे

पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार शहरातील बडा बंगला परिसरातील पीडितेला आरोपी किरण कडुबा मोरे वय २९ वर्षे रा.दाभाडी याने दि.१४ रोजी पीडितेचे अपहरण करून कर्नाटक राज्यातील गोगी तालुका शहापूर, जिल्हा यादगीर येथे घेऊन गेला,अल्पवयीन पीडिता बाजारात खरेदीसाठी गेली असता परत आलीच नसल्याने कुटुंबातील सदस्यांनी तिची शोधा शोध सुरू केली पण अल्पवयीन पीडिता कुठेच मिळून आली नसल्याने पीडितेच्या आईने नातेवाईकांसह कन्नड शहर पोलिस स्टेशनमध्ये धाव घेतली दि.१४ रोजी कन्नड शहर पोलिस स्टेशनमध्ये पीडितेच्या आईच्या फिर्यादीवरून सहायक फौजदार बी.एम.पवार यांनी अपहरणाच्या गुन्ह्यांची नोंद घेतली,

सदर घटनेचा तपास पोलिस निरीक्षक आर.वी.सानप यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक चांद मेंढके यांच्याकडे देण्यात आला तपास हाती येताच पोलिस उपनिरीक्षक चांद मेंडके,पोलीस अंमलदार विजय चौधरी यांनी तपासाची सूत्रे वेगाने फिरवत अखेर दि.२४ रोजी खबऱ्या मार्फत तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपीचा शोध लावला दि.२५ रोजी गोगी येथून आरोपीच्या मुसक्या आवळल्या.

या पथकात पोलिस उपनिरीक्षक चांद मेंढके,पोलिस अंमलदार विजय चौधरी, महिला पोलिस अंमलदार सुनीता गोरे यांनी सदर कामगिरी बजावली आहे, आरोपीविरोधात कन्नड शहर पालिस ठाण्यात पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बँकेच्या फिल्ड ऑफिसरने महिला बचत गटाच्या दीड लाख रुपयांचा केला अपहार

छत्रपती संभाजीनगर : महिला बचत गटाच्या महिलांनी दिलेले कर्जाचे हप्ते स्वतःच्या बँक खात्यात वळवून फीड ऑफिसरने १ लाख ५५ हजार रुपयांचा अपहार केला. हा प्रकार जय बालाजी अर्बन को-ऑप. सोसायटीत घडला. याप्रकरणी आरोपीवर सिडको पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रदीप शाल्मोन साठे (वय ३४) रा. प्लॉट नंबर ४/१६ / ११० मिल कॉर्नर, कोतवालपुरा संभाजीनगर असे आरोपीचे याप्रकरणी बँकेचे मॅनेजर छत्रपती नाव आहे. सुधाकर बाबुराव अन्नदाते रा. पवननगर सिडको यांनी फिर्याद दिली.

फिर्यादीनुसार, आरोपी प्रदीप साठे हा बालाजी अर्बन को-ऑप सोसायटीच्या टि.व्ही. सेंटर येथील शाखेत जानेवारीपासून फिल्ड ऑफिसर म्हणून काम करत होता. त्याच्याकडे मुकुंदवाडी, करमाड, शेद्रा, कुंभेफळ, चिकलठाणा, रामनगर, संजयनगर, अंबिकानगर या भागातील महिला बचतगटाना कर्ज वाटप करणे व वसुली करणे अशी कामे होती. ५ नोव्हेंबर रोजी बचतगट खातेदार व कर्जदारांच्या तक्रारी आल्या. रामनगर येथील महीला बचतगट केएमबीजी २७१, एमबीजी २६०, एमबीजी २४६, एमबीजी २६४ यांनी वेळोवेळी आपल्याकडील कर्ज हप्ता शाखेत नियमीत पणे भरण्यासाठी फिल्ड ऑफीसर प्रदिप शाल्मोन साठे यांच्याकडे दिले, असे सांगीतले.

मात्र आमच्या बँकेच्या खात्यावर पैसे आले नसल्याचे टीव्ही सेंटर बँक शाखेचे मॅनेजर गणेश भालेराव यांच्या लक्षात आले. त्यावेळी त्यांनी चौकशी करुन प्रदीप साठे यास बोलवून घेतले. त्याने ५५ हजार रुपये माझ्याकडे जमा असल्याचे सांगीतले. व ते शाखेमध्ये भरणार आहे,

शेतातील, बांधावरील पऱ्हाट्या विनाविलंब जाळून नष्ट करा

कृषी विभागाचे परिपत्रक जारी

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

शेतात गंजी घालून ठेवलेल्या, शेतात उभ्या असलेल्या तसेच बांधावर रचून ठेवलेल्या कापसाच्या पऱ्हाट्या विनाविलंब जाळून नष्ट कराव्यात, असा सल्ला कृषी विभागाच्या वतीने कापूस उत्पादक शेतकऱ्यांना देण्यात आला आहे.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी छत्रपती संभाजीनगर कार्यालयाने या संदर्भात एक परिपत्रकच काढले आहे. अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाअंतर्गत सर्व क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना सूचित करण्यात येते की, नुकत्याच झालेल्या जिल्हा मासिक चर्चासत्र अंतर्गृत क्षेत्रीय भेटीचे आयोजन केले होते. या पाहणीतून शेतकऱ्याच्या शेतावर कापूस हंगाम समाप्तीनंतर देखील अनेक शेतात कापसाच्या पऱ्हाट्या उभ्या असल्याचे नजरेत आले आहे. राज्यात छत्रपती संभाजीनगर हा आपला जिल्हा कापूस उत्पादक जिल्हा म्हणून ओळखला जातो. यासाठी पुढील खरीप हंगाम २०२५ साठी कापूस पिकावर गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव येण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्याचे कारण असे की, जोपर्यंत शेतात.पऱ्हाटी उभी राहील तो पर्यंत प्रत्यक्षात या किडीस खाद्य मिळेल. त्यामुळे तिचे जगणे सोपे होईल. शिवाय यामुळे किडीचे वेगवेगळ्या अवस्था नष्ट करणे अवघड जाईल. हे पुढील अरिष्ट टाळण्यासाठी येथून पुढे पंधरा दिवस कापूस पऱ्हाटीमुक्त शेत शिवार करावे लागेल. प्रादुर्भावग्रस्त उपटलेल्या पऱ्हाट्या या बांधावर न ठेवता जाळून नष्ट करणेच योग्य राहील असा संदेश सर्व कापूस उत्पादक शेतकरी बांधवांना समजून सांगने अनिवार्य राहील. असे या परिपत्रद्वारे तालुका कृषी अधिकाऱ्यांसह सर्वसंबंधितांना सूचित करण्यात आले आहे. विभागीय कृषी सहसंचालक डॉ. टी. एस. मोटे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी पी. आर. देशमुख, राष्ट्रीय कृषी संशोधन प्रकल्पाचे डॉ. एस. बी. पवार यांचा परिपत्रकावर स्वाक्षऱ्या आहेत.

जिल्हा परिषदेच्या शाळांना पटसंख्येची लागली घरघर !

तभा वृत्तसेवा-सहयोग प्र.जावळे

कन्नड दि.२६ डिसेंबर : तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांना विद्यार्थी संख्येअभावी घरघर लागली असून गेल्या तीन वर्षांत तालुक्यातील १७ प्राथमिक शाळा बंद झाल्या आहेत. तसेच सद्यस्थितीत ३० प्राथमिक शाळांमधील पटसंख्या २० किंवा त्यापेक्षा कमी असून यातील १२ प्राथमिक शाळांमधील पटसंख्या १० आणि त्यापेक्षा कमी असल्याने या शाळा रेड झोनमध्ये आल्या आहेत.

तालुक्यातील काही जिल्हा परिषद शाळांची स्थिती चांगली असली तरी काही शाळा संकटात असल्याचे दिसून येत आहे. कन्नड तालुक्यात तर अशीच काहीशी स्थिती दिसुन येत आहे.

'विद्यार्थी संख्या २० किंवा त्यापेक्षा कमी झालेल्या शाळा या बहुतांशी वस्तीशाळा आहेत. या वस्त्यांवरील विद्यार्थी संख्या घटल्याने विद्यार्थी नाहीत. तर मोठ्या गावाजवळील शाळेमधील विद्यार्थ्यांना एकतर संस्थेच्या अथवा इंग्रजी शाळेत शिकविण्याची पालकांची मानसिकता कारणीभूत आहे.

गटशिक्षणाधिकारी कार्यालयाकडून मिळालेल्या माहितीनुसार कन्नड तालुक्यातील १७ जिल्हा परिषदेच्या शाळा विद्यार्थी नसल्याने गेल्या ३ वर्षांत बंद पडल्या आहेत,

या शाळांमधील विद्यार्थी संख्या घटल्याने नाइलाजाने या शाळांना कुलूप लावून येथील कार्यरत शिक्षकांना इतर शाळांमध्ये समायोजित करावे लागले. शिवाय आता आणखी १२ शाळांमधील पटसंख्या १० पेक्षा कमी आहे. परिणामी या शाळा आपसुकच बंद पडण्याच्या मार्गावर आहेत .याकडे शिक्षण विभागाने गांभीर्याने लक्ष नाही दिले तर जिल्हा परिषदेच्या शाळांची स्थिती फारच वाईट होणार आहे असे चित्र दिसत आहे

.

गतवर्षीच्या तुलनेत पुन्हा विद्यार्थी घटले

जि.प.च्या शाळांमध्ये मागील वर्षाच्या तुलनेत यावर्षी काही शाळांमधील विद्यार्थी संख्या घटली आहे. प्रत्येक वर्षी विद्यार्थी संख्या कमी का होत आहे? याचे शिक्षण विभागाने आत्मचिंतन करायला हवे आहे.

शाळांमध्ये विद्यार्थी संख्या २० किंवा त्यापेक्षा कमी आहे. परिणामी या शाळांकडेही वर्षभरात लक्ष दिले नाही तर या शाळाही रेड झोनमध्ये येऊन बंद पडू शकतात.

या बारा शाळा दहा पेक्षा कमी पटसंख्या असल्याने रेड झोन मध्ये आल्या आहेत.

(औराळा) जी प निकम आहेर वस्ती ८, (चिकलठाण) महात्मा फुले ५, (देभेगाव) अंतापूर ९, (करंजखेड) शिपघाट ५ , हिवरावाडी ९, (नाचनवेल) मोहरावाडी २, धनगरवाडी शाहू टाकळी ४, कोपरवेल ५, माळोबाई आडगाव ५, (नागापूर) आंबेगाव ४, (पिशोर) कन्या शाळा शेफेपुर ५, (शेलगाव) भिलवाडी ५

२० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांची यादी कंसात केंद्र

(औराळा) जी प कविटखेडा ११, (बहिरगाव) म्हस्के वस्ती १३, भाट्या मारुती १६, (चापानेर) रामनगर २०, (चिकलठाण) गोकुळवाडी १४, घुसूर तांडा १८, साळेगाव २०, (चिंचोली ली) तरल वस्ती १२, (देभेगांव) लव्हाळी १५, (कन्नड) ब्राम्हणी १२, (नाचनवेल) बौद्ध वाडी १२, मोहाडी १९, राजपूतवाडी सारोळा २०, (नागापूर) आदिवासी खोरा ११, पुरणवाडी १४, (शेलगाव) दिगाववाडी १५ , वाल्मिकनगर १७ , (विटा) भोजने वस्ती १४ या १८ शाळांमध्ये विद्यार्थी संख्या २० किंवा त्यापेक्षा कमी आहे. परिणामी या शाळांकडेही वर्षभरात लक्ष दिले नाही तर या शाळाही रेड झोनमध्ये येऊ शकतात.

'दिशा स्वराज्याची' माहितीपटास मिळाला इटली येथे पुरस्कार

छत्रपती संभाजीनगर, दि.२६ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या लिओनार्दो द विंची स्कूल ऑफ डिझाईनचे प्राध्यापक वीरेंद्र वळसंगकर यांनी दिग्दर्शन केलेल्या 'दिशा स्वराज्याची' (ढुरीवी डशश्रष ऋईशीपरपलश) माहितीपटास इटली येथे आयोजित करण्यात आलेल्या रिव्हर टू रिव्हर फ्लॉरेन्स इंडियन फिल्म फेस्टिव्हलमध्ये 'ऑडियन्स अवॉर्ड' (डॉक्युमेंटरी) हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. फेस्टिव्हलच्या दिग्दर्शिका सेल्वाजिया वेलो यांनी प्रेक्षक पुरस्काराची घोषणा केली.

हा पुरस्कार मिळाल्याबद्दल प्रा.वळसंगकर यांचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर व सर्व संबंधितांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

रिव्हर टू रिव्हर फ्लॉरेन्स इंडियन फिल्म फेस्टिव्हलमध्ये 'दिशा स्वराज्याची' ही डॉक्युमेंटरी स्क्रीन केली गेली. हा फेस्टिव्हल दरवर्षी आयोजित केला जातो आणि यामध्ये भारतीय चित्रपट दाखवले जातात. यावर्षी हे फेस्टिव्हल फ्लॉरेन्स, इटली येथे पार पडले. ही डॉक्युमेंटरी मराठी भाषेत असून ती राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त दिग्दर्शक वीरेंद्र वळसंगकर यांनी दिग्दर्शित केली आहे आणि विदर्भ भूदान ग्रामदान सहयोग समिती यांनी निर्मिती केली आहे.

पर्यावरण आणि त्याच्याशी जडलेल्या माणसाच्या भावभावना या गोष्टी जगभरात एकसारख्या आहेत. कदाचित म्हणूनच इटलीतल्या प्रेक्षकांनाही 'दिशा स्वराज्याची' हा माहितीपट भावला असेल. पर्यावरणाचे प्रश्न, जंगल वाचवण्याचा मुद्दा या गोष्टींवर संवेदनशीलपणे विचार आणि कार्य होणे आवश्यक आहे. फिल्म सोसायटी सर्कलच्या माध्यमातून हा माहितीपट विविध ठिकाणी पोहोचवणार आहे.

प्रा.वीरेंद्र वळसंगकर
दिग्दर्शक, 'दिशा स्वराज्याची'

मेंढा (लेखा) हे गडचिरोली जिल्ह्यातील छोटेसे गाव आहे. या गावाने एकत्र येऊन आपल्या गाव भोवतालच्या जल, जंगल जमीन वरील अधिकार मिळवला आहे. अशा रीतीने वनाधिकार मिळवणारे ते भारतातील पहिले गाव ठरले आहे. एका छोट्याशा गावाने एकत्र येऊन गावचा कारभार कसा चालवता येऊ शकतो याचे उत्तम उदाहरण जगासमोर ठेवले आहे. 'दिशा स्वराज्याची' हा माहितीपट या गावाच्या संघर्षाची कथा सांगते. सध्याच्या जागतिक परिस्थितीत मेंढा-लेखाची कथा अत्यंत अर्थपूर्ण आहे. जिथे लोक जागृत होऊन स्वतःचे निर्णय घेतात तिथे खऱ्या अर्थाने लोकशाही चालते. विकेंद्रित कारभारामुळे प्रजासत्ताकाचे स्वप्न साकार होते.

त्याचप्रमाणे दिनांक १७ जानेवारी २०२५ ते दिनांक २१ जानेवारी २०२५ दरम्यान होणाऱ्या जयपूर आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिवलमध्ये होणाऱ्या स्पर्धेसाठी 'दिशा स्वराज्याची' या माहितीपटाची निवड झालेली आहे.